

श्रीमद् इन्दिराकान्त तीर्थ श्रीपाद वडेर स्वामी स्मृतिग्रंथ

स्मृतिग्रंथ

# श्रीमद् इन्दिराकान्ततीर्थ स्वामी
# श्रीपाद वडेर

(चरित्र व कार्य)

— ना. भा. नायक

# श्रीमद् इन्दिराकान्ततीर्थ स्वामी
# श्रीपाद वडेर

आवृत्ति पहिली

शके १८९६, सन १९७४


लेखक

**ना. भा. नायक**



प्रकाशक

**जी. रा. पै खोत**

श्रीगोकर्ण - पर्तगाळी

मठ संस्थान,

पर्तगाळी

काणकोण (गोवा)

मूल्य

**रुपये ५-००**

मुद्रक

दा. अ. कारे

गोमन्त छापखाना

मडगांव

ॐ

ज्या पुण्यप्रद पीठाच्या
तेजस्वी गुरुपरंपरेंतून
श्रीमद् इन्दिराकान्ततीर्थ
स्वामीजींसारखे असामान्य
सद्गुरु प्रगट झाले
त्या ज्ञानमार्गाचा
तेजस्वी नन्दादीप अशा
श्रीगोकर्ण - पर्तगाळी
मठ संस्थानास
सादर समर्पण

| अ. | विषय | पृ. |
|---|---|---|
| | आशीर्वाद - संदेश | |

## प्रथम विभाग


| | | |
|---|---|---|
| १ | उपोद्घात | १ |
| २ | स्वामीजींचा जन्म | ८ |
| ३ | जन्म-टिपण | १२ |
| ४ | विद्यार्जन | १३ |
| ५ | आश्रमस्वीकार | १५ |
| ६ | दीक्षोत्तर अध्ययन | १७ |
| ७ | पट्टाभिषेक | १९ |
| ८ | स्वामीजींचें व्यक्तिमत्त्व | २१ |
| ९ | दिनचर्या | २३ |
| १० | जप - तप | २८ |
| ११ | योग | ३० |
| १२ | पुराण-प्रवचन | ३३ |
| १३ | ग्रंथलेखन | ३५ |
| १४ | गीतेची महती | ३९ |
| १५ | प्रथम शिष्य | ४१ |
| १६ | द्वितिय शिष्य | ४३ |
| १७ | स्वामीजींचे संचार | ४५ |
| १८ | संचारांतील विशेष | ५१ |
| १९ | स्वामीजींचें कार्य | ५६ |
| २० | मुक्ती | ६६ |


## द्वितीय विभाग


आठवणी, परिशिष्ट इ.

# प्रस्तावना

हिंदु संस्कृति ही अमृतरूप आहे; अवएव साक्षात् अमृत आहे. ही संस्कृति अनादि कालापासूनची अतिप्राचीन आहे. या संस्कृतीच्या अतिप्राचीन प्रचंड इतिहासाचा नि तात्त्विक अखंड अविरत प्रवाहाचा मागोवा घेत गेल्यास परशुराम, आर्यचाणक्य, समर्थ रामदास, विद्यारण्यस्वामी, आद्य शंकराचार्य, मध्वाचार्य या परंपरेकडे दृष्टी वेधते आणि अंतःकरणात साक्षात्कार होतो कीं, त्याच परंपरेचा श्रीमद् इन्दिराकान्ततीर्थ हा एक आधुनिक तेजस्वी दुवा आहे.

वैदिक ऋषींच्या उच्चतम स्तरावरील चिंतन-मननांतून प्रगटलेल्या व उपनिषदांतून सुस्पष्ट झालेल्या अध्यात्मासारख्या सर्वश्रेष्ठ वैदिक तत्त्वज्ञानाचा सुलभतेने प्रसार करताना मूळ तत्त्वज्ञानाचा कुशलतेने सद्यःस्थितीशीं मेळ घालून ज्यांनी जनमानस आकर्षित केलें अशा या आधुनिक ऋषिवर्यांचें संपूर्ण माहितीचें मोठें चरित्र त्यांच्याच योग्यतेच्या एखाद्या विद्वानाने लिहिलें असतें तर त्याला शर्करामिश्रित दुधाची योग्यता आली असती. तथापि तो योग अजून काही आला नाही! म्हणून मुळीच नाही त्यापेक्षा साधारणसें का होईना या हेतूने प्रस्तुत चरित्र आज वाचकांपुढे येत आहे.

आपले बाविसावे परमपूज्य पीठाधीश श्रीमद् द्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी यांच्या मनात या आपल्या परमगुरु स्वामीजींचा सचरित्र स्मृतिग्रंथ शक्य तों लवकर प्रकाशित व्हावा अशी उत्कट इच्छा होती; पण अनेक अडचणीमुळे या कार्यास योग्य चालना मिळाली नाही.

आज उद्या करता करता दिवस-महिने-वर्षें गेलीं; आणि गतसालीं (शके १८९४) गुरुवर्य श्रीमद् द्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजींचा संचार जांबावली येथें श्रीरामनाथ दामोदर देवस्थानांत झाला, त्यावेळी "हा ग्रंथ आतां वेळ न दवडतां लवकर लिहिला पाहिजे" अशी इच्छा त्यानी मजजवळ प्रगट केली. पुढे स्वामीजी कर्नाटकच्या संचारांत असताना

अगदी आकस्मिकच वृंदावनस्थ झाल्याने चरित्रग्रंथाचा पुढील विचार स्थगित राहिला.

अखेर श्रीगोकर्ण-पर्तगाळी मठाचे विद्यमान पीठाधीश श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीमहाराज यांच्या आज्ञेमुळे हें जबाबदारीचे काम कालाचा अभाव असतांही मला स्वीकारावे लागले. उसंत नसलेलें 'भारत-मित्रा'चें नेहमीचें काम आणि गोमंतकाचा सांस्कृतिक इतिहास लिहिण्यास नुकताच आरंभ केलेला. तथापि त्यांतूनही सवड काढून चरित्रग्रंथाच्या लेखनास आरंभ केला.

यापूर्वी श्रीगुरुस्वामींनी संस्थानच्या दप्तरांतील कागदपत्र पाहून माहिती संकलित करण्यासाठी पानवेली येथील एक मठानुयायी लेखक वै. वासुदेव कामत वाघ यांची नियुक्ती केली होती. त्यांनी माहितीचे संकलनही केले होतें. त्या संकलनांतील माहितीचा चरित्रग्रंथासाठी फार चांगला उपयोग होईल अशी माझी कल्पना होती. तथापि त्या संकलनांत तिथी, तारखा यांसारख्या व अन्य अत्यावश्यक साधार माहितीचा प्रकर्षाने अभाव दिसून आला आणि त्यामुळे नव्याने माहिती मिळवून लेखनास आरंभ करावा लागला.

इतके असूनही वेळ अगदीच थोडा असल्याने लेखन फार घाईने करावें लागलें व त्यामुळें तारखांचें व तिथींचें संशोधन घडून आलेंच नाही. हें संशोधन संस्थानच्या दप्तरांतील कागदपत्रांप्रमाणेच इतर कागदपत्र व अन्य साधनें यांचा सूक्ष्म अभ्यास करून करावे लागणार आहे आणि त्यासाठीं भरपूर काल हवा आहे. श्रीकृपेने तें काम पूर्ण झाल्यावर श्रीगोकर्ण-पर्तगाळी मठ संस्थानचा संपूर्ण इतिहास लिहावा असाही हेतू आहे. पाहूं कसा योग येतो तो !

या ग्रंथांत मुख्य विषयाचीं एकूण २० प्रकरणें आलीं असून पहिल्यांत मठाची व मठाधीशांची ओझरती माहिती आहे. व दुसऱ्यापासून विसाव्या प्रकरणापर्यंत चरित्रनायकांची माहिती देण्यात आली आहे. ग्रंथाच्या दुसऱ्या भागांत आठवणींचे संकलन केले आहे आणि शेवटीं परिशिष्टांत

अन्य माहितीचा समावेश करण्यात आला आहे.

श्रीकृपेने दुसऱ्या आवृत्तीचा योग आल्यास हा ग्रंथ विस्तृत स्वरूपांत मोठा लिहावा असाही विचार आहेच.

श्रीस्वामीमहाराजांनी आज्ञा केल्यामुळेच हे शुभकृत्य मजकडून लवकर घडून आलें याबद्दल आणि अगत्याने आशीर्वाद-संदेश पाठविल्याबद्दल मी श्रीगुरुमहाराजांचा फार कृतज्ञ आहें.


प्रस्तुत ग्रंथलेखनाच्या कामी वै. वासुदेव कामत वाघ यांच्या संकलनाचाही बराच उपयोग झाला याबद्दल त्यांचा; इतर जे अनेक ग्रंथ व कागदपत्रें यांचे संच उपयोगी आले त्या लेखकांचा व मालकांचा; त्याचप्रमाणे ज्यांनी अगत्यपूर्वक आठवणी पाठवून सहकार्य केलें त्या सर्व सन्मित्रांचा मी फार आभारी आहें.

त्याचप्रमाणे कव्हर व छायाचित्रांबद्दल चित्रकारांचे आणि कागद लवकर पाठवून व अन्य कामांत आपुलकीने सहकार्य केल्याबद्दल मुंबईचे आमचे मठानुयायी श्री. माधव पै यांचेहि आभार मानणे अवश्य आहे.

शेवटी या ग्रंथाचें मुद्रण अत्यंत आपुलकीने सुबक व वेळींच करून दिल्याबद्दल मठानुयायी श्री. दामोदर अच्युत कारे यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय राहावत नाही.

रिवण ( गोवा )
फाल्गुन व॥ षष्ठी शके १८९५
दि. १४ मार्च १९७४

सर्वांचा नम्र,
**नारायण भास्कर नायक**
लेखक.



विद्यमान पीठाधीश
श्रीमद्विद्याधिराज तीर्थ श्रीपाद वडेर स्वामी

श्रीगोकर्ण-पर्तगाळी मठाधीश श्रीमद्‌विद्याधिराजतीर्थ स्वामी श्रीपाद वडेर यांचा

# आशीर्वाद - संदेश

श्रीरामदेववीरविठ्ठलौ विजयेतेतराम्

श्रीमदानन्दतीर्थभगवत्पादाचार्य-

गुरुभ्यो नमः

श्रीशके १८९५ प्रमादि संवत्सर
फाल्गुन शुक्ल १०मी रविवार.

श्रीसंस्थान मुक्काम श्रीमठ पर्तगाळी
गोमन्तक.

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्य पदवाक्यप्रमाण
पारावारपारीण यमनियमाद्यष्टाङ्ग योगसंपन्न
श्रीमद्वैष्णवसिद्धान्त प्रतिष्ठापनाचार्यवर्य
श्रीमत्सकलसुरनिकर मुकुटमणिरंजित दिव्य
श्रीरामदेव वीरविठ्ठलचरणकमलसंततानुराधक
श्रीसंस्थान-गोकर्ण-पर्तगाळी-जीवोत्तम-मठाधीश
श्रीमत्कमलानाथतीर्थश्रीपादवडेरकरकमलसंजात
श्रीमद्द्वारकानाथतीर्थ श्रीपादवडेर वरकुमारक
श्रीमद्विद्याधिराजतीर्थ श्रीपादवडेर स्वामिभिः

श्रीन्दिराकान्तपादाब्जद्वन्द्व इन्दिन्दिरायिताः ।
वन्द्यन्ते श्रीन्दिराकान्ताः सदिन्दीवरचन्दिराः ॥

"हरिस्मृतिः सर्वविपद्विमोक्षिणी
गुरुस्मृतिः सर्वशुभप्रदायिनी ।"

हरौ रुष्टे गुरुस्त्राता गुरौ रुष्टे न कश्चन ।
गुरौ तुष्टे हरिस्तुष्टो गुरुद्वारा विमुक्तिदः ॥
आ समाप्तेः शरीरस्य यस्तु शुश्रूषते गुरुम् ।
स गच्छत्यञ्जसा विप्रो ब्रह्मणः सद्म शाश्वतम् ॥

अत्यन्त प्रिय शिष्यवर्गान्तर्गत नारायण भास्कर नायक "भारतमित्राचे" संपादक, रिवण गोवा, यांस श्रीमन्नारायणस्मरणपूर्वक आशीर्वाद.

आमच्या प्रिय गुरुवर्यांचे परमगुरुवर्य परमपूज्य श्रीमदिन्दिराकान्ततीर्थ श्रीपादवडेर स्वामीजी यानीं अनेक वेदान्तग्रन्थांचा तत्रापि गीता उपनिषदें ब्रह्मसूत्रें या प्रस्थानत्रयीचा पूर्णपणें अभ्यास केला होता. त्यायोगें वेदान्तविषयक कोणत्याही प्रश्नाचें सुलभ रीतीनें समर्पक उत्तर देण्यास ते फार चतुर होते. त्यांचीं स्वाश्रमोचित त्रिकालस्नान जप पूजादि सर्व कृत्यें आजारीपणांत देखील नियमितपणें अव्याहत चालत होतीं. माध्वमतानुसार श्रीमद्भगवद्गीतेचें व्याख्यान महाराष्ट्रभाषेंत यापूर्वी कोणीही लिहिलें नसून माध्वांना मान्य असें गीता-व्याख्यान त्यानींच पहिलें लिहिलें होतें. या द्विविधोपासनासंपन्नतेच्या योगें ते एक महातपस्वी अतएव निग्रहानुग्रहसमर्थ योगिश्रेष्ठ होते. "स्वाध्यायप्रवचने एवेति नाको मौद्गल्यः । तद्धि तपस्तद्धि तपः ।" या उपनिषद्वाक्यानुसार वेदान्तादि सच्छास्त्रांचा व श्रीमद्भागवतादि पुराणग्रन्थांचा अभ्यास करून प्रवचन करणें स्वकर्तव्य समजून सुबोध व कर्णमधुर शब्दांनीं आबालवृद्ध आस्त्रीपुरुष आपण्डितपामर सर्व जणांला समजाविण्याचें त्यांचें असाधारण पाण्डित्य सुप्रसिद्धच होय. या अनन्यसाधारण विद्वत्तेच्या व अलौकिक प्रतिभावत्त्वादि गुणाच्या योगानें केवल गौडसारस्वत ब्राह्मणसमुदायांतच नव्हे तर इतर समुदायांत सुद्धां त्यानीं मोठी मान्यता मिळविली होती.

"इह खलु सुखमेव मे स्याद्दुःखं मनागपि मा भूत् ।" अशी प्रत्येक मनुष्याची इच्छा असते. तरी हें दुःखरहित सुख "जिज्ञासोत्थज्ञानजात्तत्प्रसादादेव मुच्यते ।" इत्यादि वचनाप्रमाणें श्रीमन्नारायणाच्या प्रसादाशिवाय इतर कोणत्याहि उपायानें मिळणें शक्य नाहीं. तो प्रसाद केवल भक्तीनेंच होत नसून ती भक्ति ज्ञानपूर्वकच असावी लागते. तशा ज्ञानाच्या प्राप्तीसाठीं

"संसारचक्रे भ्रमतां जनाना-
मिहाप्यमुत्रापि महाफलप्रदः ।
सत्सङ्ग एकोऽस्ति न हीतरः स्या-
द्यत्राच्युतोदारकथाप्रसङ्गः ॥"

" रहूगणैतत्तपसा न याति
न विद्यया निर्वसनाद्गृहाद्वा ।
न च्छन्दसा नोत जलाग्निसूर्यै-
र्विना महत्पादरजोऽभिषेकम् ॥"

इत्यादि वचनानुसार एतादृग्गुणविशिष्ट सद्गुरूंची स्मरणादिरूप सेवा करणें श्रेयस्कर होय. ही जाणीव असूनच तुम्ही स्वतःचीं कामें पुष्कळ असलीं तरी त्यांकडे लक्ष्य न देतां श्रीगुरुप्रीत्यर्थ आणि आस्तिक जनांच्या बोधासाठीं आमच्या श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचे विसावे पीठाधीश श्रीमदिन्दिराकान्ततीर्थ श्रीपाद वडेर स्वामी यांच्या चरित्रग्रन्थलेखनाचें काम हातीं घेतलें आहे. या यतिवर्यांच्या सदिच्छेने हें लेखनाचें व प्रकाशनाचें आवश्यक शुभकृत्य पूर्णपणें यशस्वी होवो, सदर ग्रन्थाच्या वाचनांत सर्व जिज्ञासूंना उत्सुकता होऊन तुमच्या लेखनादि श्रमाचें साफल्य होवो, तुमचे सगळे व्यवसाय उत्तरोत्तर वृद्धिंगत होवोत आणि सतत सकुटुम्ब तुम्हां सर्वांची दीर्घायुरारोग्यादिकल्याणाभिवृद्धि होवो अशी श्रीरामदेववीरविट्ठलचरणीं प्रार्थना करून श्रीगन्ध प्रसाद मन्त्राक्षतांसह आशीर्वादपूर्वक हा संदेश तुमच्या विनंती-नुरूप प्रेषिला जात आहे. श्रीसंस्थानाभिमानी यांस विशेष काय लिहिणें. हा आशीर्वाद.

# श्रीमद् इन्दिराकान्ततीर्थस्वामी श्रीपाद वडेर

## १

## उपोद्घात

श्रीविष्णु सर्वोत्तम मानणारा वैष्णव संप्रदाय अनादि कालापासून चालू असल्याचें वेद, उपनिषदें, भागवत, महाभारत वगैरे महाग्रंथांतून व विशेष स्पष्टीकरण श्रीमद्भागवत ग्रंथाच्या दशम स्कंदाच्या उत्तरार्धांत सांगितलें आहे. मध्वसिद्धांत श्रीविष्णु सर्वज्ञत्व, सर्वोत्तमत्वादि समस्त कल्याण गुणपूर्ण असेंच मानतो.

मध्वसिद्धांती वैष्णव संप्रदायांत जीव व ईश यांत भेद मानीत असल्याने भक्तिमार्गाला हा संप्रदाय पूर्ण अनुकूल आहे असें माध्वतत्त्वज्ञानीच नव्हे, तर इतरही अनेक विद्वान् तत्त्वज्ञानी अगत्यानें सांगत आहेत.

प्रख्यात पंडित 'विद्याभूषण' यांच्या 'प्रमेयरत्नावली' या ग्रंथांत माध्वसिद्धांताबद्दलचा जो महत्त्वपूर्ण श्लोक आहे तो असा —

श्रीमन्मध्वमते हरिः परतरः सत्यं जगत्तत्वतो ।
भेदा जीवगणा हरेरनुचरा नीचोच्चभावं गताः ॥
मुक्तिर्नैजसुखानुभूतिरमला भक्तिश्च तत्साधनम् ।
ह्यक्षादि त्रितयं प्रमाणमखिलाम्नायैकवेद्यो हरिः ॥ १ ॥

**भावार्थ** - "मध्वमतांत श्रीविष्णु अत्यंत श्रेष्ठ असून जग हें तत्त्वतः सत्य आहे. श्रीहरी, जीव व जड वस्तू यांच्यांत तत्वतः भिन्नता असून त्यांचे पांच भदही सत्य आहेत. जीवांत सात्विक, राजस, तामस वगैरे जे असतात ते सर्व जीव श्रीहरीचे प्रतिबिंब असल्यानें दास या नात्यानें त्याला ते अनुसरूनच असतात. ते जीवही परस्परांत उच्चनीचही असतात. आत्मसुखाच्या

अनुभवाला मुक्ति असें म्हणतात. त्या मुक्तीला श्रीहरीची भक्ति हेंच साधन असतें. मध्वमतांत प्रत्यक्ष, अनुमान व आगम हीं तीन प्रमाणें मानलीं असून श्रीहरी हा श्रुति व तदनुकूल स्मृति वगैरेंनींच जाणला जातो. ''

सनत्कुमार, दुर्वास, परतीर्थ, सत्यप्रज्ञतीर्थ, प्राज्ञतीर्थ, अच्युतप्रेक्षाचार्य व मध्वाचार्य अशी माध्वसंप्रदायप्रस्थापक श्रीमन्मध्वाचार्यांची परंपरा आहे. या मध्वाचार्यांनींच उडुपी अष्टमठांची स्थापना केली. फलिमारू मठ, अदमारू मठ, कृष्णापूर मठ, पुत्तिगे मठ, शिरूर मठ, सोदे मठ, काणुरू मठ व पेजावर मठ अशीं त्या मठांचीं नांवें आहेत.

अष्टमठांतर्गत फलिमारू मठाधीश श्रीरामचंद्रतीर्थ स्वामी यांकडून त्यांच्या अत्यंत मर्जींतील माधव नांवाच्या गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थ्याला उपदेश मिळाला. गुरूंनीं त्याला श्रीनारायणतीर्थ असें नांव देऊन वीर रामचंद्रमूर्ती व दंड दीक्षा, मुद्रादि आवश्यक सरंजाम दिला.

श्रीनारायणतीर्थ स्वामींनी भटकळ येथें येऊन शके १३९८ (सन १४७६) सालीं माध्वसंप्रदायी गौडसारस्वत वैष्णव पीठाची स्थापना केली.

मध्वमताच्या या गौड सारस्वत वैष्णव संप्रदायाच्या परंपरेंत श्रीमन्नारायणतीर्थ स्वामींपासून श्रीमद्द्वारकानाथतीर्थ स्वामींपर्यंत पुढीलप्रमाणें २२ पीठाधीश होऊन गेले :—

१ **श्रीमन्नारायणतीर्थ** – माध्वमताचे गौड सारस्वत वैष्णव पीठाचे हे आद्य संस्थापक. हे वेदान्तादि सच्छास्त्रांत प्रवीण होते. यांची योग्यता पाहून केळदीनगरच्या राजाने त्यांना आपली 'वडेर' ही पदवी पीठपरंपरेसाठीं बहाल केली.

२ **श्रीमद्वासुदेवतीर्थ** – हे योगी व तत्त्वज्ञानी होते. यांनी अनेक तीर्थयात्रा केल्या.

३ **श्रीमद्जीवोत्तमतीर्थ** – विद्वत्ता व प्रभावी व्यक्तिमत्त्व यांमुळें यांची कारकीर्द बरीच गाजली. यांनी उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत बहुतेक सर्व यात्रा केल्या. तीर्थावळ नांवाचें यांचें मराठी काव्यपुस्तक लोकप्रिय आहे. बदरीच्या यात्रेंत असतांना हिमालयांत नेपाळच्या गंडकी नदींत यांना श्रीदिग्विजयविठ्ठल, भूविजयविठ्ठल व वीरविठ्ठल अशा तीन मूर्ती मिळाल्या. त्यांतील पहिली त्यांनी बसरूर मठांत, दुसरी कोटितीर्थाजवळच्या गोकर्ण मठांत आणि तिसरी इष्टदेवता म्हणून स्वतःच्या देव्हाऱ्यांत ठेवली. तीच आज पीठाधीशांची इष्टदेवता श्रीवीरविठ्ठल म्हणून प्रसिद्ध आहे. गोकर्ण येथील मठाला 'श्रीगोकर्ण–जीवोत्तम मठ' असें नांव या स्वामींमुळेंच पुढें चालू झालें, आणि हाच मठ मुख्य ठरला.

४ **श्रीमत्पुरुषोत्तमतीर्थ** – बोलण्यांत व लिहिण्यांत हे कुशल होते. संन्यासपद्धति व कर्मसिद्धांत असे यांचे दोन धर्मग्रंथ प्रसिद्ध आहेत.

५ **श्रीमद् अणुजीवोत्तमतीर्थ** – विद्वत्ता व कार्य यांमुळें यांची कारकीर्द बरीच गाजली.

६ **श्रीमद्रामचंद्रतीर्थ** – हे महान् योगी, विद्वान् व प्रभावी वाणीचे होते. सांप्रतच्या गोकर्ण मठामागील भूगर्भांत यांना श्रीराम, सीता, लक्ष्मण व मारुती अशा चार मूर्ती सांपडल्या. त्यांपैकीं पहिल्या तीन पर्तगाळी येथें स्थापन करून तेथें त्यांनी मठ उभारला. ही स्थापना शके १५७८ (सन १६५६) सालीं झाली. श्रीमारुतीची स्थापना रिवण येथील मठांत त्याच वर्षी करण्यांत आली. मठासाठीं रिवणच्या ग्रामस्थांनी जागा तर दिलीच आणि मूर्तींची पूजा, अर्चा, अमृतपड, नंदादीप व आवश्यक उत्सव यांच्या खर्चासाठीं नारळी, पोफळीच्या बागाही दिल्या. वृद्धापकाळीं या स्वामींचा निवास रिवण मठांतच होता. यांची तपश्चर्येची गुहा अजून मठाच्या खालच्या बाजूनें झऱ्याजवळ आहे. याच मठांत अखेर त्यांनी योगबलाने देहत्याग केला. श्रीमारुतीसमोरच त्यांचें वृंदावन आहे.

या स्वामींजींच्या कालांत मठसंस्थानचा सर्व व्यवहार पर्तगाळी येथूनच चालत असल्याने या मठालाच मुख्य मठाचा दर्जा मिळून तेव्हांपासून त्याला 'श्रीगोकर्ण - पर्तगाळी जीवोत्तम मठ' असें नामाभिधान प्राप्त झालें.

७ श्रीमद्दिग्विजय रामचंद्रतीर्थ — यांनी मतप्रचारार्थ अनेक ठिकाणीं दिग्विजय केला. रिवण येथील मठांत यांचेंही बराच काल वास्तव्य होतें. ते योगी होते.

८ श्रीमद्रघुचंद्रतीर्थ — हे वेदान्तशास्त्रनिपुण होते. श्रीमत्लक्ष्मी-नारायणतीर्थ हे यांचे पहिले शिष्य गोकर्ण – पर्तगाळी पीठाधीश झाले, दुसरे श्रीव्यासतीर्थ योगसाधनांतच मग्न होऊन गेले आणि तिसरे श्रीसंयमींद्र-तीर्थ हे येथील संबंध सोडून काशी येथें गेले.

९ श्रीमत्लक्ष्मीनारायणतीर्थ — यांनी आपल्या मताचा ठीक प्रचार केला.

१० श्रीमत्लक्ष्मीकांततीर्थ — हे मोठे विद्वान् होते. अल्पकालांतच हे वृन्दावनस्थ झाले.

११ श्रीमद्रमाकांततीर्थ — यांची वाणी अधिकारयुक्त होती.

१२ श्रीमत्कमलाकांततीर्थ — हे विद्वान् व निःस्पृह होते.

१३ श्रीमत्श्रीकांततीर्थ — हे धर्मकार्यधुरंधर होते; पण यांची कारकीर्द अल्पकालीन ठरली.

१४ श्रीमद्भूविजय रामचंद्रतीर्थ — दक्षिणेकडील दिग्विजयांत यांनी चांगला मान मिळविला.

१५ श्रीमद्रमानाथतीर्थ — यांचें तपस्तेज मोठें होतें. जपाच्या वेळीं व्यत्यय येतो म्हणून यांनी एकदां अंगांतील ताप दंडकाष्ठावर ठेवला अशी आख्यायिका आहे.

**१६ श्रीमत्‌लक्ष्मीनाथतीर्थ** – यांच्या आशीर्वादाने पुत्रलाभ झाला म्हणून बडोद्याच्या गायकवाड राजानें त्यांचा दरबारी थाटांत मोठा सत्कार केला.

**१७ श्रीमदानंदतीर्थ** – यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक मठांचा जीर्णोद्धार केला.

**१८ श्रीमत्‌पूर्णप्रज्ञतीर्थ** – हे मोठे विद्वान, वेदवेदांगवेदांतपारंगत व दाते होते. यांनीं ठिकठिकाणीं मतप्रचार केला व अनेक यात्राही केल्या. त्रावणकोर, कोल्हापूर इ. संस्थानच्या राजांकडून यांचा मोठा सन्मान करण्यांत आला.

**१९ श्रीमत्‌पद्मनाभतीर्थस्वामी** – यांना आपल्या गुरूंकडून ब्रह्मसूत्रें, न्यायसुधा, न्यायशास्त्र वगैरेचें उत्तम शिक्षण लाभलें. मठाच्या उत्पन्नांत यांनी बरीच भर घातली. यांच्याच कारकिर्दीत सरकारकडून स्वामीजींचा मठाचा संपूर्ण अधिकार मान्य झाला.

**२० श्रीमद्‌इन्दिराकान्ततीर्थस्वामी श्रीपाद वडेर** – श्रीगोकर्णपर्तगाळी मठाचे हे विसावे पीठाधीश म्हणजे हल्लीच्या कालांतील एक असामान्य व अद्वितीय विभूति असून प्रस्तुत चरित्राचे नायक असल्यानें त्यांच्या चरित्राच्या व कर्तृत्वाच्या सर्व पैलूंचें या चरित्रग्रंथांतून क्रमवार स्पष्ट दर्शन होणारच आहे.

**२१ श्रीमत्कमलानाथतीर्थस्वामी श्रीपाद वडेर** – गुरूंना साजेल अशाच योग्यतेचे हे विद्वान् पंडित व धर्मशास्त्रपारंगत असून मनाचे फार कोमल व प्रेमळ असे होते. यांना शके १८२९ (सन १९०७) सालीं आश्रम मिळाला व शके १८६४ च्या अक्षयतृतीयेदिनीं पट्टाभिषेक झाला. तथापि १८६५ च्या चैत्र शु. ११ शी दिवशीं म्हणजे अवघ्या साडेअकरा महिन्यांच्या अल्पावधींतच ते मुक्त झाले. त्यांच्या स्वतंत्र कारकिर्दीला दीर्घ-

काल लाभला नाही; तरी आश्रम दिल्याबरोबर लगेच गुरुस्वामींनी त्यांकडे संस्थानचा कारभार सोंपवून ते निवृत्त झाले होते. आपल्या पूज्य गुरुस्वामींच्या छायेखालीं कारभाराची सूत्रें कुशलतेनें हलविण्याचें भाग्य त्यांना बराच काल लाभलें. हे दयाळू असल्याने गरिबांना व अनाथांना यांचा मोठा आधार होता. यांनी मठाच्या उत्पन्नांत बरीच वाढ केली.

२२ **श्रीमद्द्वारकानाथतीर्थस्वामी श्रीपाद्र वडेर** – वैशाख व. ७ मी शके १८६४ (सन १९४२) रोजीं यांना आश्रम मिळाला. चैत्र व. ८ मीं शके १८६५ (सन १९४३) रोजीं पट्टाभिषेक होऊन यांची कारकीर्द सुरू झाली आणि फाल्गुन व. ६ ष्ठी शके १८९४ (सन १९७३) रोजीं हे वृंदावनस्थ झाले.

यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक महत्वाचीं कार्यें पार पाडलीं. हिंदुसमाजाच्या हिताचीं अनेक कृत्यें उत्स्फूर्त केलीं. सर्व मठाधीशांची परिषद्, सर्वधर्म परिषद्, हिंदुसंस्कृति परिषद्, अशा परिषदांत प्रत्यक्ष भाग घेतला. मठातर्फे मराठी शाळा, संस्कृत पाठशाळा, ग्रंथालयें उघडून विद्यार्थ्यांची उत्कृष्ट सोय केली. ते विद्वान असून प्रभावी प्रवचनकार होते. त्यांची वाणी अधिकारी, बोलणे गोड व शब्द प्रेमळ होते. संस्कृत, हिंदी, मराठी, कोंकणी, कानडी, इंग्रजी अशा विविध भाषांतून ते अस्खलित बोलत. नवीन कायद्याच्या निमित्ताने कर्नाटकांतील भाताच्या उत्पन्नास बसलेल्या धक्क्याने मठाची वसगलेली आर्थिक बाजू मुंबईला मठ उभारून त्यांनी सांवरली. त्यांची बेंगलोर मठाची योजनाही फायदेशीर झाली.

धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक सुधारणांसंबंधीं त्यांच्या अनेक योजना होत्या. हिंदुधर्मतत्त्वांचा परिचय करून देणारे पुराणिक, कीर्तनकार, प्रवचनकार, असे प्रचारक कार्यप्रवृत्त करावे अशीही त्यांची योजना होती. तथापि आर्थिक अडचणीमुळें त्या योजना लवकर पुढें येऊं शकल्या नाहींत! यांनीं अनेक विद्वानांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन दिलें. गरिबांनाही मदत केली. असें

त्यांचें कार्य विविध स्वरूपी व अफाट असल्याने त्यासाठीं स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल यांत संशय नाहीं.

२३ **श्रीमद्विद्याधिराजतीर्थस्वामी श्रीपाद वडेर** — ( आश्रम शके १८८८, सन १९६७. पट्टाभिषेक चैत्र शु. २ या शके १८९५ एप्रिल ५ सन १९७३ ) यांची उत्साही कारकीर्द नुकतीच सुरू झाली असून ती त्यांच्या तडफदार पण चतुर वृत्तीने, विद्वत्तेने, श्रीरामदेव वीरविठ्ठलाच्या कृपेनें आणि शिष्यवर्गाच्या सदिच्छेनें गत २२ पीठाधीशांच्या कर्तबगारींत ठळकपणें झळकेल अशी सबळ आशा आहे.

आतां पुढील प्रकरणापासून श्रीमद्इन्दिराकांततीर्थ स्वामींचें चरित्र सादर होत आहे.

२

# स्वामीजींचा जन्म

मनुष्यजीवन अजून अपूर्ण भासत असल्यानें त्याच्या विकासासाठीं आजवर धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा विविध घडामोडी झाल्या व होत आहेत; पण त्याला हवें तें अजून प्राप्त न झाल्याने त्याची अपूर्णता तशीच आहे. ज्या वस्तूच्या प्राप्तीसाठीं आतांपर्यंत प्रयत्न झाले, त्यांत कांहीं सफल झाले, तरी सामान्य मनुष्याच्या जीवनांत अजून अज्ञानच आहे.

## परमात्म्याचा शोध

भारतांत चार हजार वर्षांपूर्वी जेव्हां मानवी मन अनेक उपाधींनी ग्रस्त झालें नव्हतें, तेव्हां मनुष्यहृदयांत नित्य जागरूक असणाऱ्या परमात्म्याचा शोध लागला. ज्या तपस्वी ऋषिमुनींनीं हा शोध लावला, त्यांनी आपल्या अनुभवाचे उद्गार इतरांच्या कल्याणासाठी उपनिषद्रूपाने ग्रथित केले.

## उत्क्रांतीला सहाय्य

नंतरच्या कालांत वेळोवेळीं देशाच्या जीवनांत विविध बदल घडले आणि प्रत्येक वेळीं अनेक विभूति व सिद्धपुरुष अवतीर्ण होऊन त्यांनी मानवी जीवनाच्या उत्क्रांतीला फार मोठें साहाय्य केलें.

## नास्तिकवाद

तथापि वर्तमानकालीं आधिभौतिक शास्त्रांच्या साहाय्याने जगांतील सर्व देशांचें जीवन एकमेकांशीं इतकें निगडित झालें आहे आणि त्यामुळें

निरनिराळ्या शास्त्रकलांचा परिणाम एकमेकांवर असा होऊं लागला आहे कीं, त्यामुळें आपल्या जीवनांतील प्राणभूत भागही नष्ट होण्याचा संभव दिसत आहे. हा नास्तिकवाद कठीण आहे !

## विभूतींची गरज

अशा अनेक कारणांनी उत्पन्न झालेल्या नास्तिकवादांत शास्त्रीय ज्ञानाच्या दुरुपयोगाची भर पडल्यानें सद्यःस्थितींत आपलें धार्मिक जीवन किती संकटग्रस्त व निर्जीव झालें आहे तें पाहिलें म्हणजे त्याला सजीवता प्राप्त करून देणाऱ्या विभूतींची किती आवश्यकता आहे हें दिसून येतें. परमेश्वर सर्वत्र आहे हें सत्य सर्वांच्या अनुभवास येण्याचा मार्ग जसा आपल्या प्राचीन ऋषिमुनींनी सांगितला त्याप्रमाणें आपल्या बदलत्या जीवनांतही सर्व प्रकारच्या व्यवहारांत प्रभूच्या प्रभुत्वाचा अनुभव प्रत्ययास आणूं शकणारा साधनमार्ग सांगणाऱ्या विभूतींचीही आजच्या काळांत अत्यंत गरज असल्याचें जाणवत आहे.

## अध्यात्म

वैदिक ऋषींच्या उच्चतम स्तरावरील चिंतन-मननांतून प्रकटलेलें व उपनिषदांतून सुस्पष्ट झालेलें अध्यात्म हें प्रखर वैदिक तत्त्वज्ञान आहे. आत्म्याच्या अमरत्वाचा तेजस्वी संदेश त्यांतून उद्घोषित झालेला आहे. मोह-भयरहित, पूर्ण स्वावलंबी, परम पुरुषार्थी आणि विश्वशक्तीशीं एकत्व पावलेलें तें वैदिक अध्यात्म सर्व सर्वज्ञ विभूतींना अभिप्रेत आहे.

## कर्नाटकाचें भाग्य

अशा आद्य आचार्यांसारख्या महान् विभूतींच्या पात्रतेचें स्थान लाभलेले श्रीमद्इंदिराकांततीर्थ स्वामीमहाराज यांच्या जन्मयोगाचें भाग्य उत्तर कर्नाटकाला लाभलें.

## जन्म

श्रीशके १७९३ प्रजापती संवत्सर माघ शुद्ध ७ मी गुरुवार रोजीं कारवार जिल्ह्यांतील भटकळ येथें यांचा जन्म झाला. भटकळ ही एक पूर्व-प्रसिद्ध नगरी असून 'गोपीनाथ' नांवाच्या सुंदर सरितेमुळें तिला अपूर्व निसर्गसौंदर्य लाभलें आहे. नगरीची रचनाही वेधक अशी आहे.

## पंडित घराणें

याच भटकळ नगरींत पुराणिक उपनांवाचें बरेंच जुनें एक माध्वसांप्रदायी गौड सारस्वत घराणें आहे. या घराण्यांत पूर्वीपासून अनेक विद्वान् पंडित होऊन गेल्यानें पंडित घराणें अशी त्याला संज्ञा प्राप्त झाली आहे. गेल्या शतकांत पं. अनंत पुराणिक हे माध्व तत्त्वज्ञानी महान् विद्वान् या घराण्यांत होऊन गेले. ते संस्कृत भाषाप्रवीण, वेदशास्त्रपारंगत व अग्निहोत्री होते. संस्कृत भाषेंत त्यांनी आर्यापल्लवमाला, आर्याप्रवालमाला व आर्याप्रसूनमाला असे वेदांतपर महत्त्वाचे ग्रंथ लिहिले.

पं. अनंत पुराणिक अध्यापनांतही फार प्रवीण होते. त्यामुळें त्या भागांतील वेदांत, व्याकरण, न्यायशास्त्र वगैरे विषयांचे अनेक विद्यार्थी त्यांकडून विविध विद्या संपादन करून अनेक विषयांत प्रावीण्य मिळवून गेले. यांचे वडील बंधु रामकृष्ण पुराणिक हे वेदांताचार्य व सोमयाजी होते. विद्यादानांत अनंत पंडितांना यांची फार मदत होई.

## गोत्र व कुलदेव

पुराणिक घराण्याचें गोत्र भारद्वाज हें असून कुलदेवी श्रीशांतादुर्गा (गोठण) आहे. श्रीविजयादुर्गा व श्रीलक्ष्मी-नरसिंह यांच्याशींही या घराण्याचा संबंध आहे. पुढें या घराण्याच्या दोन शाखा झाल्या. एका घराण्याचें देवस्थान श्रीआदिकेशव व दुसऱ्याचें श्रीनरसिंह. पुराणिकांचीं हीं दोन्ही मंदिरें त्या भागांत चांगलीं प्रसिद्ध आहेत.

श्रीगोकर्ण-पर्तगाळी पीठाचा आद्य मठही भटकळ येथेंच गोपीनाथ नदीकांठीं होता; त्यामुळें भटकळ नगरीस त्या कालीं विशेष महत्त्व आलें होतें.

## गुरुपरंपरामृतकर्ते


याच पुराणिक घराण्यांतील पं. नरसिंह पुराणिक हे मोठे विद्वान होते. पुराणप्रवचनाच्या प्रभावी वक्तृत्वाने त्यांचें नांव दाक्षिणेकडे बरेच गाजत होतें. यांनीं श्रीगोकर्ण-पर्तगाळी मठाच्या दप्तरांतील कागदपत्रांचें संशोधन व संकलन करून 'श्रीगुरुपरंपरामृत' हें गोकर्ण-पर्तगाळी मठाच्या ऐतिहासिक माहितीचें पुस्तक लिहिलें.

## मातृ-पितृदैव

अशा या भटकळ नगरींतील सुप्रसिद्ध विद्वान घराण्यांत चरित्रनायक गुरुवर्य श्रीमद्इंदिराकांततीर्थ स्वामीमहाराज अवतीर्ण झाले. यांचें मूळ नांव रामकृष्ण पुराणिक हें असून त्यांचे पिता विद्वान पंडित नरसिंह पुराणिक आणि माता सौ. लक्ष्मी या होत.

# जन्म–टिपण

श्रीमन्नृप शालिवाहन शके १७९३ प्रजापति नाम संवत्सरे माघ मासे शुक्लपक्षे अद्य तिथि सप्तमी गुरुवासरे घटी ४८-५२, सूर्य नक्षत्र धनिष्ठा भुक्त घटी ४७-११, चंद्र नक्षत्र भरणी भोग्य घटी ३९-३२, ब्रह्मनामयोग घटी ४९-५, गरिजा करण १८-८ सामान्य १-४८ अमृत २६-५२ एवं पंचांगशुद्धिः तद्दिने सूर्य पश्चिमप्रतिष्ठानंतर घटी ८-४५ परिमित समये कन्या लग्ने बुध क्षेत्रे सूर्यहोरायां, शुक्रद्रेष्काणे शुक्रनवांशे सूर्य द्वादशांशे शुक्रत्रिंशांशे एवं षड्वर्गयुक्त वेलायां जन्मकालः तज्जन्मभं भरणी चतुर्थांघ्रिः धर्मराज दैवत राशीमेषाख्या राशीशः कुजः क्षत्रिय वर्णः गजयोनिः मानवगणः मध्यनाडीः मासनाम अच्युतः नक्षत्रनामः लोकेशः जन्मसमय भरणी नक्षत्र सर्वघटी ६३ तत्काले भुक्त घटी ३७-३५ शेष घटी १-५७ नक्षत्रमार्गेण भुक्त भोग्य प्रमाणेन एष्य शुक्रमहर्दशा (महादशा) वर्ष ०-६-१२ देवद्विजप्रसादाद्दीर्घायुर्भूयात् ॥ शुभम् ॥



४

# विद्यार्जन

चरित्रनायक पुराणिक हे लहानपणापासून दिसण्यांत तेजःपुंज होते. वागणूक बाणेदार, करारी व निःस्पृह असे. चौकस दृष्टी, प्रेमळ स्वभाव, गोड भाषण व प्रसन्न वदन यांमुळें हा मुलगा आईबापांप्रमाणेंच सगळ्यांना प्रिय वाटे. आपल्या घराण्यास अनुसरून स्वतःप्रमाणेंच आपल्या या चिरंजिवानेही विद्वान होऊन चांगला नांवलौकिक मिळवावा अशी पं. नरसिंह पुराणिक यांची उत्कट इच्छा होती. त्याप्रमाणें लहान वयांतही आपल्या या मुलाकडून त्यांनी देवदेवतांचीं संस्कृत स्तोत्रें पाठ करवून घेऊन रोज संध्याकाळीं हातपाय धुऊन देवापुढें म्हणून घेण्याचा परिपाठ ठेवला होता.

## पाठशक्तीचा प्रभाव

व्रतबंधसंस्कारानंतर त्यांची विद्यार्जनास पद्धतशीर सुरवात झाली. धारणाशक्ती जबर असल्याने वडिलांनी नेमून दिलेले विषय झटपट तयार करण्यास त्यांना हरकत वाटत नव्हती. पुराणिकांचें घर हें एक संस्कृत विद्यालयच असल्याने अध्ययनासाठी त्यांच्याकडे अनेक विद्यार्थी येत असत. तथापि हीं मुलें चरित्रनायकापेक्षां वयाने मोठीं होतीं. तीं जो विषय घोकून पाठ करीत तो या छोट्या मुलाने लक्षपूर्वक ऐकून तोंडपाठ म्हणावा असा त्यांच्या पाठशक्तीचा प्रभाव होता.

## पोथीवांचून स्तोत्रें मुखोद्गत

एके दिवशीं अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अष्टाध्यायीचा पाठ चालला होता. त्यांतील कांही सूत्रांचा वर्णोच्चार फार क्लिष्ट असल्याने त्यांचा

उच्चार करतांना मुलांची तारांबळ होई. तथापि चरित्रनायकाने तीं कठीण सूत्रें अगदीं सहज उच्चारून सर्वांना थक्क केलें. असें करतां करतां केवळ गमतीनें त्यानी पोथीच्या सहाय्यावांचून बहुतेक अष्टाध्यायीचीं सूत्रें मुखोद्गत केलीं.

## माध्व तत्त्वज्ञानाकडे कल

त्यांच्या विद्यार्जनांतील वेदाध्ययनास सुरवात झाली तेव्हां त्यांना क्षणाचीही फुरसत मिळत नसे; तथापि तशा स्थितींतही केव्हां केव्हां सवड साधून माध्व तत्त्वज्ञान समजून घेण्याकडे त्यांची दृष्टी वळे. अशा रीतीने विद्यार्थीदशेंतच त्यांचा कल द्वैत मताच्या माध्व तत्त्वज्ञानाकडे झुकला होता.

## भारतीय तत्त्वज्ञानाचा लाभ

काव्य, व्याकरण, न्याय, मीमांसा, वेदांत, अलंकार वगैरे शास्त्रें समजून घेतल्यावर त्यांनी पुराण सांगण्याकडे आपली दृष्टी वळविली. पुढें त्यांनी आपल्या गोड संस्कृत भाषेंत लेखन करण्यासही आरंभ केला. या काळांत व नंतर त्यांनी उपनिषदांचा जो सखोल अभ्यास केला आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा उच्च लाभ करून घेतला तो त्यांना पुढील आयुष्यांत फारच हितावह झाला.



श्रीमद् इंदिराकांत तीर्थ स्वामीजींचे गुरु
श्रीमत् पद्मनाभ तीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी



श्रीमदिन्दिराकांत तीर्थ श्रीपाद् वडेर स्वामी महाराज
व त्यांचे गुरु श्रीमत् पद्मनाभ तीर्थ श्रीपाद् वडेर स्वामीजी

## ५.

# आश्रमस्वीकार

श्रीगोकर्ण-पर्तगाळी पीठाचे १९ वे पीठाधीश श्रीमत्पद्मनाभतीर्थस्वामी यांनी शिष्यस्वीकार करण्याचें ठरविलें व पीठाच्या विचारवंत अनुयायांची बैठक घेतली. त्या बैटकींत एकमताने शिष्याची निवड करून मागणीच्या विनंतीसाठीं मठाच्या चौघां अनुयायांचें एक शिष्टमंडळ नियुक्त झालें.

## बटूचें आगमन

त्यापूर्वी बटूचें जन्मटिपण मागवून आणलें आणि त्यांत संन्यासयोग असल्याचें निश्चित करून घेतल्यानंतर चिठ्ठयांवाटे श्रीरामदेवाचा कौल घेतला. त्यानंतर शिष्टमंडळ भटकळ येथें जाऊन पुराणिकांकडे रीतसर विनंती करून बटूंसह लवाजम्यानें पर्तगाळी येथें आलें.

मठाचे भावी शिष्यस्वामी तेजःपुंज पुराणिक बटू यांचें पर्तगाळी येथें थाटाचें स्वागत झालें. मठाच्या उपस्थित अनुयायांनीं त्यांचें फार कौतुक केलें.

## संन्यासदीक्षा

ज्योतिर्विद शास्त्र्यांकडून उत्कृष्ट मुहूर्त पाहून त्या मुहूर्तावर बटूला आश्रम देण्याचें निश्चित झालें आणि त्याप्रमाणें या शुभकृत्यासाठीं शके १८०८ व्यय नाम संवत्सर वैशाख शुद्ध दशमी गुरुवार (ता. १३ मे १८८६) हा दिवस शुभ मुहूर्ताचा दिवस म्हणून मुक्रर झाला. निमंत्रणें जातांच या समारंभासाठीं चारही बाजूंचे मठानुयायी जमले आणि संन्यासदीक्षेच्या कार्यास आरंभ झाला.

## ६

# दीक्षोत्तर अध्ययन

श्रीमद् इन्दिराकांत हें नामाभिधान प्राप्त होऊन श्रीगुरुस्वामीकडून दीक्षा मिळाल्यानंतर कर्नाटकांतील एका प्रख्यात पंडिताची या शिष्यस्वामींना अध्ययनाच्या बाबतींत मार्गदर्शन करण्यासाठी योजना झाली. वास्तविक या मार्गदर्शनाची त्यांना फारशी आवश्यकताच नव्हती. कारण दीक्षा मिळण्यापूर्वी त्यांचा बराच अभ्यास झाला होता आणि पुढील ज्ञान मिळविण्यासाठी कोणत्या ग्रंथांचें कसें अध्ययन झालें पाहिजे याचीही त्यांना ठीक माहिती होती. तरीपण मठसंस्थानच्या रिवाजाप्रमाणें पंडिताची या कामीं योजना झाली आणि या शिष्यस्वामीजींनी त्याच्या मार्गदर्शनाचा फायदाही घेतला. तथापि दीक्षोत्तर अध्ययनांत त्यांना आपल्या गुरुस्वामींचेंच मार्गदर्शन अधिक हितावह झालें.

## वेदाध्ययन

दीक्षेनंतर त्यांच्या सर्वांगीण सच्छास्त्राध्ययनास आरंभ झाला. संहिता, शिक्षा, ज्योतिष, छंद, निघंटु, निरुक्त षडंग वेदाचें अध्ययन जोरांत चालू झालें आणि अवघ्या पांचसहा वर्षांत काव्य, व्याकरण, न्याय, मीमांसा, अलंकार, वेदांत वगैरे सर्वच विषयांत ते पारंगत झाले. स्वामीजींची विद्याग्रहणशक्ती, कुशाग्र बुद्धी, चातुर्य इ. पाहून अनेक पंडित चकित होऊन गेले.

एकंदरींत वेद, षड्दर्शनें, स्मृतिग्रंथ, पुराणें इ. ग्रंथांचा मनःपूर्वक अभ्यास करून मनन करणे आणि तोही अल्प काळांत हें सामान्य व्यक्तीला सहज साधणारें नव्हतें.

## पात्रता

ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडूक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक अशा मुख्य दहा उपनिषदांचा अभ्यास तर त्यांनी फार चांगला केला. सहा वेदांगें, सहा शास्त्रें किंवा षड्दर्शनें; विशेषतः अद्वैत, विशिष्टाद्वैत, द्वैताद्वैत, द्वैत, शुद्धाद्वैत यांचा तुलनात्मक अभ्यास करून द्वैतमत हेंच ग्रहणीय कसें आहे हें त्यांनी पटण्यासारख्या पुराव्यांनिशीं सिद्ध करण्याची पात्रता प्राप्त करून घेतली.

## गुरुशिष्य

पीठाचे गुरुस्वामी श्रीमत्पद्मनाभतीर्थ हे स्वामीजींचे मातुळ व अध्ययनाचेही श्रेष्ठ गुरु, पण त्यांचें सान्निध्य शिष्यस्वामी श्रीमदिन्दिराकांततीर्थ यांना फार काळ लाभलें नाही. आश्रमस्वीकारानंतर सहा वर्षांनी गुरुस्वामी मुक्त झाले. तथापि या अर्धतपाच्या अल्पकाळांतही गुरुस्वामींनी या प्रिय शिष्यांना वैदिक, धार्मिक, सामाजिक, मठसंस्थानची व्यावहारिक वगैरे आवश्यक असलेली सर्व माहिती स्वतःच्या अनुभवासह मोठ्या प्रेमाने दिली. या गुरुशिष्यांचें नातेंही मोठें अपूर्व असेंच होतें. शिष्यांच्या अंतःकरणांत गुरूविषयीं जितका असामान्य आदर होता, तसेंच गुरूंचेंही शिष्यावर अलौकिक कृपाप्रेम होतें. ते शिष्यस्वामींचं फार कौतुक करीत. आकर्षक पद्धतीनें पुराण सांगण्याची वेधक शैली पाहून आणि श्रोतृवृंदाकडून त्या सुरस पुराणाबद्दलचें होत असलेलें कौतुक ऐकून गुरूंना फार समाधान वाटे. विशेषतः पुराण सांगतांना विषयाचें स्पष्टीकरण करण्याची वेधक वृत्ति आणि त्यांतून सहज प्रकट होणारें द्वैत मतांचें दिग्दर्शन गुरूंना फार आवडे. अखेर विद्येचें व व्यवहाराचें योग्य ज्ञान शिष्यांना मिळाल्याचें समाधान मानून शके १८१४ आषाढ शुद्ध ७ मी शुक्रवारीं गुरुस्वामी वृन्दावनस्थ झाले.

# पट्टाभिषेक

गुरुस्वामी श्रीमत्पद्मनाभतीर्थ यांच्या निर्याणानंतरच्या द्वादशदिनांचा धार्मिक विधि यथासांग पार पडला. जपजाप्य, वैदिक पारायणें, दानधर्म सत्पात्र वैदिकांकडून यथाशास्त्र झालीं. ब्राह्मणसंतर्पण, समाराधना यथोचित झालीं. उपस्थित मठानुयायी व अन्य भाविक यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला आणि गुरुस्वामींच्या निर्याणाच्या द्वादशदिनांचा विधि पूर्ण झाला.

## पट्टाभिषेकाचा आरंभ

त्यानंतर त्याच दिवशीं म्हणजे आषाढ वद्य तृतीया शके १८१४ ता. १३ जुलै १८९२ रोजीं संध्याकाळी पीठाच्या नियमाप्रमाणे श्रीमद्-इंदिराकांततीर्थ स्वामी यांच्या पट्टाभिषेकाच्या कार्यक्रमास सुरवात झाली.

## गुरुवर्यांचें स्मरण

देवदर्शन वगैरेनंतर स्वामी पीठाच्या उच्चासनाकडे येऊं लागले. यावेळीं त्यांच्या मनांत गतकालीन सुप्रसिद्ध पीठाधीशांसंबंधींचे विचार आले. गत एकोणीस गुरूंपैकीं ज्यांच्याकडून विशिष्ट कामगिरी घडली अशा गुरु-वर्यांचें त्यांना स्मरण झालें.

## जबाबदारी

पीठाचे आद्य संस्थापक श्रीमन्नारायणतीर्थस्वामी चारही धामांच्या यात्रा करून व गंडकी नदींत लाभलेल्या तीन विठ्ठलमूर्तींची स्थापना करून

माध्वमताच्या प्रसाराने दिगंत कीर्ति मिळविलेले श्रीमत्‌जीवोत्तमतीर्थस्वामी, पर्तगाळी मठाचे संस्थापक महान् योगी श्रीमद्रामचंद्रतीर्थस्वामी, योगज सामर्थ्याने अंगांतील ताप दंडकाष्ठावर ठेवणारे योगी श्रीमद्रमानाथतीर्थस्वामी, महान् विद्वान श्रीमत्पूर्णप्रज्ञतीर्थस्वामी आणि नुकतेंच ज्यांचें निर्याण झालें ते विद्वद्वर्य व व्यवहारचतुर आपले गुरु श्रीमत्पद्मनाभतीर्थस्वामी यांच्या यशस्वी कारकिर्दी, उपयुक्त कार्य आणि लौकिक लक्षांत आणून पीठाची महान् जबाबदारी त्यांच्या दृष्टीपुढें आली.

अशा या अत्यंत जबाबदारीच्या पीठाधीशांच्या उच्चासनावर आरोहण करतांना यशप्राप्तीसाठी पुन्हा एकदा त्यांनी मनांतच श्रीरामदेव वीरविठ्ठल यांना नमस्कार केला व पावलें पुढें टाकलीं.

## पीठारोहण

आसनाच्या दक्षिण बाजूस प्रथम जाऊन पीठाच्या त्या उच्चासनाला नमस्कार केला आणि दक्षिण पाद पुढें करीत पूर्वेकडे मुख करून ते आसनस्थ झाले. पीठारोहणानंतर सर्वत्र जयजयकार झाला. वाद्यें वाजूं लागलीं. पीठानुयायी व अन्य भाविकांकडून पीठाच्या, पीठाधीशांच्या व नूतन पीठाधिकारी स्वामींच्या जयजयकाराने दशदिशा दणाणून गेल्या.

शुभचिंतन, आशीर्वादादि कार्यक्रमानंतर निरनिराळ्या पीठानुयायांकडून पादपूजा झाल्या आणि फलमंत्राक्षतादि होऊन पट्टाभिषेकाच्या ह्या महत्त्वपूर्ण उत्सवाची सांगता झाली.

८

# स्वामीजींचें व्यक्तिमत्त्व

श्रीमद् इन्दिराकांततीर्थ स्वामीजींचें व्यक्तिमत्त्व फार प्रभावी होतें. त्यांच्या उपजत प्रेमळ वृत्तीनें आणि हास्यवदनामुळें कोणताही मनुष्य सहज त्यांच्याकडे आकार्षित होई.

बालपणीं आपल्या संवगडयांकडे, पुढें शालेय सोबत्यांकडे आणि अन्य सज्जनांकडेही त्यांची वागणूक इतकी प्रेमाची असे कीं, सर्वांनाच ते आपल्या जिवाचा कलिजा वाटत.

बुद्धी कुशाग्र असल्याने आणि तिला धारणाशक्तीची जोड लाभल्यानें आचार्यांनी नेमून दिलेले विषय झटपट तयार करण्यांत संस्कृत वर्गांत हेच विद्यार्थी प्रमुख असत. विद्यालयीन सर्व छात्रगण त्यामुळें यांनाच आपले नेते मानीत.

यांची वृत्ति करारी असल्याने साधकबाधक प्रश्न लक्षांत घेऊन त्यांनी एकदां ठरवलेली गोष्ट सहसा बदलत नसे.

## सत्यमार्गी

ते सत्यमार्गी असल्याने त्याउलट वागणाऱ्यांबद्दल त्यांना अत्यंत वाईट वाटे. अशा व्यक्तींची सौम्य शब्दांत ते कानउघाडणी करीत आणि जेव्हां तिचाही उपयोग होत नसे, तेव्हां मात्र त्यांना राग येई. खोटें बोलणें, एखाद्या निरपराध्यावर खोटे मुद्दे लादून असत्य हल्ले चढवणें त्यांना कधींच सहन होत नसे. तरीदेखील अशा व्यक्तींना सद्बोधानें ताळ्यावर आणण्याचा

ते प्रयत्न करीत. तथापि जेव्हां त्याचाही उपयोग होत नसे तेव्हां मात्र त्या व्यक्तीला ते आपणासमोरून लवकर दूर होण्यास निक्षून सांगत. आणि अशा व्यक्तीला पुढें अशी कांहीं अद्दल घडे कीं, तिला त्यामुळें जन्मभर पश्चात्ताप करावा लागे. म्हणून असा द्रोह न घडण्याबद्दल प्रत्येक सुज्ञ मनुष्य जपत असे.

## कल्याणकारक आशीर्वाद

सत्यमार्गी सज्जनांवर त्यांचें फार प्रेम असे. एखाद्याचें सत्कृत्य पाहून त्यांना इतका आनंद वाटे कीं, त्या भरांत त्यांनी दिलेला आशीर्वाद त्या सज्जनाला फार कल्याणकारक होई.

## तेजस्विता

जपजाप्य-श्रेय आणि योगसामर्थ्य त्यांच्या शुद्ध, सात्विक आणि पवित्र आचरणाला पूर्णांशानें लाभल्यानें स्वामीजींचें व्यक्तिमत्त्व नेहमीच प्रसन्न व तेजस्वी असे. त्यांचें दर्शनसुख भाविकांना अद्वितीय वाटे. आणि त्यांच्या कृपेमुळेंच आपलें कल्याण होईल या पूर्ण विश्वासानें ते त्यांच्या प्रसन्न मर्जीचीच नेहमी इच्छा करीत.

स्वामीजी गौरवर्णी असून त्यांचा बांधा सुंदर व मुखकमल तेजस्वी असल्यानें दर्शनोत्सुक भाविकांची दृष्टी त्यांच्या दर्शनाने तृप्त होई.

## छाप

सुहास्यवदनावर विलसणारें अद्वितीय तपस्तेज, कडक नेमनिष्ठा, अधिकारी वाणी आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व यांमुळें स्वामीजींच्या बोलण्याची कोणावरही लगेच छाप पडे.

लहान मुलांवर स्वामीजींचें अवर्णनीय प्रेम असे. त्यांना बालचमू फार आवडत असे.

## ९

# दिनचर्या

स्वामीजींची दिनचर्या अगदीं नियमित असे. दररोज उषःकालीं साडेपांचच्या सुमारास त्यांना जाग येई. अर्धा तास परमेश्वरचिंतन होऊन सहाला ते उठत. प्रातर्विधि वगैरेनंतर तुलसीवृंदावनाकडे जाऊन शागिर्दानें स्वच्छ ताज्या पाण्याचा तांब्या वृंदावनांत ओतल्यानंतर ते वृंदावनांतील पवित्र मृत्तिका-तिलक लावीत व श्रीरामदेवमंदिराकडे जात. श्रीरामदेव, वीरविठ्ठलादिं देवांना नमस्कार केल्यानंतर परंपरेंतील गुरुस्वामींच्या वृंदावनांचें दर्शन घेऊन ते बैठकीच्या जागीं येऊन बसत.

यानंतर विद्यार्थी, सेवकजन व भाविक देवदर्शन, स्वामीदर्शन, वृंदावनदर्शन घेऊन आपापल्या कामास लागत.

## प्रातःस्नान व पूजा

इतक्यांत स्वामीजींच्या सकाळच्या स्नानाची वेळ होई. आंघोळीची सर्व तयारी जय्यत असे. प्रथम ऊन पाण्याचें स्नान झाल्यावर थंड पाण्याचें दुसरें होई आणि त्यानंतर श्रीस्वामी श्रीवीरविठ्ठलमंदिरांत प्रवेशत. तीर्थप्राशनानंतर सोवळीं वस्त्रें परिधान करून स्वामीजी पाटावर आसनस्थ होतात इतक्यांत एका विद्यार्थ्याकडून पंचांगवाचन होई. गोपीचंदन-नाम, पंचमुद्राधारण, प्रातर्जप होऊन श्रीस्वामीजींची श्रीवीरविठ्ठलाची निर्माल्यविसर्जनपूजा सुरू होई. या समयीं छात्रगणाकडून मन्युसूक्त, वायुस्तुती, लक्ष्मीसूक्त, पुरुषसूक्त इ. सामुदायिक पद्धतीने म्हणण्यांत येत.

## कडक आचार

या पूजाविधीनंतर स्वामीजी पुन्हा श्रीरामदेव वीरविठ्ठलादि देवांचें व वृंदावनांचें दर्शन घेत. मध्यान्हपूजा, महानैवेद्य समर्पणोतर तीर्थप्राशन होण्यापूर्वी स्वामीजी साधें पाणीही घेत नसत. असा त्यांचा कडक आचार होता.

## लेखनव्यवहार

सकाळच्या कार्यक्रमानंतर मध्यान्ह कार्यक्रमापूर्वी मधल्या कालांत उच्च श्रेणींतील विद्यार्थ्यांकडे लक्ष देऊन त्यांना पाठ सांगणेंही होई. पाठ देतांनाची स्वामीजींची सुबोध व मार्मिक पद्धत पाहून छात्रांना व इतरांनाही सकौतुक आनंद वाटे. याच कालांत जरुरीच्या विनंतिपत्रांस उत्तरांचे रायस पाठविण्याचा लेखनीसाला मजकूर सांगण्यांत येई, आणि संस्थानच्या आवश्यक लेखनव्यवहाराकडेही लक्ष पुरविण्यांत येई. तोंपर्यंत मध्यान्हपूजेची वेळ होई.

## मध्यान्हपूजा

मध्यान्हपूजेची इशारत होऊन स्वामीजी स्नानाला जात आणि स्नान उरकतांच जपजाप्य होऊन पूजेला आरंभ होई. पूजा, महानैवेद्य, पंचवाद्यांच्या साथींत पंचारती, छात्रगण व वैदिक यांकडून पंचसूक्तें, सहस्रनाम, मंत्रपुष्प, द्वादशस्तोत्रें इ. मुळें तेथील वातावरण सात्त्विक आनंदाने भरून येई.

श्रीवीरविठ्ठलाच्या पूजाविधीनंतर स्वामीजी श्रीरामदेवमंदिरांत प्रवेशत. अर्चकानें तोंपर्यंत तेथील महानैवेद्य व मंगलारती उरकून स्वामीजींच्या आरतीची तयारी करून ठेवलेली असे.

श्रीस्वामीजींची मंगलारती झाल्यानंतर तेथील महाआरतींचा कार्यक्रम पूर्ण होई.

## वृंदावनपूजा

त्यानंतर स्वामीजी गुरुवर्यांच्या वृंदावनाजवळ जात आणि तेथील

पूजा, आरती होऊन मग श्रीवीरविठ्ठलमंदिरांत परत येत आणि आपल्या सोवळ्या बैठकीवर आसनस्थ होत. इथपर्यंत पूजा वगैरे मध्यान्हकालीन कार्यक्रम पूर्ण होऊन स्वामीजी तीर्थप्राशन करीत व आपल्या विस्तीर्ण भालप्रदेशीं अंगारा अक्षत लावीत. शिष्यस्वामींनी तीर्थप्रसाद घेतल्यानंतर मठानुयायी व अन्य भाविक या सर्वांना स्वामीजींकडून त्याचा लाभ होई.

## भिक्षा

तीर्थप्रसादवितरणानंतर स्वामीजींचा भिक्षाविधी होई. प्रथम शिष्यस्वामी श्रीनरहरीतीर्थ यांच्या अकालिक निर्याणापासून स्वामीजींनी अन्नत्याग केला होता आणि तेव्हांपासून ते भिक्षासमयीं अल्प फराळच घेत. तोही घेतांना ताटांतील प्रत्येक जिन्नसाचा ते एकच घास घेत असत. भिक्षेनंतर हातपाय धुऊन तीर्थ घेतल्यावर मुखशुद्धी व शतपावली होऊन भोजन अग्रशाळेंत संतर्पणसमयीं पंगतींची पहाणी करीत. तेथें कौतुकानें विचारपूस इ. होऊन स्वामीजी पलंगाजवळ येत व वामकुक्षी करीत, पण ती अल्पकालच.

## छात्रवर्गाकडे लक्ष

दुपारचे चार वाजण्यापूर्वींच ते पलंगावरून उठत आणि पादप्रक्षालन, मुखप्रक्षालन होऊन छात्रांकडे नजर वळवीत. एखाद्या महत्त्वाच्या विषयाचें मन:पूर्वक स्पष्टीकरणही त्यांना सांगत.

## बालचमूचें कौतुक

स्वामीजींना बालचमूचें मोठें कौतुक असे. त्यांच्यासाठीं खारीक, बेदाणा, खडीसाखर वगैरे पदार्थांचा कोठींत संग्रह असे. मुलें मुद्दाम येत, नमस्कार करीत, उभीं राहात. त्यावेळीं त्यांना एखादी गोड उपदेशपर गोष्ट स्वामीजींकडून ऐकण्यास मिळाली व खाऊ हातावर पडला म्हणजे तीं आनंदानें दौडत जात.

## पुराण-प्रवचन

चातुर्मासांत, संचाराच्या कालांत किंवा विशिष्ट दिवसांत रोज दुपारीं चारानंतर स्वामिजींचें पुराण-प्रवचन होई. गोड वाणी, अधिकारी दृष्टी, विद्वत्ताप्रचुर विवरण यांमुळें श्रोतृवर्ग पुराणश्रवणानें तल्लीन होत असे.

## मारुति-दर्शन व फेरी

संध्याकाळ झाली म्हणजे श्रीस्वामिमहाराज, शिष्यस्वामी, छात्रवर्ग, भाविक मंडळी मठाच्या वरच्या बाजूनें रथविदींतून श्रीमुख्यप्राण मारुतीरायाच्या दर्शनाला जात. तेथील पटांगणांतून सरळ जाऊन दर्शनभेट झाल्यावर गप्पागोष्टी करीत आस्ते पावलें टाकीत सगळी मंडळी दीपप्रकाशनसमयीं मठांत परत येई.

## मशाल-सलामी

नौबत, दीपप्रकाशन झाल्यानंतर मठांतील सर्व देवांना व वृंदावनांना नमस्कार करून स्वामीजी निवासस्थानीं येत. स्नानानंतर श्रीवीरविठ्ठलमंदिरांत प्रवेशतांच छात्रवर्ग व सेवाजनासह तेथें मशालीची सलामी होत असे. यावेळीं शांतिसूक्त, रात्रिसूक्त, गुरुपरंपरा-काव्य-गायन वगैरे श्रवणमधुर कार्यक्रम होई.

## निर्णय

यानंतर धार्मिक चर्चा, प्रासंगिक विचारविनिमय, संस्थान व समाज यांमधील कांहीं महत्त्वाचे प्रश्न ऐकून घेऊन त्यांचा निर्णय लावणें वगैरे कामें होत असत.

## रात्र-पूजा

इतकें होईपर्यंत रात्रीच्या पूजेची इशारत होऊन स्वामीजी स्नानाला जात. स्नानोत्तर मशालीची सलामी, जप, ध्यान इ. होऊन श्रीवीरविठ्ठलाची पूजा, मंगलारती होत असे. यापूर्वी पाळीच्या विद्यार्थ्यांकडून पुराणवाचन होई. आरतीनंतर छात्र व वैदिक यांकडून मंत्रपुष्प, कृष्णस्तुती, वेदघोष होई. लागलीच श्रीरामदेवाकडे पुराण, पूजा, मंगलारती होऊन प्रसादवितरण होत असे.

## रात्रीचा अल्पोपाहार आणि झोप

दुपारच्याप्रमाणेंच स्वामीजी स्वतः तीर्थप्राशन करून उपस्थितांस तीर्थप्रसाद देत आणि रात्रीच्या अल्पोपाहारास जात. तीर्थप्राशनानंतर इतरांचें रात्रीचें भोजन होई आणि स्वामीजी बैठकीच्या जागीं आल्यावर पुन्हा आवश्यक विषयांची चर्चा, विनंतिपत्रांचें वाचन, आज्ञारायसांची रवानगी अशीं कामें होत असत. कामाची आवराआवर झाल्यावर जबाबदारीचे मुख्य दरवाजे लावले गेल्याची खात्री पटवून घेतल्यावर झोपीं जाण्याचा स्वामीजींचा परिपाठ असे.

असा श्रीइंदिराकांततीर्थ स्वामीमहाराजांचा नियमबद्ध, नियमित आणि कडक दिनक्रम असे.

## महोत्सव - कार्यक्रम

रामनवमीच्या वार्षिक महोत्सवाच्या दिवसांत आरंभापासून अखेरपर्यंत असे भरगच्च व जबाबदारीचे कार्यक्रम असतात कीं, त्यांची मालिका व्यवस्थितपणावांचून यशस्वी होऊंच शकत नाही. एका कार्यक्रमांत हयगय झाली तर सबंध मालिकाच बिघडूं शकते. तथापि ह्या दिवसांत प्रत्येक कार्यक्रम यशस्वी होण्याबद्दल स्वामीजींची सर्वत्र नजर असे. बैठकीवरूनच सगळीं सूत्रें कुशलतेनें हलविण्याची त्यांची कर्तबगारी और असे.

एकंदरींत श्रीस्वामीमहाराजांची सर्वच दिनचर्या कौतुकास्पद आणि आदर्श अशी होती यांत शंका नाही.

## १०

# जप - तप

पीठाच्या परंपरेच्या जपमंत्राचा उपदेश प्रत्येक गुरुस्वामींकडून शिष्य-स्वामींना लाभत असतो. या जपाचें महत्त्व फार मोठें असून स्वामीजींचा जप-तप-योग हेंच पीठाचें पारंपारिक श्रेष्ठ साधन आहे. श्रीमद्इंदिराकान्ततीर्थ स्वामीजींना या जपमंत्राचा उपदेश त्यांचे पूज्य गुरुस्वामी श्रीमत्पद्मनाभतीर्थ यांकडून मिळाला होता. या जपसाधनेनेंच चरित्रनायक श्रीइन्दिराकांततीर्थ स्वामीजींनी फार मोठी योग्यता प्राप्त करून घेतली.

एकदां चातुर्मासांत पुराण - प्रवचनांतून स्वामीजींनी जपाचें महत्त्व सांगून उत्कृष्ट स्पष्टीकरण केलें होतें. तें विवेचन किती माहितीपूर्ण, सरळ नि सुबोध होतें हें श्रोतृवर्गालाच ठाऊक असायचें. त्याचें सार असें :—

## जपाची पद्धत

"जपाच्या अर्थाची जाणीव ठेवून, ज्या देवतेचा जप करावयाचा तिचें स्वरूप, सामर्थ्य, सौंदर्य व आकर्षण यांवर मनांतील कोणत्या तरी अंशाने लक्ष एकाग्र करून जप केला तर तो फलदायी होतो. कारण जपाच्या उच्चाराने याच गोष्टी व्यक्त होऊन त्या साधकाच्या जाणिवेंत उतरून तेथें बिंबावयाच्या असतात. जपाची ही मानसिक पद्धत.

## जपाची दुसरी पद्धत

जप जर हृदयांतून उस्फूर्त होईल किंवा जाणिवपूर्वक केल्याने अथवा कांहीं भक्तिभावामुळे एक प्रकारच्या जिवंतपणाने जर तो जप हृदयांत घुमत राहील तर तोही जप फलदायी होतो. जपाची ही दुसरी पद्धत. मन

किंवा भावना यांपैकीं कशाचा तरी जपास आधार असावा लागतो.

## जपाची तिसरी पद्धत

जपाची आणखीही एक पद्धत आहे. या पद्धतींत मंत्रशक्ति किंवा नामसामर्थ्य यांचा आधार घेतलेला असतो. मात्र अंतर्यामीं या जपाचें स्पंदन स्पष्टपणें उमटेपर्यंत जपाच्या प्रयत्नांत रहावें लागतें आणि असें स्पंदन निर्माण होऊं लागलें म्हणजे कोणत्याही क्षणीं दिव्य शक्तीच्या अस्तित्वाचा प्रभाव स्वीकारणें शक्य होतें. पण अमुकच परिणाम घडून यावा अशी साधकाची आग्रही वृत्ती असेल तर मात्र त्या दिव्य शक्तीचा प्रभाव स्वीकारण्यांत व्यत्यय येतो. कारण दिव्यतेच्या स्वीकारांत मनांत अचंचल राहून ग्रहण करण्याची पात्रता असणें आवश्यक आहे.

## ग्रहणक्षमता

शांत मनःस्थितीमुळें चैत्य मनाला दिव्य शक्तीचा स्वीकार करण्याकरतां लागणारी योग्य ती अवस्था विकसित करावयास वाव रहातो. काव्य किंवा संगीत विषयक स्फूर्ती जशी सहजपणे येते तशीच या बाबतींतही ग्रहण करण्याची क्षमता स्वाभाविक होऊन जाते. दिव्यशक्तीच्या स्वीकारासाठीं जी साधकाची सिद्धता व्हावयाची असते तत्प्रीत्यर्थ काव्य साह्य करतें. अडवणूक करीत नाही. कारण दिव्यशक्तीचा स्वीकार करण्यास लागणाऱ्या योग्य मनःस्थितीचा विकास करण्याचें आणि सुप्त असलेली भक्ती व्यक्ततेस आणण्याचें काव्यरचना हें एक साधन आहे.

जप किंवा ध्यान यांमध्यें सारी शक्ती वेचण्याने जो ताण पडतो तो ध्यान करण्याची चांगली संवय असलेल्यांनाही सहन करणे कठीण पडतें. आध्यात्मिक अनुभव सतत येत राहतील तर मात्र हा ताण सह्य असतो.''

११

# योग

श्रीगोकर्ण - पर्तगाळी मठ परंपरेंतील गत पीठाधीशांपैकीं श्रीजीवोत्तमतीर्थ, श्रीरामचंद्रतीर्थ, श्रीदिग्विजय रामचंद्रतीर्थ, श्रीरमानाथतीर्थ, श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ यांच्याप्रमाणेंच श्रीइन्दिराकान्ततीर्थ स्वामींचा कलही योगसाधनेकडे असून ज्ञानयोगाकडे त्यांचें लक्ष अधिक केंद्रित झालें होतें. श्रीस्वामीजींना योगसामर्थ्यानें भूतभविष्याची जाणीव होई असे उद्‌गार अनेक वयातीतांकडून ऐकूं येत. त्यांच्याकडून निघणारे शब्द खरे झाल्याचेंही अनेकांकडून समजून येई.

## परमेश्वरप्राप्तीचा साधनमार्ग

योग हा एक फार महत्त्वाचा विषय आहे. प्राचीन भारतीय साहित्यांत योग या शब्दाचा अनेक अर्थांनी वापर झालेला आहे. तरी आध्यात्मिक दृष्टीनें विचार केल्यास परमेश्वरप्राप्तीचा साधनमार्ग असा योग शब्दाचा स्थूल अर्थ करण्यास हरकत नाही.

कर्ममार्गानें परमेश्वरप्राप्ती करून घेणे तो कर्मयोग, ज्ञानमार्गानें परमेश्वरप्राप्ती तो ज्ञानयोग, भक्तिमार्गानें परमेशप्राप्ती तो भक्तियोग. त्याचप्रमाणे हठयोग, राजयोग, मंत्रयोग, वगैरे सर्व प्रधान योगमार्गांतही संप्रदाय-भेदामुळे अनेक प्रकार नि पर्याय रूढ असून त्या त्या मार्गांतील सिद्ध योग्यांची परंपराही अखंड चालू आहे.

## कर्मयोग

कर्म आणि कर्मफल भगवंताला अर्पण करावयाचें, कर्तृत्वाभिमान

सोडावयाचा, मन आणि इच्छाशक्ती हीं विशुद्ध करावयाची आणि ही साधना करून अखिल संसार व जगत्-जीवन चालविणारी स्वयंभू व्यष्टी प्रकृतीच आपल्याही जीवनाची परिचालिका आहे याची जाणीव प्राप्त करावयाची; नंतर त्या प्रकृतीचाही स्वामी जो परमेश्वर तोच या प्रकृतीचे द्वारा अखिल जीवमात्रास केंद्रें करून स्वतःच्या अनंत गुणांचा विस्तार करीत राहिला आहे हेंही अनुभवावयाचें असा हा कर्मयोगाचा मार्ग.

## ज्ञानयोग

ज्ञानयोग्याच्या साधनेंत बुद्धीला प्राधान्य असतें. नित्यानित्य वस्तु-विवेकाने आत्मनिरीक्षण व ध्यान यांच्या द्वारा तो प्रथमतः अंतर्मुख होतो, त्याचें आत्मशोधन सुरू होतें. आणि त्यानंतर ज्ञानमार्गानेंच तो परमेश्वर-प्राप्तीच्या प्रयत्नाला लागतो.

## भक्तियोग

भक्तियोग्याची साधना निराळी असते. सर्वप्रियतम, सर्वसुंदर, सर्वानंदमय प्रभूठायीं सर्व मानवी प्रेमसंबंधाचें नातें मानून तो प्रेममय जीवन जगतो, सर्व भाव हृदयांत केंद्रित करून प्रियतम परमेश्वराच्या रोखाने भक्तियोग्याची वाटचाल चालू राहाते.

कर्मयोग्याचें परमेश्वराच्या इच्छेशीं ऐक्य असतें, ज्ञानयोग्याचें परमेश्वराच्या संकल्पाशीं आणि भक्तियोग्याचें परमेशाच्या प्रेमाशीं ऐक्य असतें. या सर्व ऐक्यानुभवांतून फक्त परिवर्तनशील प्रकृतीपासून मिळवायची ती मुक्ती.

## योगांचा समन्वय

पहिल्या तीन योगांप्रमाणेच हटयोग, राजयोग, भक्तियोग यांचेही महत्त्व आहे.

पूर्णयोगांत तर ज्ञान, भक्ति आणि कर्म या तिन्ही योगांचा समन्वय साधला आहे. मनुष्याच्या अंगच्या शक्ती व गुण अपरिमित वाढणे एवढेंच या योगास अपेक्षित नाही. तर योगाने परिवर्तन घडविल्यानंतर, मानव हा

मानवी पातळी सोडून सर्वांगांनी उच्चतर पातळीवर चढेल व तेथेंच तो सतत राहूं शकेल अशीही त्याची इच्छा असते. तो केवळ अधिक मनःशक्तिसंपन्न, अधिक शक्तिमान् किंवा निष्कलंक चारित्र्याचा नीतिमान् मानव असेल असेंच नव्हे; तर त्याच्या जीवनाचा संपूर्ण पायाच बदलून गेलेला असेल. प्रथम आंतून विकास व रूपांतर होऊन त्याच्या प्रभावामुळें सर्वसामान्य मानवी जीवन अधिक पूर्णतासंपन्न व मानवी गुणसंपत्तीने समृद्ध असें बनेल. यालाच मानवाचें सर्वांगीण पूर्णत्व म्हणतां येईल. हेंच या पूर्णयोगाचें साध्य आहे.

## १२

# पुराण - प्रवचन

श्रीस्वामीजींची पुराण-प्रवचनाची पद्धत फार वेधक आणि माहितीयुक्त होती. विद्वत्ता, ग्रंथावलोकन, महान् पुराणग्रंथांचें वाचन यांमुळें त्यांच्यापाशीं भरपूर माहिती तर होतीच; आणि त्या ज्ञानभांडाराला प्रभावी व्यक्तिमत्त्व, प्रसन्न वदन, भारदस्त पण विनोदप्रचुर भाषा आणि वेधक वक्तृत्वकला यांची जोड लाभल्याने आबालवृद्धांना तें पुराण-प्रवचन फारच आवडे. ते पुराणास आरंभ करतांना भागवतासारखा एकादा महत्त्वाचा ग्रंथ पुढें ठेवीत व बहुधा त्यांतील एखादादुसरा श्लोक वाचीत; पण त्याचें विवेचन मात्र अनेक प्राचीन, अर्वाचीन व आजतागायतचीं प्रचलित उदाहरणें देऊन तास दीड तास अविरत चाले. विद्वत्ता आणि वक्तृत्वकला यांची स्वामीजींवर फार प्रसन्नता होती.

### वक्तृत्व

वक्तृत्वकलेचें महत्त्व फार मोठें असून प्राचीनकालापासून आजतागायत तें शाश्वत आहे आणि भविष्यकाळींही तसेंच राहाणारें आहे. श्रीकृष्णाचें गीताकथन, त्याचें शिष्टाईच्या वेळेचें भाषण, भीष्माचा धर्मास उपदेश वगैरे भारतांतील प्रसंग आणि रामायणांतील विविध संवाद हीं वक्तृत्वाचीं प्राचीनकालीन स्पष्ट उदाहरणें आहेत. पुढें आद्य शंकराचार्यांपासून निरनिराळे आचार्य व अलीकडील अनेक भगवद्भक्त कीर्तनकार व प्रसिद्ध पुराणप्रवचनकार यांचें वक्तृत्वसामर्थ्य जनतेस ज्ञात आहेच.

सार्वजनिक क्षेत्रांत तर वक्तृत्वाची जरुरी सहज दिसून येते. पुढारी, कीर्तनकार, राजकारणी, समाजसुधारक, आमदार, खासदार अशा व्यक्तींना तर वक्तृत्व हवेंच हवें. वकील, प्रचारक, विक्रेते इ. धंदेवाल्यांनाही या कलेची

आवश्यकता भासतेच.

आजच्या लोकशाहींत तर या कलेचीच विशेष चलती. जो आपलें म्हणणें जनतेला पटवून देईल त्यालाच निवडणुकींत मतदारांचा पाठिंबा मिळतो.

## वक्तृत्वाचें ध्येय

'अधिकार तैसा करूं उपदेश' हें वचन लक्षांत ठेवून श्रोतृसमुदायाचें अंतःकरण हलविणें व त्याला थोडें तरी कार्यप्रवण करणें हें खऱ्या वक्तृत्वाचें ध्येय असून तें ज्या भाषणपद्धतीनें साध्य होतें तेंच वक्तृत्व म्हणतां येईल. 'वक्ता असावा साचार। अनुभवाचा॥' असें श्रीसमर्थवचन आहे. भाषणांत वक्त्याचें अंतःकरण ओतलेलें असलें पाहिजे; तरच श्रोते हलतात.

वक्तृत्व आणून येत नाही. सहज रीतीनें त्याचा प्रादुर्भाव झाला पाहिजे. शुद्ध बीज असलें म्हणजे ज्याप्रमाणें वृक्ष फोफावतो व पत्रपुष्पफलादिकांनी समृद्ध होऊन जनतेस उपकारक होतो त्याप्रमाणेंच खऱ्या वक्तृत्वाची स्थिती असते.

तें प्रभावी वक्तृत्व सर्व प्रकारची अपूर्व योग्यता प्राप्त झालेल्या स्वामीजींना लाभलें होतें. अशा या वक्तृत्वाचा पुराण-प्रवचनाद्वारें ज्यांना लाभ मिळाला ते धन्य होत.

## १३

# ग्रंथलेखन

श्रीइन्दिराकान्त स्वामीमहाराजांना वक्तृत्वकलेप्रमाणेंच लेखनकला-देखील चांगली अवगत होती. त्यांनीं आरंभीं स्तोत्रें वगैरे रूपानें संस्कृतांत सुंदर भाषेंत बरेंच लेखन केलें आहे. संस्कृत भाषेवर त्यांचें जितकें प्रेम तितकेंच मराठीवरही असल्याने काव्य आणि गद्य अशा दोन्ही प्रकारांत त्यांकडून मराठी वाङ्मयरचना झाली आहे.

## मराठीचें महत्त्व

जुन्या पंडितांचा कल संस्कृत भाषेंत ग्रंथरचना करण्याकडे अधिक असे. तेराव्या शतकापर्यंत त्यांना मराठी ग्रंथरचनेचा प्रकार हास्यास्पद वाटे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी 'माझा मराठाचि बोल कवतिकें। परी अमृतातेंहि पैजा जिंके। ऐसीं अक्षरें रसिकें। मेळवीन॥' अशी तेजस्वी घोषणा केली व ज्ञानेश्वरीसारखा अपूर्व ग्रंथ मराठी भाषेंत निर्माण केला, तरी त्या अहंमन्यांनी त्या ग्रंथाची कदर केली नाही! पण पुढें अनेक संतकवि महाराष्ट्रांत निर्माण झाले. त्यांनी भागवतधर्माची गंगा महाराष्ट्रांत वाहविली. ती धर्मसतुजलाने धो धो वाहूं लागतांच हजारों भक्तांनी त्यांत यथेच्छ निमज्जन करून आपला देह पावन करून घेतला. ज्ञानेश्वरी मस्तकावर घेऊन ते नाचूं लागले, त्यावेळीं या अहंमन्य पंडितांचे डोळे उघडले आणि मराठीचें महत्त्व त्यांना कळून आलें.

## लेखनशैली

स्वामीजींची जशी एक विशिष्ट वक्तृत्वशैली होती, तशीच त्यांची भारदस्त व प्रभावी लेखनशैली होती. लेखनशैली हा एक महत्त्वाचा प्रश्न

असतो. व्यक्तीचा स्वभाव हा मुख्यत्वानें लेखनशैली निर्माण करण्यास कारण होतो. स्वभाव बुद्धिप्रधान असेल तर त्याचें लेखन सामान्यतः बुद्धिनिष्ठ असतें. भावनाशाली असेल तर तें भावनामय असतें. सोळाव्या वर्षी श्रीज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली; वयाच्या बत्तिसाव्या वर्षी श्रीशंकराचार्यांनी शांकरदिग्विजय केला. यावरून दिसतें कीं, पूर्वसंस्कार प्रबल असले आणि व्यासंग, अवलोकन, अनुभव, भोंवतालची परिस्थिती यांचीही जोड मिळाली म्हणजे प्रतिभेवर परिणाम घडून लेखकाची एक विशिष्ट लेखनशैली बनते.

## लेखणींतील सामर्थ्य

समाजाचें उद्बोधन करणारा लेखक प्रभावी इच्छाशक्तीचा, पोलादी निश्चयाचा आणि निश्चित ध्येयदृष्टीचा असावा लागतो. तरच तो लोकजागृती करूं शकतो. सतराव्या शतकांत समर्थ रामदासस्वामी यांनी निद्रिस्त महाराष्ट्राला जागें केलें तें ध्येयाबद्दलच्या प्रबल निष्ठेने. म्हणूनच त्यांचा दासबोध हा महाकाव्यग्रंथ राष्ट्रीय ग्रंथाच्या योग्यतेला पोंचला. गीतारहस्याने अभूतपूर्व क्रांती घडवून आणली ती विशेषतः टिळकांच्या विभूतिमत्त्वाने. ग्रंथाच्या पानापानांतील शब्दाशब्दांतून लेखकाचें प्रभावी अंतरंग व्यक्त झालें म्हणजे त्या शब्दांना सुवर्णस्पर्शाचें महात्म्य प्राप्त होतें. परिसाच्या संसर्गानें लोखंडाचें सोनें होतें असें म्हणतात, तद्वत् समाजाचें किंवा राष्ट्राचें सोनें करण्याचें सामर्थ्य अशा अधिकारी लेखकाच्या वाणींत असतें, नि तसेंच तें लेखणींत उतरतें. असें सामर्थ्य आमच्या स्वामीजींच्या वाणींत नि लेखणींत होतें.

## लोकप्रिय ग्रंथ

द्वैतसिद्धांत, गीतागौरव, न्यायमीमांसा, असे जे कित्येक उपयुक्त ग्रंथ स्वामीजींनी लिहिले त्यांत श्रीमद्भगवद्गीता व श्रीमत्सुनीतिभागवत हे ग्रंथ विशेष लोकप्रिय झाले. गीताग्रंथाच्या तीन आवृत्त्या निघाल्या, तर सुनीति-भागवताच्या दोन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. गीताग्रंथाची १ ली आवृत्ति

सन १९०६ सालीं स्व. द. गो. सडेकर यांनी खानापूर (बेळगांव) येथें आपल्या धनंजय छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली. नऊ वर्षांनंतर १९१५ सालीं सडेकर यांनीच दुसरी आवृत्ति प्रकाशनांत आणली, आणि तिसरी संक्षिप्त आवृत्ति श्रीगोकर्ण-पर्तगाळी मठाचे गुरुस्वामी श्रीमद्द्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेर यांच्या ग्रंथप्रकाशन योजनेप्रमाणे श्रीगोकर्ण-पर्तगाळी ग्रंथ-प्रकाशन समितीतर्फे १९५१ सालीं प्रसिद्ध झाली. या आवृत्तीचें मुद्रण मुंबईच्या निर्णयसागर प्रेसांत केलें. या संक्षिप्त आवृत्तीची पृष्ठसंख्या ३०२ असून. किंमत चार रुपये आहे. मूळ पहिल्या आवृत्तीची पृष्ठसंख्या ४०० व किंमत दोन रुपये होती तर दुसऱ्या आवृत्तीचीं पृष्ठें ४०२ असून मूल्य २॥ रुपये होतें.

या गीताग्रंथाचें वैशिष्ट्य म्हणजे मूळ संस्कृत श्लोकांखालीं जी विवेच-नात्मक टीका आहे ती सुबोध, सरळ, मध्वमतानुवर्तिनी आहे. एकूण अध्याय १८ असून मूळ श्लोक ७०० आहेत.

श्रीमत्सुनीतिभागवत ग्रंथाच्या दोन्ही आवृत्त्या द. गो. सडेकर यांनींच आपल्या धनंजय छापखान्यांत छापून प्रसिद्ध केल्या आहेत. त्यांतही मूळ संस्कृत श्लोक व खालीं मराठी टीका आहे.

## गीताग्रंथाची प्रस्तावना

या श्रीभगवद्गीता ग्रंथाच्या प्रथमावृत्तीच्या प्रस्तावनेंत पंडित समीरणा-चार्य पांग्रीकरशास्त्री म्हणतात :—

"अनेक पंडितांनी आपापल्या मतांप्रमाणें गीतेचे बरेच अर्थ संस्कृत, मराठी वगैरे भाषेंत केले, पण ते भिन्न भिन्न मार्गदर्शक असल्याने उभय कृष्णांचा हृद्गतार्थ वैष्णव भक्तांस समजण्यासाठी श्रीमदाचार्यांनीं विद्वत्तापूर्ण गीताभाष्य केलें. तें समजण्यास गहन म्हणून श्रीजयतीर्थांनीं 'प्रमेयदीपिका' नामक टीका लिहिली. पुढें श्रीराघवेंद्रतीर्थ श्रीपादांनी 'गीताविवृत्ति' लिहिली.

त्याचप्रमाणें इतरांनींही गीतेवर पुष्कळ लिहिलें; परन्तु प्राकृत मुमुक्षु वैष्णव भक्तांस मूळ गीताग्रंथाचें रहस्य कळणें कठिण आहे हें जाणून श्रीगोकर्ण-पर्तगाळी मठाधीश पूज्यपाद श्रीमद्दिंदिराकांततीर्थ श्रीपादस्वामी यांनी सुलभ रीतीनें मराठी भाषेंत विवेचन करून हा ग्रंथ लिहिला आहे.

या ग्रंथाचें मुख्य तात्पर्य असें कीं, परमेश्वरास परम स्वातंत्र्य, सर्वोत्तमत्व, सर्वज्ञत्व आणि त्या दृष्टीने जीवांना पारतंत्र्य, अल्पज्ञत्व, मोक्ष-साधनज्ञान, परंपरासाधन व धर्मविहित कर्माचरण वगैरे विषयांचा ऊहापोह यांत केलेला आहे. श्रीस्वामींनी मराठी अर्थ करतांना तो दुराग्रहाने किंवा स्वमतानें मुळींच केला नसून मूळ ग्रंथ, भाष्य, टीका, टिपणी, श्रुतिस्मृति यांना धरूनच स्पष्टार्थ केला आहे."

## १४

# गीतेची महती

श्रीमद्भगवद्गीता हा ग्रंथ भागवतधर्माचा किंवा वैष्णवधर्माचा आद्य प्रमाणग्रंथ मानला जातो. वैदिक परंपरेंतील अन्यपंथीयांनीदेखील या ग्रंथास प्रमाण मानलें आहे.

### महत्त्वाचें स्थान

भारतीय तत्त्वज्ञानाच्या प्रस्थानत्रयींत गीतेस महत्त्वाचें स्थान असल्यानें भिन्न विचारसरणीच्या आचार्यांनी आणि तत्त्वचिंतकांनी गीतेवर भाष्यें लिहून आपली मतप्रणाली मांडली आहे. आद्य शंकराचार्य, रामानुजाचार्य, निंबार्काचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य या आचार्यांनी आपला वेदांतविषयक दृष्टिकोन गीतेवर टीका किंवा भाष्य लिहून प्रतिपादिला आहे.

### मराठी भाष्य

महाराष्ट्रांत ज्ञानेश्वरांनी भागवतधर्माचा उपदेश गीतेवरील भावार्थदीपिकेच्या रूपाने केला आहे. महानुभाव पंथांत गीतेवरील प्राकृत टीपा बऱ्याच आहेत. दासोपंतांनी तर सव्वालक्ष गीतार्णव लिहूनही निराळी गीतार्थचंद्रिका लिहिली. लोकमान्य टिळक व आचार्य विनोबा भावे यांनीही आपली विचारसरणी गीतेवरील विवरणांतूनच प्रगट केली. आहिताग्नी राजवाडे यांनी निर्द्वंद्व तत्त्वाच्या पुरस्कारार्थ लिहिलेलें गीताभाष्यही या संदर्भात लक्षांत ठेवलें पाहिजे.

### दैवी जीवन व अनासक्ति योग

महाराष्ट्राबाहेरदेखील हाच प्रकार दिसून येतो. योगी अरविंदांचें 'दैवी जीवन' आणि महात्मा गांधींचा 'अनासक्ति योग' हे गीतेवरच अधिष्ठित आहेत.

पौर्वात्य व पाश्चात्य तत्त्वज्ञांत मान्यता पावलेले डॉ. राधाकृष्णन् यांनीही गीतेवर भाष्य लिहिलें आहे. मठाधीशांनी केलेल्या भाष्याचा उल्लेख मागें आलाच आहे.

## इंडिया बायबल

अनेक पाश्चात्यांनादेखील गीताग्रंथाने वेड लावलें आहे. पाश्चात्यांनी गीतेला 'इंडिया बायबल' म्हटलें आहे.

सर्वकालीन पौर्वात्य व पाश्चात्य तत्त्वचिंतक आणि मुत्सद्दी यांना प्रेरणा देणारा हा ग्रंथ म्हणजे 'भारतीय तत्त्वज्ञानाचा अष्टपैलू हिराच आहे' असें पाश्चात्य पंडित मोठ्या गौरवाने म्हणत आहेत.

आजपर्यंतच्या तीन हजार वर्षांच्या काळावधींत गीतेचें महत्त्व यत्किंचितही कमी झालेलें नाही. या महान् ग्रंथांत उपदेशिलेल्या शाश्वत धर्मास गीतेच्या या महतीचें श्रेय आहे यांत शंका नाही.

अशा या महान् ग्रंथावर द्वैत मताच्या विवेचनाचें जें साधार भाष्य स्वामीजींनी सरळ व सोप्या मराठींत लिहिलें आहे तें निःसंशय कौतुकास्पद आणि अभिनंदनीय आहे.

१५

# प्रथम शिष्य श्रीनरहरीतीर्थ स्वामी

श्रीमद्इन्दिराकांततीर्थ स्वामीजींच्या मनांत शिष्यस्वीकाराचा विचार आला. त्यांनी याबद्दलची आपली योजना वर्गातील विचारवंतांना निवेदन केली. सर्वांना आनंद वाटला. त्याप्रमाणे शिष्यत्वाच्या योग्यतेस साजेल अशा बुद्धिमान बटूचा शोध सुरू झाला.

## नियोजित बटू

कर्नाटकांतील चिक्कनकोड गांवच्या एका प्रसिद्ध वैदिक घराण्यांतील तेजःपुंज, चतुर व सुंदर बटूची जन्मपत्रिका आणण्यांत आली. आणि तिच्यांतील अनुकूल ग्रहयोग पाहून घेऊन श्रीरामदेवाच्या कृपाप्रसादाने मठानुयायांनी मागणी केली. मागणीला मान्यता लाभली आणि शिष्यस्वीकाराची तयारी चालू झाली.

शिष्यस्वामीसाठी निवड करण्यात आलेला नियोजित बटू व्यासराय आचार्य हा चिक्कनकोड येथील सुप्रसिद्ध वैदिक नारायणाचार्य यांचा चिरंजीव असून त्याला नुकतेंच चौदावें वर्ष लागलें होतें आणि त्याचा अभ्यास सुरू झाला होता.

## उपदेश

स्वामीजींचा तिसरा दिग्विजय कर्नाटकांत चालू होता. त्याच वेळीं शिष्यस्वीकार समारंभ करण्याचे निश्चित झालें. त्याप्रमाणे वैशाख शु. १५ मा शके १८१८ रोजीं कर्नाटकांतील मादनकेरी येथें गुरुवर्यांनी बटूस

उपदेश दिला. व 'श्रीनरहरीतीर्थ' असें त्यांना नामाभिधान प्राप्त झालें. समारंभ बराच मोठा झाला.

## वेदाध्ययन

आश्रमस्वीकारानंतर शिष्यस्वामींचें वेदाध्ययन सुरू झालें. गुरु - शिष्य यांचा दिग्विजय संतोषांत पूर्ण झाला आणि उभय स्वामी पर्तगाळी मठांत पोंचले त्यावेळीं मठानुयायांनी फार मोठा स्वागतसमारंभ केला.

शिष्यस्वामींच्या दर्शनासाठी मठानुयायांची गर्दी होऊं लागली. पाद-पूजादि कार्यक्रम वाढत चालले. मठांत वर्षभर आनंद ओसंडूं लागला. दुसऱ्या सालचा पूर्वार्धही ठीक गेला; पण उत्तरार्ध मोठा कठीण आला!

## मुक्ती

शके १८१९ च्या मार्गशीर्ष महिन्याच्या कृष्णपक्षांतील षष्ठी रोजी शिष्यस्वामी श्रीनरहरीतीर्थ यांना अकस्मातच मुक्तियोग प्राप्त झाला! नांदत्या आनंदावर दुःखाची छाया पसरली. मठानुयायांना अवर्णनीय खेद झाला. गुरुस्वामींना असह्य हार्दिक धक्का बसला. त्यांनी त्या दिवसापासून अन्नच वर्ज्य केलें. पुढें निर्वाणापर्यंत त्यांनी कधींच अन्न घेतलें नाही. नुसत्या फलाहारावरच ते रहात असत.

गुरुस्वामींनी त्यावेळीं मनःशांतीसाठीं दक्षिणेस रामेश्वरापर्यंतच्या अनेक यात्रा केल्या.

श्रीनरहरीतीर्थ स्वामींचे वृंदावन पर्तगाळी मठांत यज्ञमंडपालगतच आहे.

१६

# द्वितीय शिष्य श्रीकमलानाथतीर्थ स्वामी

प्रथम शिष्यांच्या निर्याणानंतर आठनऊ वर्षांचा अवधी लोटला. मठानुयायांना मठपरंपरेसाठी नवीन शिष्याची हुरहूर लागली आणि अनुकूल वेळ पाहून त्यांनी गुरुवर्यांकडे याबद्दलचा प्रस्ताव मांडला. स्वामीजींनीही संमती दर्शविली.

## शोध

शिष्यस्वामीपदासाठी योग्य बटूचा शोध सुरू झाला, पण या अत्यंत जबाबदारीच्या पदासाठी तशाच योग्यतेच्या बटूची जरुरी असल्याने, शिवाय त्याच्या जन्मटिपणांतील ग्रह या बाबतींत सबल हवे असल्यानें सर्व योग जुळून येण्यास अवधी जाऊं लागला.

आपल्या सूक्ष्म दृष्टीने या बाबतींत स्वतः गुरुस्वामींनी एका बटूची मनांतल्या मनांत निवड करून ठेवलीच होती. या बटूची तेजस्विता, प्रभावी दृष्टि, व्यक्तिमत्त्व, हुशारी, चातुर्य, प्रेमळपणा, विद्यार्जनकुशलता, मठांतील अभ्यासवर्गांत गुरुस्वामींनी स्वतः अवलोकन केली होती त्यामुळें तो त्यांना फार आवडला होता.

याच सुमारास गुरुस्वामींच्या मनांत उत्तरेपासून दक्षिणेपर्यंतच्या धर्मक्षेत्रांच्या सर्व यात्रा करण्याचा विचार आला आणि प्रस्थान ठेवण्यापूर्वी शिष्यस्वीकार करावा असें त्यांच्या मनाने घेतले. त्याप्रमाणे मठानुयायांची महासभा बोलावून त्यांनी आपला विचार प्रगट केला.

बटूबद्दल पुनः सूचना करतांच मठानुयायांनी ती जबाबदारी स्वामींनीच स्वीकारण्याची विनंती केली. त्यामुळें स्वामींनी आपल्या बटूचे नांव पुढें

या शुभदिनीं बटूने देहशुद्धयर्थ प्रायश्चित्त, तिलहवन, गायत्रीजप, पुण्याहवाचन, आत्मश्राद्ध, ब्रह्मदंडधारण, क्षौर, जागरण, विरजाहोम, नदीतीरीं शिखासूत्रत्याग वगैरे विधि करून नंतर यथाशास्त्र स्नान केलें.

## मंत्रोपदेश

स्नानानंतर देवदर्शन, मुद्राधारण इ. झाल्यावर श्रीरामदेवास अभिवादन करून श्रीगोकर्ण-पर्तगाळी पीठाधीश श्रीमत्पद्मनाभतीर्थस्वामी यांनी मिथुन लग्न घटी ७ या शुभमुहूर्तावर बटूस मंत्रोपदेश दिला.

## नामाभिधान

मंत्रसिद्धीसाठीं हिरण्य-गोदान देण्यांत आलें आणि शिष्यस्वामींना 'श्रीमदिन्दिराकांततीर्थ' असें नांव दिल्याचें जाहीर केलें.

यानंतर श्रीरामदेव वीरविठ्ठलादि देवांचें आणि पीठाच्या मुक्त गुरुवर्यांच्या वृंदावनांचें दर्शन घेऊन गुरुशिष्य स्वामी आसनस्थ झाले. यावेळीं नवीन शिष्यस्वामींनी गुरुस्वामींची पादपूजा करावयाची असते. तीही यथायोग्य व थाटांत झाली.

## जयजयकार

जमलेल्या असंख्य मठानुयायी ब्रह्मवृंदाने उभय गुरुशिष्य स्वामींचा जयजयकार केला. वाद्यें वाजूं लागलीं आणि सर्वत्र आनंदीआनंद झाला. समाराधनेनंतर शिष्यस्वामींच्या या आश्रमस्वीकार कार्यक्रमाची सांगता झाली.

केलें. सर्वांनी तें ऐकून आनंद प्रगट केला आणि पुढील कार्यास आरंभ झाला.

## बटूची निवड

स्वामींनी निवड केलेले बटू हे खुद्द पर्तगाळी मठांतील आचार्य वैकुंठ नारायणाचार्य यांचे पुत्र नारायणाचार्य हेच होत. हे त्यावेळीं मठाच्या पाठशाळेंत वैदिक शिक्षण घेत होते. त्यांचे वय पंधरा वर्षांचें होतें; पण शिक्षणांतील प्रावीण्य असामान्य होतें. जन्मटिपणांतील अनुकूल ग्रह, श्रीरामदेवाचा कौल, अनुयायांची उत्कट इच्छा आणि स्वामीजींची निवड यांमुळें सर्व कांही ठरलें आणि मठानुयायांनी मागणी घालून ते मोठ्या थाटांत बटूंस घेऊन आले.

## उपदेश

विधिवत् सर्व कार्यें सुरू झालीं आणि वैशाख वद्य ५ मी शके १८२९ रोजीं बटू नारायण आचार्य यांना गुरुस्वामींनीं उपदेश देऊन श्रीकमलानाथतीर्थ हें त्यांचें आश्रमीय नांव प्रगट केलें. त्यांचा दीक्षोत्तर अभ्यासक्रमही नेटांत चालला आणि अल्पावधींतच ते सर्व शास्त्रांत पारंगत झाले.

## कारभार

आश्रम दिल्यानंतर त्याच सालीं गुरुस्वामींनी मठाचा सर्व कारभार शिष्यस्वामींच्या हातीं दिला. विद्यार्थीदशेंतच ते गुरुस्वामींच्या सेवेंत असल्याने त्यांना त्या कारभाराची सर्व माहिती झाली होती. गुरुस्वामींचाही त्यांच्यावर पूर्ण विश्वास बसला होता.

## पट्टाभिषेक

गुरुस्वामींच्या पश्चात् शके १८६४ सालीं अक्षयतृतीयेच्या सुमुहूर्तावर त्यांना २१ वे पीठाधीश म्हणून पट्टाभिषेक झाला. तथापि शके १८६५ च्या चैत्र शु. ११ शी दिवशी म्हणजे अवघ्या साडेअकरा महिन्यांच्या अल्पावधींतच त्यांचें निर्याण झालें. हे फार दयाळू व गरिबांचे आधारस्तंभ होते. यांची समाधी प्रमुख समाधिमंदिरांत आहे.

# स्वामीजींचे संचार

पीठाधीशांच्या संचाराला दिग्विजय अशी संज्ञा आहे. सैन्यबलानें किंवा विद्येने चारी दिशांस जिंकणे म्हणजे दिग्विजय. आमच्या स्वामीजींनीही आपल्या संचारांत हरिद्वार, काशी, कांची, रामेश्वर, वगैरेकडील पंडितांच्या धार्मिक चर्चेंत त्यांचें समाधान करून जय मिळविला आणि त्याबद्दल मोठ्या गौरवाने त्यांनी स्वामीजींना मानपत्रें दिलीं आहेत.

## पंचवीस दिग्विजय

धार्मिक जागृति किंवा पंथाचा प्रचार यासाठीं दरसाल, पाव तपानें, निदान एका तपानें तरी पीठाधीशांनी संचारार्थ निघालेंच पाहिजे असा पीठांचा नियम आहे. या नियमाप्रमाणें स्वामीजींचे पंचवीस दिग्विजय झाले.

## पहिला दिग्विजय

(मार्गशीर्ष शु. १० मी शके १८१४) कडवाड, अंकोला, कोडकणी, कुमठा, मुल्की, हळदीपूर, होनावर, मुर्डेश्वर, भटकळ, शिरूर, वेंकटापूर.

## दुसरा दिग्विजय

(मार्गशीर्ष शु. १३ शी शके १८१५) खोल, मडगांव, दुर्भाट, कवळें, वेलिंग, मडकई, कुंडई, जुवारी, माशेल, सावई-वेरें, सांखळी, डिचोली, म्हापसें, शिवोली, रेडी, वेंगुर्लें, होडावडें, कुडाळ, मालवण, धामापूर, हरमल, वेरें, नेरूल, पणजी, रायबंदर, कुंभारजुवें, पारोडें, बाळ्ळी, काणकोण.

## तिसरा दिग्विजय

( कार्तिक व. ४ थीं शके १८१७ ) पैंगिणी, लोलयें, सुंकेरी, अंकोला, गोकर्ण, यल्लापूर, शिर्सी, सिद्धापूर, कुमठा, कोडकणी, होनावर, कुंदापूर, उडुपी, मंगळूर, माविनकुर्वे, कासरकोड, मंगळूर, बसरूर, कुंदापूर, ब्रम्हावर, बारकूर, कल्याणपूर, होसदुर्ग, बेडगिरी, कालिकत, त्रिचनापल्ली, मीनाक्षी, रामपूर, रामेश्वर, विष्णुकांची, शिवकांची, गोविंदराजपट्टण, तिरुपती, गुंटकल, हुबळी, लोंढा, मडगांव, मुरगांव, पणजी, कांदोळी, कळंगूट, शिवोली, वेरें, कालापूर, थोरलें गोवें, कुंकळ्ळी.

## चौथा दिग्विजय

(ज्येष्ठ व. २ या शके १८२०) लोलयें, कारवार, सुंकेरी, चेंडियें, अंकोला, हळगें, हेगडें, कुमठा, होनावर, कासरकोड, मुर्डेश्वर, शिराळी.

## पांचवा दिग्विजय

( मार्गशीर्ष शु. ५ मी शके १८२१ ) उत्तर व दक्षिण कर्नाटक.

## सहावा दिग्विजय

( आषाढ शु. ९ मी शके १८२२ ) बाळ्ळी, कुंकळ्ळी, मडगांव, रायतूर, मार्सेल, कुंडई, सांखळी, डिचोली, अस्नोडें, शिवोली, हरमल, केरी, रेडी, शिरोडें, वेंगुर्ले, कुडाळ, धामापूर, मालवण, कणकवली, फोंडाघाट, कोल्हापूर, नृसिंहवाडी, पुणें, पंढरपूर, म्हापसें, कुंडई, म्हाडदोळ, वेलिंग, सावै - वेरें, शिरोडें, पंचवाडी, काकोडें, रिवण.

## सातवा दिग्विजय

( आश्विन शु. १४ शी शके १८२३ ) कारवार, सुंकेरी, अळसें, अंकोला, गोकर्ण, मादनकेरी, कुमठा, होनावर, माविनकुर्वे, बारकूर, इडगुंजी, होसाड, गेरसप्पा, सिद्धापूर, वेंकटापूर, शिराळी, मुर्डेश्वर, कासरकोड, हळदीपूर, बिळगी, कडवाड, सदाशिवगड.

## आठवा दिग्विजय

( मार्गशीर्ष शु. ९ मी शके १८२४ ) सदाशिवगड, हळगें, लोंढा, बेळगांव, खानापूर, हल्याळ, यल्लापूर, अंकोला, कडवाड.

## ९ वा दिग्विजय

( वैशाख शु. ९ मी शके १८२५ ) गोकर्ण, शिरूर, अंकोला, कुमठा, उप्पीनपट्टण, होनावर, मुर्डेश्वर, वेंकटापूर, सिराळी, कासरकोड, गंगोळी, कुंदापूर, बसरूर, सोमेश्वर, सिद्धापूर, वेंकटापूर, माविनकुर्वे, हळदीपूर, कागल, मादनकेरी, गोकर्ण, चेंडियें, कारवार.

## १० वा दिग्विजय

( मार्गशीर्ष व. १ दा शके १८२६ ) बाळ्ळी, कुंकळ्ळी, असोळणें, तळवडें, पारोडें, रामनाथीं, वेलिंग, केरी, म्हाडदोळ, कुंडई, पानवेल, मडकई, प्रियोळ, डोंगरी, काकोडें, जांबावली, रिवण.

## ११ वा दिग्विजय

( ज्येष्ठ शु. ५ मी शके १८२७ ) डिचोली, कुंभारजुवें, रामनाथीं, गोठण, सांखळी, अस्नोडें, थिवी, शिवोली, हरमल, केरी, शिरोडें, आरवली, आजगांव, रेडी, कोचरें, मालवण, कणकवली, राजापूर, पाली, लांजें, संगमेश्वर, चिपळूण, रत्नागिरी, पुळें - गणपती, बांबर्डे, वेंगुर्लें, शिरोडें, आरवली, म्हापसें, रायबंदर, कुंडई, म्हाडदोळ, गोठण, पारोडें, बाळ्ळी, फातर्पें, खोल, आगोंद.

## १२ वा दिग्विजय

(मार्गशीर्ष कृ. १२ शी शके १८२९) बाळ्ळी, पारोडें, म्हाडदोळ, वेलिंग, सांवर्डें, बेळगांव, शहापूर, पुणें, मुंबई, अजमीर, मथुरा, वृंदावन, गोकुळ, हरिद्वार, बिल्वकेदार, हृषिकेश, प्रयाग, काशी, गया, अयोध्या.

## १३ वा दिग्विजय

(कार्तिक व. ११ शी १८३१) रिवण, सांवर्डे, बेळगांव, शहापूर, हंपी, विरूपाक्ष - विजयनगर, द्रोणाचलम्, बेझवाडा, मंगळापूर, कोकोनाडा, वाल्टेर, जगन्नाथपुरी, साक्षीगोपाळ, भुवनेश्वरी, वैतरणीतट, रामटेक, भुसावळ, नर्मदातट, ओंकारेश्वर, उज्जयिनी, क्षिप्राकांठ, ग्वाल्हेर, गोमतीकांठ, डाकोर, गिरनार, सोमनाथपट्टण, पोरबंदर, द्वारका, मुंबई, पुणें, लोंढा, मडगांव.

## १४ वा दिग्विजय

(वैशाख शु. १४ शी १८३२) कारवार, अंकोला, हळदीपूर, होनावर, करिकुर्वे, बळकूर, मुर्डेश्वर, शिरूर, वेंकटापूर, भटकळ, बैंदूर, बसरूर, कोटेश्वर, बारकूर, कल्याणपूर, उडुपी, मुल्की, गुरुपूर, मुडबिद्री, कार्कळ, बेळतंगडी, बंटवाळ, उल्लाळ, होसदुर्ग.

## १५ वा दिग्विजय

(भाद्रपद व. १२ शी १८३३) रिवण, सांवर्डे, लोंढा, हुबळी, गुंतकल, पद्मावतीपट्टण, तिरुपती, कालहस्ती, रेनिगुंठा, सुब्रह्मणेश्वर, घटिकाचल, चंगलपेठ, चिंदंबर, तोताद्री, अनंतशयन, मातुलिंग, अल्लेपी, तिरुमल.

## १६ वा दिग्विजय

(निजआषाढ शु. ५ मी १८३४) दक्षिण व उत्तर कर्नाटक.

## १७ वा दिग्विजय

(चैत्र व. ८ मी १८३५) नाशिक, झांशी, दिल्ली, हरिद्वार, हृषिकेश, प्रयाग, काशी, गया, बिल्वकेदार, श्रीनगर, रुद्रप्रयाग, पाताळगंगा, बदरिकाश्रम, नंदप्रयाग, मुरादाबाद, आग्रा, ग्वाल्हेर, मुंबई, पुणें.

## १८ वा दिग्विजय

( आश्विन अमावास्या १८३७ ) बाळ्ळी, मडगांव, पारोडें, रिवण, काकोडें, पंचवाडी, माशेल, डिचोली, दोडामार्ग, शिरोडा, रेडी, आरवंदें, वेलिंग, सांवडें, हुब्ळी, विजयनगर, गुंतकल, गोविंदराजपट्टण, तिरुपती, विष्णुकांची, शिवकांची, श्रीरंगम्, मदुरा - मीनाक्षी, रामेश्वर, दर्भशयन, होसदुर्ग, विठ्ठलक्षेत्र, पाणीमंगळूर, उल्लाळ, लोंढा.

## १९ वा दिग्विजय

( आश्विन शु. १४शी १८४१ ) अस्नोटी, सुंकेरी, कडवाड, हळगें, अऊसें, अंकोला, कारवार.

## २० वा दिग्विजय

( वैशाख व. १ दा १८४४ ) कारवार, अंकोला, कुमठें, हळदीपूर, होनावर, माविनकुर्वे, कासरकोड, होसाड, वेंकटापूर, भटकळ, मुर्डेश्वर, मंकी, कासरकोड, उप्पीनपट्टण, कोडकणी, हेगडें, कागल, मादनकेरी.

## २१ वा दिग्विजय

( वैशाख शु. ७ मी १८४५ ) कारवार, अंकोला, कुमठा, इ. उत्तर कर्नाटकानंतर, सादोळशें, पाटणें, आगोंद, खोल, असोळणें, कुंकळ्ळी, रिवण, काकोडें, पंचवाडी, दुर्भाट, रामनाथीं, बांदिवडें, मडकई, कुंडई, म्हाडदोळ, गोठण, प्रियोळ, कुंकळयें, डोंगरी, माशेल, डिचोली, शिवोली, म्हापसें, कुंभारजुवें, पानवेल, रायबंदर, थोरलें गोवें, कुठ्ठाळ, बाळ्ळी.

## २२ वा दिग्विजय

( आषाढ शु. १२ शी १८५० ) लोलयें, कारवार, सुंकेरी, कडवाड, बिणगें, चेंडियें, अंकोला, होनावर, कासरकोड, वेंकटापूर, कुमठा, कोडीबाग.

## २३ वा दिग्विजय

( आश्विन व. ८ मी १८५१ ) लोलयें, कारवार, हळगें, अंकोला, मादनकेरी, उप्पिनपट्टण, निलकुंद, सिद्धापूर, बिळगी, गेरसप्पा, कासरकोड, वेंकटापूर, भटकळ, होनावर, हेगडें.

## २४ वा दिग्विजय

( पौष शु. ४ थीं १८६० ) म्हाडदोळ, वेलिंग, गोठण, मडगांव. लोंढा, हरिहर, बसरूर, मंगळूर, उडुपी, मुल्की, बंटवाळ, उप्पीनगंडी, कडूर, बेळगांव, मडगांव, जांबावली, रिवण, कुंकळ्ळी.

## २५ वा दिग्विजय

( आषाढ व. ४ थीं शके १८६३ ) गुरुवर्य श्रीमदिन्दिराकांततीर्थ स्वामीजींचा हा रौप्यमहोत्सवी दिग्विजय; पण तोच त्यांचा अखेरचा ठरला ! या संचारांत त्यांनीं रिवण, जांबावली, डिचोली, सांखळी, गोठण, वेलिंग, म्हाडदोळ, कांदोळी, डोंगरी, रामनाथीं, बांदिवडें, कालापूर, शिर्दोन, पणजी, ताळगांव, कुंभारजुवें, माशेल, कुंडई, मडकई, म्हापसें, हळदोणें, गिरवडें, शिवोली, सावई-वेरें, बेळगांव, शहापूर, बैलहोंगल अशा गांवांना भेट दिली.

## १८

# संचारांतील विशेष

आपल्या पहिल्या संचारांत स्वामीजींनी कारवारपासून भटकळ वेंकटापूरपर्यंतच्या क्षेत्रास भेट देऊन मठानुयायांचें समाधान केलें.

### कोंकणचा दिग्विजय

दुसऱ्या दिग्विजयांत गोमंतकांत आणि वेंगुर्लें, कुडाळ वगैरे कोंकणच्या भागांतील अनुयायांच्या इच्छेप्रमाणें त्यांना दर्शन देऊन खूष केलें.

### दक्षिणी यात्रा

तिसऱ्या संचारांत उडुपी, रामेश्वर, मदुरा - मीनाक्षी, विष्णुकांची, शिवकांची, तिरुपती वगैरे क्षेत्रयात्रा केल्या.

### कर्नाटकांतील मठसुधारणा

चौथ्या व पांचव्या संचारांत कर्नाटकांतील संस्थानमालकीच्या व संस्थानच्या कक्षेंतील विविध मठांची पहाणी करून त्यांच्या सुधारणांची व्यवस्था केली.

### दरबारी स्वागत

सहाव्या संचारांत गोमंतकांतील मठानुयायांच्या इच्छेप्रमाणें मडगांव, सांखळी - डिचोली, बार्देश वगैरे भागांतील लोकांना दर्शन देऊन सावंतवाडी, कुडाळ, मालवण, कोल्हापूर या भागांतील अनुयायांची इच्छाही पूर्ण केली. या प्रसंगीं कोल्हापूर दरबारतर्फे स्वामीजींचें राजेशाही थाटांत अपूर्व स्वागत झालें. दिवाणबहादूर रघुनाथराव शिरगांवकर यांनी प्रगट केलेली स्वामीनिष्ठा अपूर्व होती.

## प्रवचनांची लोकप्रियता

सातव्या, आठव्या नि नवव्या दिग्विजयांत कर्नाटकांतील व बेळगांव जिल्ह्यांतील मठानुयायांची त्यांच्या इच्छेप्रमाणे सेवा घेऊन पुराण, प्रवचनें इ. च्या द्वारा त्यांचें समाधान केलें. प्रवचनें फार लोकप्रिय झालीं.

## राजांकडून स्वागत

दहावा दिग्विजय म्हणजे गोमंतकांतील संचार. या संचारांत श्रीस्वामी श्रीरामनाथ संस्थानांत आल्यावेळीं सोंदेकर नरेश श्रीमान् राजे सदाशिवराव राजेंद्र वडियार यांनी आपला लवाजमा पाठवून आमंत्रण देऊन बांदिवडें येथील आपल्या राजवाड्यांत राजेशाही थाटांत स्वामीजींचें स्वागत केलें. या प्रसंगींच्या छायाचित्रांत स्वामीजी मध्यभागीं बसलेले असून उजवीकडे राजे सोंदेकर व डावीकडे राजपुरोहित किरिट मल्लिकार्जुनस्वामी आसनस्थ आहेत.

## वैष्णवमतप्रसार

अकराव्या संचारांत स्वामीजींनी कोंकणप्रांतीय अनुयायांच्या इच्छे-प्रमाणे त्या भागांत दर्शन देऊन पुराणप्रवचनांच्या द्वारा अनेकांची दृष्टी वैष्णव मताकडे वळविली, व वैष्णव मताचा प्रसार केला.

## उत्तरेकडील यात्रा

बाराव्या संचारांत स्वामीजींनी मथुरा, वृंदावन, गोकुळ, प्रयाग, काशी, गया, अयोध्या, हरिद्वार, बिल्वकेदार, हृषिकेश वगैरे यात्रा केल्या.

## हंपी ते द्वारका दर्शन

तेराव्या संचारांत विजयनगर, हंपी-विरूपाक्ष, द्रोणाचलम्, जगन्नाथ-पुरी, भुवनेश्वरी, रामटेक, नर्मदातट, ओंकारेश्वर, उज्जैन, डाकोर, सोम-नाथपट्टण, द्वारका इ. यात्रांचा स्वामीजींना दर्शनयोग आला.

## धार्मिक सुधारणा

चौदावा दिग्विजय स्वामीजींनी कर्नाटकमधील निरनिराळ्या भागांत करून तेथील अनुयायांच्या विविध धार्मिक कार्यांत अधिक प्रगत स्वरूप आणलें.

## प्रवचनांचें आकर्षण

पंधरावा संचार हुबळी-मद्रासकडे झाला. या संचारांत स्वामीजींनी तिरुपती, सुब्रह्मणेश्वर, चिदंबर, मातुलिंग, तिरुमल, अनंतशयन वगैरे यात्रा केल्या आणि विद्वत्ताप्रचुर प्रवचनांनी सर्वांना आकृष्ट केलें.

## मतभेद मिटविले

सोळावा संचार स्वामीजींनी दक्षिण व उत्तर कर्नाटकांत केला. त्यावेळी तिकडील कांही कांही धार्मिक मतभेद मिटवून उभय पक्षीं समाधान करून दिलें.

## बदरिकाश्रम यात्रा

सतराव्या संचारांत नाशिक, हरिद्वार, हृषिकेश, प्रयाग, बिल्वकेदार, श्रीनगर, रुद्रप्रयाग, पाताळगंगा, नंदप्रयाग, बदरिकाश्रम वगैरे यात्रा केल्या.

## कोंकणचें प्रचारकार्य

अटराव्या दिग्विजयांत कोंकणचें प्रचारकार्य व हंपी, तिरुपती, विष्णुकांची, शिवकांची, रामेश्वर, दर्भशयन इ. यात्रा झाल्या.

## धार्मिक समेट

एकोणिसाव्या व विसाव्या संचारांत स्वामीमहाराजांनी गोमंतकांतील व कर्नाटकांतील अनेक मठानुयायांच्या आमंत्रणावरून तेथील निरनिराळ्या गांवांना भेटी देऊन तेथील धार्मिक प्रकरणे मिटविलीं आणि सामाजिक स्नेहभाव वाढविला.

## गोमंतक-देवदर्शन

एकविसाव्या दिग्विजयाचा आरंभ कर्नाटकांत झाला आणि नंतर दक्षिण गोमंतकापासून उत्तर गोव्यापर्यंतच्या ठळक गांवांना भेट देत स्वामींनी निरनिराळ्या देवांचें दर्शन घेतलें.

## मठांची पहाणी

बाविसावा व तेविसावा दिग्विजय कर्नाटकांत झाल्याने तिकडील संस्थानी मठांची पहाणी करण्यांत आली. त्यामुळें अनेक मठांत सुधारणा घडून आली. तिकडच्या कांही मतभेदांचीही परिसमाप्ती होऊन मठानुयायांत समाधानी दिसून आली.

## उडुपी भेट

चोविसाव्या संचारांत स्वामीजींनी प्रथम अंत्रूज येथील कांही गांवांना भेटी देऊन निरनिराळ्या देवांचें दर्शन घेतलें आणि नंतर मडगांववरून हरिहरमार्गे बसरूर, मंगळूर, उडुपी या गांवांना भेटी दिल्या.

## रौप्यमहोत्सवी दिग्विजय

पंचविसावा संचार हा स्वामीमहाराजांचा रौप्यमहोत्सवी दिग्विजय; तथापि तो त्यांचा अखेरचाच संचार ठरला. या संचारांत त्यांनी रिवण मठांत प्रथमतः येऊन श्रीमारुतीच्या भेटीनंतर पीठाचे सहावे मठाधिपती श्रीमद्रामचंद्रतीर्थस्वामी यांच्या वृंदावनाचें दर्शन घेतलें. त्या मठाच्या कक्षेंतील कांही गांवच्या अनुयायांचे मतभेद मिटविले व सर्वांना समाधान प्राप्त करून दिलें.

या पंचविसाव्या दिग्विजयांत प्रत्येक ठिकाणी गुरुमहाराजांचें अपूर्व हार्दिक स्वागत झालें. श्रीगोकर्ण-पर्तगाळी पीठानुयायांनी मोठ्या उत्साहाने जे त्यांचे सत्कारसमारंभ केले त्यांचा थाट आगळाच होता.

# पणजी येथील अपूर्व स्वागत

पणजी शहरांत चार घोड्यांच्या सुशोभित रथांतून पोष्टकचेरी, पॅलेस या बाजूने प्रचंड मिरवणूक निघाली होती. गर्दी श्रीमहालक्ष्मी देवालयापर्यंत सारखी वाढतच होती. देवालयांत प्रवेश करून देवतेच्या भेटी वगैरे झाल्यावर श्रीस्वामी खास सुशोभित आसनावर विराजमान झाले आणि सार्वजनिक पाद्यपूजा झाल्यावर निरनिराळ्या सद्भक्तांच्या असंख्य पाद्यपूजा थाटामाटांत झाल्या.

मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी शके १८६३ रोजीं गोमंतकाच्या राजधानींत पणजी येथें घडून आलेला मोठ्या थाटाचा हा सोहळा न भूतो न भविष्यति असा अपूर्व होता. स्वामीजींच्या या प्रचंड मिरवणुकींत सर्व धर्मांच्या लोकांनी उत्स्फूर्त भाग घेतला होता.

# स्वामीजींचें कार्य

श्रीइंदिराकांततीर्थ स्वामी महाराजांचें पारमार्थिक, धार्मिक, सामाजिक वगैरे सर्वच कार्य अत्यंत महत्त्वाचें व फार मोठें आहे.

## मठाचा उत्कर्ष

श्रीमन्नारायणतीर्थ, श्रीमद्जीवोत्तमतीर्थ, श्रीमद्रामचंद्रतीर्थ अशा आद्य आचार्यांप्रमाणेच श्रीइंदिराकांततीर्थ स्वामी महाराजांनीही आपल्या संप्रदायी पीठाचा तर विविध रीतीने उत्कर्ष साधलाच; पण सांप्रदायिक मठानुयायांचें कल्याण कसें साधतां येईल या गोष्टीवरील आपली दृष्टीदेखील कधीच ढळूं दिली नाही.

## पीठाचा लौकिक वाढविला

स्वामीजींनी आपल्या पीठाचा लौकिक वाढविला, तसेंच वैभवही वाढविलें; पण अत्युच्च मार्गाने. त्यांनी आपला संप्रदाय बळकट करून इतरांनाही आकर्षित केलें तें आपल्या गोड व प्रभावी वाणीने. इतर पीठांच्या अनुयायांनाही ते हवेहवेसे वाटले ते त्यांच्या आध्यात्मिक तपस्तेजाने, असामान्य विद्वत्तेने आणि सुरस व सुबोध वाणीने.

## स्मार्तांचा वैष्णव संप्रदायांत प्रवेश

श्रीमन्नारायणतीर्थ स्वामींनी अनेक स्मार्त सांप्रदायिकांना वैष्णव संप्रदायांत प्रवेश दिला. श्रीरामचंद्रतीर्थ स्वामींनी ती परंपरा तर पुढे

चालविलीच; पण एक पाऊल पुढें टाकून पैंगिणी, लोलयें, खोल, कुर्डी येथील पेडणेकर प्रभू देसाई आणि रिंवण येथील भट्ट प्रभू देसाई या ब्रम्ह-वृंदांचा माध्वमताच्या वैष्णव संप्रदायांत समावेश करून घेतला. त्याचप्रमाणे श्रीमद्इंदिराकांततीर्थ स्वामींनीही कारवारचे हळदीपूरकर, शहापूरचे सराफ ई. स्मार्त सांप्रदायिकांना वैष्णव संप्रदायांत प्रवेश दिला.

## वादनिरसन

बार्देशकर प्रकरणादि प्रश्न मिटत आले, तरी परदेशगमनादि विविध प्रश्नांच्या वादामुळे सारा समाज ढवळून निघाला होता. त्या वादाचेंही स्वामीजींच्याच कारकिर्दीत योग्य रीतीने निरसन झालें.

## पीठाधीशांचें सख्य

सर्व पीठाधीश स्वामींचा एकमेकांशीं विचारविनिमय होऊन सख्य व्हावें आणि अनुयायांचें कल्याण व्हावें अशी स्वामीजींची उत्कट इच्छा असल्याने तशा संधी ते कधीच दवडीत नसत. उलट त्या संधी जुळवून आणण्याचीही त्यांची तयारी असे. तथापि प्रतिसाथीच्या अभावी आरंभी इच्छा फलद्रूप होणे लांबणीवर पडे; पण पुढे हें कार्य उत्सुकतेने घडून येऊं लागले आणि त्याचे कारण स्वामीजींचे तपस्तेज, विद्वत्ता, अधिकारी वाणी व प्रभावी व्यक्तिमत्त्व हें होय.

## देशस्थ सारस्वत सख्य

देशस्थ आणि सारस्वत यांमध्ये पूर्वी एक झिरझिरीत पंथ-पडदा अडखळत होता. तो ज्ञानचक्षूंच्या तीव्रतेने जळून गेला आणि प्रेमाच्या देवघेवीने एकमेकांना जवळ आणलें.

उडुपी अष्टमठांतर्गत फलिमारू मठ व गोकर्ण-पर्तगाळी मठ यांचें सख्य बऱ्याच कालापासून होतें; पण श्रीइंदिराकांततीर्थ स्वामीजींच्या कारकिर्दीत फलिमारू, पुत्तिगे, शिरूर, काणुरू, कृष्णापूर मठ, अदमारू मठ, सोदे मठ, पेजावर मठ अशा सर्व मठांशीं सख्य होऊन स्वामीजींचा ज्या

ज्या वेळी उडुपीजवळच्या भागांतून संचार होई त्या त्या वेळी त्यांना आग्रहाने निमंत्रण देऊन प्रत्येक मठांत त्यांचे थाटाने स्वागत करण्यांत येई.

## संमेलनाची इच्छा

शके १८६० सालच्या उत्तरार्धात (सन १९३८) श्रीमद्इन्दिराकांततीर्थ स्वामींचा संचार मंगळूर येथें झाला, त्यावेळी श्रीकाशीमठाधीश श्रीसुकृतेंद्रतीर्थ स्वामींनी पौष अमावास्या रोजी त्याना थाटाने आपल्या मठांत नेऊन त्याचा मोठा सत्कार केला. यावेळीं कैवल्यपूर मठाधीशांचेही आगमन व्हावे आणि तिन्ही पीठाधीशांचे संमेलन होऊन अनेक आवश्यक धार्मिक प्रश्नांवर चर्चा व्हावी अशी श्रीगोकर्ण - पर्तगाळ मठाधीश श्रीमद्इन्दिराकांततीर्थ स्वामींची उत्कट इच्छा होती. श्रीकाशीमठाधीशांचीही या त्यांच्या विचारास योग्य साथ मिळाली; तथापी श्रीकैवल्यपूर मठाधीशांना कांहीं अपरिहार्य अडचणीने सवड न झाल्याने तो संमेलनाचा आवश्यक योग जुळून आला नाही.


## एकमताचा निर्णय

यानंतर स्वामीजींनी मंगळूर येथील स्वकीय मठांत श्रीकाशीमठाधीशांना पाचारण करून थाटाने व मोठा गौरव केला. या प्रसंगीं विविध धार्मिक प्रश्नांवर उभय पीठाधीशांची बरीच चर्चा होऊन अनेक विषयांवर एकमताने निर्णय घेतला.

## माध्वसंप्रदायी संमेलन

माघ वद्य दशमी शके १८६० रोजी उभय स्वामींचा संचार उडुपी येथें झाला. तेथें माध्वसंप्रदायी मठाधीशांचें संमेलन भरावयाचें होते आणि त्या संमेलनासाठी यांना आग्रहाचें आमंत्रण होतें. संमेलनाचा कार्यक्रम भरगच्च होता. निरनिराळ्या धार्मिक प्रश्नांवर मुक्त चर्चा झाली. स्वामीजींचीं मतें सर्वांना मान्य झालीं. कार्यक्रम पूर्णपणे यशस्वी झाला.

श्री काशी मठाधीशांनी प्रमाथी संवत्सर श्री रामनवमी महोत्सवास
श्रीमठ पर्तगाळी येथें आगमन केल्यावेळीचा फोटो



श्रीमत् सुकृतेंद्र तीर्थ स्वामी
काशीमठ

श्रीमद् इंदिराकांत तीर्थ स्वामी
गोकर्ण मठ

श्रीमत् कमलानाथ तीर्थ स्वामी
(शिष्य स्वामी गोकर्ण मठ)

श्री गोकर्ण मठ आणि श्री काशी मठ स्वामीजींचे इ. सन फेब्रुवरी १९३९
उडुपी येथें अेका कार्यक्रमास आगमन केल्यावेळीं परस्पर भेटीचें दृश्य



श्रीमत् कमलानाथ तीर्थ (शिष्य स्वामी गोकर्ण मठ) श्रीमद् इंदिराकांत तीर्थ स्वामी गोकर्ण मठ श्रीमत् सुकृतेंद्र तीर्थ स्वामी काशी मठ

## मानपत्र

याच संमेलनांत श्रीइन्दिराकांत स्वामीजींचा मोठा गौरव करून त्यांना महावस्त्र वगैरेसह मानपत्र देण्यात आलें.

## काशीमठाधीशांचे पर्तगाळींत आगमन

उडुपी येथील संमेलनाचा हा कार्यक्रम संपल्यानंतर सशिष्य श्रीगोकर्ण पर्तगाळी मठाधीश व श्रीकाशीमठाधीश यांचे आगमन गोमंतकांत पर्तगाळी मठांत झालें. मठानुयायांकडून फार मोठा स्वागतसमारंभ झाला.

## रामनवमीबद्दल खुष

आग्रहामुळें श्रीकाशीमठाधीश शके १८६१ च्या रामनवमी महोत्सवास उपस्थित होते. या महोत्सवाचा अपूर्व थाट व विविध वेधक कार्यक्रम पाहून श्रीकाशीमठाधीश खूष झाले.

## सख्यत्वाचे संबंध

उभय स्वामीजींच्या या भेटींत परस्परांनी सख्यत्वाचे संबंध अधिकाधिक वाढविण्याची इच्छा प्रगट करून मैत्रीवर हार्दिक शिक्कामोर्तब केलें. दीर्घकालपर्यंत उभय मठांमध्ये जें अंतर होतें तें जाऊन सख्यत्वाचे संबंध दृढ झाले. याचें फार मोठें श्रेय श्रीमद्इंदिराकान्ततीर्थ स्वामीमहाराजांना आहे हें उघड आहे.

अगदी जवळच्या अशा या दोन पीठांच्या सख्यत्वाची ही बैठक वैशाख वैद्य तृतीया शके १८६१, ता. ६ मे १९३९ रोजी पर्तगाळी मठांत अनेक अनुयायांच्या उपस्थितींत घडून आली.

## शिक्षण व साहित्यास प्रोत्साहन

शिक्षण व साहित्य या उभय क्षेत्रांतील स्वामीजींची कामगिरी फार कौतुकास्पद अशी आहे. प्रत्यक्ष पर्तगाळी मठांत, त्याचप्रमाणे अन्य स्वकीय

मठांतून स्वामीजींनी सुरू केलेलें ज्ञानदानाचे कार्य, संस्कृत साहित्याप्रमाणेच मराठी साहित्याला वेळोवेळी दिलेलें प्रोत्साहन, साहित्यिकांचें व कलावंतांचें केलेलें सक्रिय कौतुक अपूर्व असेंच आहे.

## दातृत्व

स्वामीजींनी आपल्या कारकिर्दीत अनेक मठांचा जीर्णोद्धार केला; देवमंदिरांची सुधारणा केली; विद्यार्थ्यांना मदत दिली, मौंजीबंधन, विवाह यांसाठी सहाय्य मागण्यास आलेल्यांना सहर्ष सहाय्य दिलें. त्याचप्रमाणे आर्थिक अडचणीने गांजलेल्यांचे ढासळणारे संसार धीर देऊन सक्रिय आशीर्वादाने सावरले.

## द्वैत तत्त्वज्ञानांत निष्णात

गुरुवर्य श्रीइंदिराकान्ततीर्थ स्वामी हे संस्कृत साहित्यांत निष्णात असून वेदांततत्त्वज्ञानांत फार प्रवीण होते. त्यांचा द्वैततत्त्वज्ञानाचा अभ्यास तर अपूर्व होता.

## द्वैत गीता-तत्त्वज्ञान

मूळ भगवद्गीता, द्वैतमतप्रस्थापक श्रीमध्वाचार्य यांचें गीताभाष्य व गीता-तात्पर्य अशा सर्व समर्थ ग्रंथांचें मर्म लक्षांत आणून त्यांनी जें द्वैत गीता-तत्त्वज्ञान अनेक पुराव्यांनिशीं प्रगट केलें तें अपूर्व आहे. स्वामीजींच्या श्रीभगवद्गीतेच्या प्रत्यक्ष वाचनावांचून तें आता कळणे शक्य नाही. त्यांच्या हयातींत त्यांच्या पुराण-प्रवचनांतून श्रोत्यांना त्याचा उत्कृष्ट लाभ घडत होता, याची सर्वांना माहिती व अनेकांना अनुभव आहे.

## गीताग्रंथाची योग्यता

गीता-तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणारांनी श्रीइंदिराकांततीर्थ स्वामी महाराजांचा गीताग्रंथ जरूर वाचावा अशा योग्यतेचा आहे.

## पंक्तिपावन

शिक्षण, नोकरी, व्यवसाय वगैरेसाठी समाजांतील तरुणांना वरचेवर परदेशगमन करावे लागत होतें; पण त्या लोकांना जुन्या नियमाप्रमाणे अपंक्त मानण्यात येत असे. त्यामुळें ते स्वदेशीं आल्यावर त्यांची फार कुचंबणा होई. याबद्दल अनेकांनी आपापल्या धर्मपीठांकडे अर्ज करून पावन करून घेण्याची विनंतीही केली. तथापी एकाही मठाधीशाकडून त्यांना रुकार मिळेना. एकाने तर असे स्पष्ट उत्तर दिले की – "परदेशगमनाला देहांत प्रायश्चित्तच योग्य आहे!"

हे प्रकार लक्षांत घेऊन श्रीइंदिराकांततीर्थ स्वामींनी पहिल्या प्रथम सक्षौर प्रायश्चित्त व तीर्थाटन या साधनांनी त्यांना पावन करून घेण्यास आरंभ केला.

## वेलिंग येथील सभा

पुढे स्वकीयांच्या प्रयत्नाने व स्वामीजींच्या संमतीने वेलिंग येथें जी जाहीर सभा झाली त्या सभेंत या विषयावर बरीच चर्चा झाली. या सभेला श्रीस्वामीजींच्या आगमनाने आरंभ झाला आणि आपलें आशीर्वादपर भाषण करून स्वामी आपल्या निवासस्थानी गेले. नंतर डॉ. आ. गो. बोरकर यांच्या अध्यक्षतेखाली सभेच्या कामास सुरवात झाली. वे. मू. गिरीराय आचार्य, शांबाराव सरदेसाई, रामचंद्र कृ. कामत, ना. भा. नायक, उपेंद्र त्रि. तळावलीकर वगैरे अनेकांचीं भाषणे झालीं.

## परदेश गमनाचा प्रश्न सुटला

कित्येकांनीं सक्षौर प्रायश्चित्ताची बाजू मांडली तर कांहींकांनी कसलेंच बंधन नसावे अशीं इच्छा प्रदर्शित केली. शेवटी तीर्थप्रसादासारख्या सौम्य विधीने परदेशगमन करून आलेले पुनीत व्हावे ही ना. भा. नायक यांची सूचना जमेस धरून सभेने ठराव केला व तो एकमताने संमत झाल्यावर सभेच्या शिष्टमंडळाने स्वामीजींच्या निवासस्थानी जाऊन त्यांना सादर

केला. या ठरावावर विचार करून स्वामीजींनी मग योग्य तो निर्णय घेतला व हा परदेशगमनाचा प्रश्न फार सोइस्कर रितीने सोडवून अनुयायांचें समाधान केलें.

## बार्देशकर

सन १५७० साली पाद्रींच्या धुमाकुळामुळे धर्मभ्रष्टतेच्या भयाने जे ब्रह्मवृंद बार्देशमधून निघून वाडकर भोंसले यांच्या हद्दींत डिचोली भागांत जाऊन राहिले त्यांच्यांत व त्या प्रदेशावरील अधिकारी देसाई यांच्यांत कांहीं कारणामुळे वाद माजला. कोणी म्हणतात की, देसाई याने त्यांच्याकडे रहिवास - कर म्हणून कांही रक्कम मागितली व त्यानी ती न देता परस्पर राजाकडे तक्रार केली म्हणून वैमनस्य आलें. कांहीं तरी असमंजस कारणामुळें हा किंतु उपस्थित झाला आणि त्याच्या रागांत अधिकाराच्या जोरावर 'हे लोक त्यांच्या जमातीने वाळींत टाकलेले बार्देशकर आहेत' अशी देसाई व त्यांच्या अंकित लोकांनी अफवा उठवली. पुढें स्वकीय लोकांनीही ही गोष्ट कधी कोणाकडून कशी घडली याचा शोध अगर विचार न करतां 'बार्देशकर' म्हणून त्यांना बहिष्कृत ठरवलें !

## पीठाकडे तक्रार

पुढें याबद्दल बार्देशकर ब्रह्मवृंदाने पीठाकडे तक्रार केली. पीठाकडे त्यांना बहिष्कृत करण्याचा कोणताच पुरावा नसल्याने त्यांनी मूळ सासष्टीकर व बार्देशकर यांमधील हा वाद मिटविण्याचे धोरण ठेवले. पण फलनिष्पत्ती झाली नाही.

## बार्देशकर निर्दोषी

अशा रीतीने बराच कालपर्यंत भिजत पडलेलें हें घोंगडें निकालांत निघावे या हेतूने बार्देशकर वर्गातील प्रमुख पुढाऱ्यांनी स्वामीजींकडे विनंतिपत्राद्वारे व प्रत्यक्ष तक्रार नेऊन चर्चा करून स्वामीजींना हा वाद पोकळ असल्याचें सिद्ध करून दाखविले. नंतर स्वामीजींनी मठांतील कागदपत्र

पाहून स्वतःची खात्री करून घेतली आणि बार्देशकर ब्रम्हवृंद पूर्णपणे निर्दोष असल्याचे जाहीर करून ठिकठिकाणी त्याबद्दलच्या माहितीचे आज्ञारायस पाठविले.

## ऐक्य

अशा रीतीनें श्रीइंदिराकान्त स्वामींनी हा स्वकीयांमधील दीर्घकालीन भेद नष्ट करून सासष्टीकर व बार्देशकर यांचे पूर्ण ऐक्य केले आणि समाजाचे धन्यवाद मिळवले.

## कामत महामाय प्रकरण

माशेल येथील धूपकर शास्त्र्यांमुळे हें प्रकरण उद्भवलें आणि पुढें त्यांत कामत महामाय यांचा समावेश होऊन तें वाढत चाललें. धूपकरांपुरतेंच मर्यादित तें होतें तेव्हां त्यांत महत्त्व वाटत नव्हतें, पण पुढे त्यांत कामत यांचा अंतर्भाव झाल्यामुळे त्याला निराळे स्वरूप येत गेलें. होतां होतां त्या प्रकरणामुळे स्वकीयांतही भेद पडण्याचीं चिन्हे दिसूं लागलीं. त्यामुळें समाजांतील कित्येकांनी तें मिटविण्याचा प्रयत्न आरंभला. पण त्यांना यश न येतां तें तसेंच चालू राहिलें. या प्रकरणामुळे पुढे दोन तट पडले आणि त्यांत खासगी द्वेषही डोकावू लागला.

## प्रकरण मिटविलें

अखेरीस बराच कालपर्यंत चाललेले हें प्रकरण स्वामीजींनी आपल्या अखेरच्या दिग्विजयांत पणजी येथे एकदाचे मिटवून टाकलें. यानंतर स्वामीजींनी कामत महामाय यांच्या विनंतीप्रमाणे अनेक वर्षांनंतर नव्याने त्यांच्या निवासस्थानात प्रवेश केला आणि कामत यानी भक्तिभावाने समारंभपूर्वक पाद्यपूजा करून आपली गुरुनिष्ठा व्यक्त केली.

## एकी बेकी प्रकरण

गौड सारस्वत ब्राम्हणांतील पोटभेद नष्ट व्हावे व सर्व सारस्वतांचे एकीकरण व्हावें या उद्देशाने समाजांतील कित्येक सुधारकांनी पुढे येऊन एकी परिषद भरविण्याचा प्रयत्न चालविला. याच परिषदेचें एक अंग सहभोजन हें होतें. या मताच्या लोकांचा जो पक्ष तो एकी पक्ष या नांवाने प्रसिद्धीस आला.

## बेकी

जुन्या मताच्या लोकांना हें एकीकरण म्हणजे आपल्या वर्गनियमाबाहेरचें असून सत्रगोलंकारी अतएव त्याज्य असें वाटत असल्याने ते एकीचे विरोधक होते आणि त्यासाठी त्यांच्या पक्षाला बेकी पक्ष असें नामाभिधान प्राप्त झालें होतें. जैसे थे या विचाराने धर्मपीठेंही या बाजूची होतीं.

## समाज विस्कळूं लागला

उभय पक्षांच्या चळवळी सुरू झाल्या, परिषदा भरूं लागल्या, समाजांत व नात्यागोत्यांतही दुहीचीं बीजें रुजलीं. एकी पक्षांतील लोकांविरुद्ध व त्यांच्याशीं संबंध ठेवणाऱ्यांविरुद्ध पीठाधीशांकडे विनंतिपत्रें जाऊं लागलीं व त्यामुळे त्यांच्याविरुद्ध रायसही सुटूं लागले, आणि या सगळया प्रकारांचा असा परिणाम झाला कीं, सारा समाज ढवळून विस्कळीत होत चालला. बराच काल अशा स्थितींत गेला.

## समेट

स्वामीजींनी संचारास गेल्यावेळीं ठिकठिकाणचें स्वसमाजांतील या एकीबेकी प्रकरणामुळें माजलेलें अस्थैर्य, असमाधान, विस्कळीतपणा यांचें दृश्य प्रत्यक्ष पाहिलें व त्यांचें कोमल मन कळवळलें. त्यांनी उभय पक्षांतील विचारवतांपुढें भविष्यांतील दुष्परिणामांचें दृश्य उभें केलें. पुढाऱ्यांना स्वामीजींचें म्हणणे पटलें. ऐक्याच्या दृष्टीने स्वकीय अनुयायांचीं चक्रें फिरूं लागलीं आणि मग श्रीस्वामीमहाराजांनी सुंदर समेट घडवून वर्गाचें कल्याण केलें.

## विशाल दृष्टी

पीठानुयायांप्रमाणेंच स्वामीजींची इतरांवरही चांगली कृपादृष्टी होती. कोणत्याही पीठाचा असो, कोणत्याही मताचा असो, अगर कोणत्याही धर्माचा असो, मनुष्य सज्जन असला म्हणजे स्वामीजींची कृपादृष्टी त्याच्याकडे सहज वळे. त्यामुळें सगळेच लोक स्वामीजींना देवासमान पूज्य मानीत. ब्राम्हण असो किंवा ब्राम्हणेतर असो, हिंदू असो अगर हिंदेतर असो, सगळ्यांशीं त्यांचें सख्य. अनेक युरोपीयन विद्वानही मुद्दाम स्वामीजींच्या भेटीस येत आणि त्यांच्याशी संस्कृतमध्ये चर्चा करीत.

## कृपावंत

सन १९१४ च्या सुमारास कणकुंबी येथें भागीरथीचा उदय झाल्याने यात्रा चालू होती. श्रीइंदिराकान्ततीर्थ गुरुस्वामी व श्रीकमलानाथतीर्थ शिष्य-स्वामी यांचाही तेथें संचार झाला होता. स्वामीजींच्या संचाराची बातमी बेळगांवकडे पसरली. त्यावेळचा तेथील कलेक्टर 'मॅकग्रेगर' असेंच कायसें त्याचे नांव. तो मुद्दाम स्वामीजींच्या भेटीसाठी कणकुंबीला आला. त्याच्यासोबत त्याची गृहिणीही होती. पतिपत्नीमध्ये एक प्रेमळ वाद चालला होता. तो म्हणे, 'गृहाचे भूषण पुरुष' व ती म्हणे, 'गृहाचे भूषण स्त्री'. भेटीनंतर स्वामीजींशीं त्या पतीपत्नीचें संस्कृतमध्यें भाषण चाललें होतें. अकस्मात् स्वामीजींकडे तिनें प्रश्न केला — "स्वामीजी, एक प्रश्न विचारावासा वाटतो. परवानगी आहे का?" स्वामीजी उत्तरले — "हरकत नाही."

ती प्रश्नाळली — "आमच्यांत एक वाद चाललाय म्हणून विचारतें. घराचें भूषण पुरुष कीं स्त्री?"

स्वामीजी हंसत उत्तरले — "सुगृहिणी."

उभयतां पतिपत्नी स्वामीजींच्या या उत्तराने चकित झालीं, व आनंदून उद्गारलीं — "स्वामीजी कृपावंत आहेत."

गुरुवर्य श्रीइंदिराकांत स्वामीमहाराजांची अशी खेळीमेळीची व विशाल दृष्टीची वागणूक होती.

# मुक्ती

शके १८६४ (सन १९४२) सालांतील श्रीरामनवमी महोत्सव यथासांग साजरा झाला आणि त्यानंतर तरुणांचा नाट्यसेवा उत्सव सुरू झाला. प्रयोगाच्या आरंभी श्रीस्वामीमहाराजांनी मंडपांत येऊन प्रेक्षकांमधील खास आसनावर बसावे व नाटकप्रयोगांतील कांही प्रवेश अवलोकन करावे अशी भूमिका घेणारांची उत्कट इच्छा असते. आणि त्यासाठी ते आधी आमंत्रण देऊन आदराने स्वामींना मंडपांत घेऊन जातात व ते आसनस्थ झाल्यावर प्रयोगास सुरवात होते.

## अस्वास्थ्य

वार्षिक पद्धतीप्रमाणे गुरुस्वामी व शिष्यस्वामी मंडपांतील आसनावर विराजमान झाले. सिंहाचा छावा नाट्यप्रयोग सुरू झाला. स्वामीजींनी थोडा वेळ प्रयोग पाहिला; पण लगेच त्यांना अस्वास्थ्य वाटूं लागलें. ते उठले व शयनमंदिरांत आले. शागिर्द सोबतीला होतेच.

अंगांत दाह होऊं लागल्यासारखें वाटलें म्हणून ते आडवे झाले. पण स्वास्थ्य वाटेना. ते पलंगावरून खाली उतरले व शीतल जमिनीवर झोपले; पण आराम दिसेना. ही स्थिती ऐकून शिष्यस्वामी व इतर लोक तेथें जमा झाले. तोंच त्यांना श्वास सुरू झाला. सारी मंडळी घाबरली. तथापी उपचारांनंतर त्यांना किंचित् बरें वाटलें.

## धाबें दणाणलें

दुसरा दिवस उजाडला. गुरुमहाराजांनी स्नान, जपादि नित्यकर्मे

उरकलीं व भिक्षेनंतर शतपावली करीत असतां अकस्मात् रक्तयुक्त आम्ल-पित्तासारखी उलटी होऊन त्यांना पुन्हा श्वास लागला. अनेक उपचार केले, पण गुण दिसेना. सर्वांचें धाबें दणाणलें.

## धावपळ सुरू

श्रीगुरुमहाराज अस्वस्थ असल्याची वार्ता वाऱ्याप्रमाणे आसपासच्या गावांत पसरली. शेंकडों लोक समाचारासाठी मठांत येऊं लागले, सर्वत्र धावपळ सुरू झाली. आजाराची वार्ता तारांनी जिकडे तिकडे कळविण्यात आली.

## अंतकालीन लक्षणें

चैत्र वद्य सप्तमी मंगळवारी श्रींची प्रकृती जरा सुधारल्याचें दिसून आलें. नेहमीप्रमाणे त्यांनी आपलें आन्हिक आटोपलें. पण संध्याकाळीं पांचानंतर त्यांच्या प्रकृतीचें स्वरूप एकदम पालटलें. उपायांना दाद मिळेना. हेमगर्भादि प्रभावी मात्रेचाही कांहीं उपयोग होईना. लागलीच अंतकालीन लक्षणें दिसूं लागलीं !

## लोक सद्‌गदित झाले

रात्रौ १२ च्या सुमारास त्यांना दर्भासनावर बसवून परंपरेस अनुसरून महादानें, दशदानें संकल्पून वेदपठनाने व वाद्यघोषांत उचललें आणि श्रीराम-देवमंदिरास प्रदक्षिणा घालून देवासमोर स्तंभाला टेकून बसविण्यात आलें. वैदिकांकडून श्रीमद्‌भागवत, श्रीभगवद्‌गीता, द्वादशस्तोत्रें वगैरेचा पाठ सुरू झाला. ठिकठिकाणचे मठानुयायी व अन्य लोक मोठ्या संख्येने एकत्र झाले. जो तो म्लान वदनाने एकमेकांकडे पाहूं लागला. शिष्यस्वामी श्रीकमलानाथ-तीर्थ व लोक सद्‌गदित झाले.

## मुक्ती

अशा रीतीने चैत्र व. ७ मी मंगळवारी रात्रौ १२ वाजतां श्रीगुरुमहाराजांनी श्रीवीरविठ्ठलासमोरच श्रीमन्नारायणस्मरणपूर्वक लयचिंतन करीत पार्थिव देहाचा त्याग केला. सर्वांना अत्यंत खेद वाटला. स्वामीजींचा ५७ वर्षांचा गोड संबंध आणि अर्धशतकाची श्रीगोकर्ण-पर्तगाळी पीठाधीश म्हणून सर्वत्र गाजलेली त्यांची अपूर्व कारकीर्द लोकांच्या दृष्टीपुढें वरचेवर चमकूं लागली.

श्रीस्वामीमहाराजांचा देह अलिप्त झाला; पण दशदिशांत प्रकाशणारे त्यांचे कीर्तिकिरण जनतेसाठीं अमर राहिले.

## वृंदावन

वृंदावनासाठी भूमि-उत्खनन चालू झालें. शिष्यस्वामी व शिष्यवृंदांतील अनेक लोक यांनी स्नानादि विधी आटपून गंगोदक, पंचामृत, १०८ शहाळ्यांचे पाणी, १०८ कलश शुद्धोदक अशा रीतीने श्रीगुरुदेवांच्या पार्थिव देहावर अभिषेक केला. शिष्यस्वामींनी त्यांना गोपीचंदन, अंगारा, अक्षत लावलें आणि तुलसीमाला व पुष्पमाला त्यांच्या गळ्यांत घातल्या.

## वृंदावनकुंड आच्छादलें

यानंतर वृंदावनांत त्यांना शंख, कलश इ. साधनानी अभिषेक करून पुन्हा गंधलेपनादि विधी झाल्यावर मंत्रोच्चाराने सवाद्य वेदघोषांत त्यांचा पुण्य देह दर्भासनावर योगासनपूर्वक स्थापन केला. हातांत दंड देऊन संन्यासपद्धतीचे सर्व अंत्यसंस्कार पार पाडले. वासुदेव शालिग्राम, रौप्य आरती, कास्यघंटा, लघुशंख, चांदीच्या मुद्रा, तुलसीमणिमाला इ. वस्तूंची वेताची करंडी, काष्ठपादुका, ताट वगैरे वस्तु सन्निध ठेवून मंत्रोच्चारपूर्वक यतिसंस्कार पूर्ण केला व विविध द्रव्यांनी कुंड पूर्ण भरून आच्छादित करण्यात आलें.

## गुणवर्णनपर भाषणे

शिष्यस्वामीसह सर्वांनी वृंदावनाला प्रदक्षिणा घातल्या व सर्व सद्गदित अंतःकरणाने आंतल्या दालनांत आले. कांहीं अनुयायांचीं गुरुदेवांच्या गुणवर्णनपर भाषणें झालीं आणि त्यानंतर मंडळीने गंगास्नान व देवदर्शन केलें.


श्रीस्वामीजींचे हें वृंदावन त्यांच्या परमगुरूंच्या म्हणजे श्रीमत्पूर्णप्रज्ञतीर्थ स्वामीजींच्या वृंदावनामागें आहे.

# आरती

चाल ( भूपती खरें तें वैभवसुख० )

ॐ नमो इन्दिराकान्ततीर्थ गुरुराया ।
ओवाळिन पंचारती पंचभूत काया ॥ धृ० ॥
वैराग्यस्नान ज्ञानतिलक तो भाळा ।
नवविधाभक्ति हे नवरत्नांची माळा ।
मुद्रिका अगोचर्यादि छात्रजनभाळा ।
दृढशांति मेखला झळके विद्युज्ज्वाळा ।
( चाल ) पुरुषार्थ-सुमन-हारातें पाळिला ।
अभिमान-धूप हा सारा, जाळिला ।
संसृतिरूप हा दीप प्रज्वाळिला ॥
( पूर्व चाल ) नैवेद्य भाव-शकरा अर्पु हर्षाया ॥ ओंवाळिन० ॥१॥
अर्पितों श्रुतिस्मृति मंत्रपुष्प हें माथां ।
गाईन मुखानें अगण्य गुणगण-गाथा ।
हे प्रदक्षिणा सत्वाची सज्जन नाथा ।
या विवेक-नमनें तारि अशा अनाथा ।
(चाल ) किति सद्गुण गाते प्राणी पाळिले ।
दुर्दैव तयाचें सारें जाळिलें ।
किति मलीन जन तीर्थानें क्षाळिले ।
(पूर्व चाल) भवगर्दीं तारिले शुद्ध करुनियां काया ॥ओंवाळिन०॥२॥
गुरु श्रीमत्पूर्णप्रज्ञतीर्थ हे आधीं ।
वंदुनी पवाडा रचितां गेलि उपाधी ।
मग पद्मनाभतीर्थांच्या लागुनि नादीं ।
धनवसन मिळविलें वंदिति त्यांचि समाधी ।
( चाल ) हा दास विनायक लोळे, पदयुगीं ।
दुष्प्रपंच-वृत्ती भोगे, दगदगीं ।
मन ब्रह्मस्वाच्या त्रासें, धगधगी ।
(पूर्व चाल) निःसंशय व्हाया वंदितसे त्वत्पाया ॥ ओंवाळिन०॥३॥

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीश



श्रीमद् द्वारकानाथ तीर्थ श्रीपाद वडेर स्वामिजी
(1942 - 1973)

## द्वितीय विभाग

# आठवणी व परिशिष्ट

## श्रीगुरुवर्य इन्दिराकान्ततीर्थ

ज्यांचें गाजतसे जगांत यश तें यत्कीर्ति गाती जन ।
नाहीं या अवनीं कुणीहि दुसरा विद्वन्मणी त्यांविण ॥
दैवें ज्यास कृपावलोकन घडे त्यातें न कांहीं कमी ।
भक्तीनें निज सद्गुरू नमितसें ते इन्दिराकांत मी ॥ १ ॥

षट्शास्त्रें सगळीं मुखोद्गत जयां वेदान्तपारंगत ।
शास्त्री पंडित थोर लोक नमिती जे मान्य सर्वांप्रत ॥
वारंवार गुण स्तवी जन पहा ज्यांच्या पदांतें नमी ।
प्रेमानें निज सद्गुरू नमितसें ते इन्दिराकांत मी ॥ २ ॥

लोकीं जे व्रत पाळुनी टिकविती संन्यासदीक्षा भली ।
ज्यांचें ज्ञान विशाल तें तप बहू शांती महा लाभली ॥
अंगीं पूर्ण विरक्ति नित्य वसते सानंद काल-क्रमी ।
स्वानंदें निज सद्गुरू नमितसें ते इन्दिराकांत मी ॥ ३ ॥

ध्यानीं मग्न सदा सतेज दिसती जे वंद्य सर्वांप्रती ।
गातों सद्यश बिंबली गुणवती मूर्ती हृदीं संप्रती ॥
नाहीं शक्त कुणीहि वर्णन करूं ज्यांच्या गुणा आक्रमी ।
आनंदें निज सद्गुरू नमितसें ते इन्दिराकान्त मी ॥ ४ ॥

— माधव रामकृष्ण महाले

# आठवणी

चरित्रलेखनाला विशिष्ट ठशाची ठेवण असावी लागते व त्यामुळे चरित्रांतील महत्त्वाचे तेवढे सर्व भाग ठळकपणे वाचकांपुढे येतात; पण कित्येक प्रसंग असेही असतात की त्यांची माहिती लेखकाला मिळूं शकत नाही. दुसरे असे की, चरित्र-लेखक आपल्या स्वतःच्या विशिष्ट चष्म्यांतून चरित्रनायकाकडे पहात असल्याने, त्याच्या स्वतःच्या मताची छाप कळत नकळत चरित्रलेखनावर पडू शकते.

## आठवणींची महती

आठवणींचे लेखक अनेक असल्याने 'भिन्नरुचिर्हि लोकः' या न्यायाने प्रत्येकाची आवडनिवड वेगळी असणारच. अर्थात् चरित्रनायकाची कोणतीही कृती इतक्यांच्या दृष्टींतून बिसटूं शकत नसल्याने, प्रत्येक लहानसहान कृत्यावर अनेकांनी आपापल्या दृष्टिकोनातून प्रकाश पाडल्याने चरित्रनायकाचें अंतरंग वाचकांपुढे अगदी निःसंकोचपणे, आडपडदा न ठेवतां मांडलें जातें; आणि त्यामुळे अनेकांच्या परीक्षणाच्या कसोटीला उतरलेले गुण निर्विवादपणे वाचक ग्राह्य धरूं शकतात. इतकेंच नव्हे तर वाचकांच्या मनावर ते सहजीच आपला ठसा त्याला नकळत पाडतात.

म्हणून कोणाच्याही एकटाकी चरित्रापेक्षा अनेकांच्या आठवणींच्या सुमनांनी गुंफण्यात आलेला स्मृतिसुमनहार चरित्रनायकाचे गुणवैभव अधिक खुलविण्यास समर्थ असतो.

## विशिष्ट उपयोग

दुसऱ्याही एका दृष्टीने आठवणींचा विशिष्ट उपयोग होतो. चरित्रवाचक थोडे व ठराविक मताचे असल्याने त्यांची संख्या मर्यादित असते.

आठवणी आबालवृद्धांना सारख्याच वेधक वाटणाऱ्या असल्याने वाचकसंख्या तर वाढतेच, पण त्यांतल्या त्यांत तरुण वाचकांना त्यांत अधिक गोडी वाटू लागून त्यांच्या मनावर इष्ट परिणाम घडून येतो. चरित्रांतील गुणवर्णन हे न सोडविलेल्या कोड्यासारखे, तर आठवणींतील गुणवर्णन हें सोडविलेल्या कोड्याप्रमाणे असतें.

जोंपर्यंत या लोकांत गत व्यक्तीची स्मृती जागृत असते तोंपर्यंत तिच्यावर मृत्यूची मात चालत नाही अशी भावना असते. "न खलु स उपरतो यस्य वल्लभो जनः स्मरति" असें भवभूती म्हणतो. त्यावरून आठवणी म्हणजे चरित्रनायकाला अक्षय्य कीर्तिलाभक असतात हें उघड आहे. विहंगम दृष्टीने पाहाता चरित्रग्रंथाशीं आठवणींचा मिलाफ म्हणजे दुधात साखरच होय यांत शंका नाही.

---

# आचार्यांच्या चरित्रापासून पुष्कळच शिकण्यासारखें आहे

मी स्वतः पर्तगाळी पीठाचा अनुयायी मुद्रांकित वैष्णवजन नाहीं, किंवा निर्भेळ स्मार्त असा केळोशीकुशस्थळीकरही नाहीं; धर्माध्यक्षांचे पोवाडे ते केवळ पीठाधिष्ठित म्हणून गाण्यांत यावे, अशा आग्रही मताचा नाहीं किंवा माध्वमताच्या तत्त्वज्ञानाचें मर्म समजण्याइतकी माझी योग्यताही नाही. असें असतां आज भाषण करण्याची जबाबदारी मी पत्करली याचीं दोन कारणें आहेत. श्रींच्या समाधीनंतर पुष्कळ ठिकाणी सभा झाल्या, भाषणें झालीं व उत्कृष्ट प्रकारें निष्टा प्रगट करण्यांत आली; पण त्यांचें चरित्र नव्या पिढीसमोर ठेवण्याचा प्रयत्न झाला नाहीं. मोठ्या माणसांच्या वियोगाबद्दल शोक करण्याबरोबर त्यांच्या चरित्राचें सार समजून घेणें अगत्याचें असतें. आचार्यदेव सर्वांना पूज्य मानावा लागतो; पण त्यांचें विभूतिमत्त्व कोणत्या गुणावर आधारलेलें आहे, तें स्थान भूषविण्यांत त्यांनीं कोणत्या गोष्टी केल्या, याचा इतिहास समजून घेणें उपकारक असतें. आचार्यांचें चरित्र अशा अनेक रहस्यमय व गुंतागुंतीच्या प्रश्नांनी भरलेलें आहे, कीं त्यापासून गृहस्थाश्रमी-यांनीच नव्हे, तर पीठाधिष्ठित धर्मगुरूंनीही पुष्कळच शिकण्यासारखें आहे. व्यक्तिशः माझा व आचार्यांचा परिचय होता म्हणून हें चरित्र सांगण्याचें ऋण माझ्यावर आहे यांत शंका नाही. आचार्यांचा प्रेमळ स्वभाव, नैष्ठिक आचार, गाढ विद्वत्ता व शंकासमाधान करण्याचें सौजन्य इ. गुणांमुळें माझें मन त्यांजकडे ओढलें. विशेषतः सामाजिक प्रश्नांच्या बाबतींत पक्षप्रतिपक्ष झाले व त्यामुळें सर्वत्र खळबळीचें वातावरण झालें असतां कांहीं मित्रांबरोबर मी मठांत गेलों आहे, आणि चर्चा, वाद, विनोद, रुसवा, आग्रह अशी दांडगाई केली आहे. पण या सर्व प्रकारांतून त्यांच्या लोभांत अंतर पडलें

नाहीं. उलट आमच्या क्रांतिकारक मताचें हंसतमुखानें स्वागत करून, आमचें समाधान करून व शेवटीं अंतःकरणपूर्वक आशीर्वाद देऊन फिरून येण्याचें आमंत्रण दिलें. शब्दांत ओलावा, दृष्टींत कृपा व वागणुकींत गुरूला उचित असा सुहृद्भाव यापासून कोणत्याही प्रसंगीं त्यांची वृत्ति ढळली नाहीं. त्यांच्या धर्ममतांत द्वैताचीं बीजें होतीं, त्यांच्या आचारपद्धतींत विशिष्ट मताचा आग्रह होता, त्यांच्या विचारसरणींत समाजाला पुढें राहून खेंचून नेण्यापेक्षां मागची बाजू सांभाळीत दाब देत जाण्याचें अंग विशेष होतें, पण त्याबरोबर प्रेमळ मातेप्रमाणें पोटाशीं धरण्याचें वात्सल्य होतें, अधिकारी गुरूप्रमाणें शिक्षादीक्षादि व्यवहाराबरोबर त्यांच्या पाठीवरून हात फिरवून धीर देण्याचें सौजन्य होतें. त्यांचीं मतें, तत्त्वज्ञान अगर कार्याची दिशा यांविषयीं मतभेद असेल, किंवा ज्या पीठाचा अनुग्रह त्यांनी घेतला त्या स्थानाला अनुसरून त्यांचें वर्तन झालें असेल, पण तटस्थाच्या भूमिकेवरून श्रींच्या कार्याचें मोजमाप केलें तर अशा प्रकारच्या विभूती आणि त्यांतही आजच्या काळांत फार दुर्मिळ असतात असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं.

कर्नाटक प्रांतांतील एका भाविक व सत्त्वशील कुटुंबांत श्रींचा जन्म झाला. त्यांचे वडील मठांतील पुराणिक होते. त्यामुळें श्रींचें बालपण मठांतच गुरूसन्निध व इतर शिष्यसमूहाच्या सहवासांत गेलें. मठांतील शिस्त माध्वमताप्रमाणें कडक आचारप्रधान व नियमबद्ध असल्यामुळें त्याचें वळण श्रींना बालपणापासून लागणें साहजिक आहे. संस्कृत भाषा, श्रुतिस्मृति, भाष्यें-पुराणें यांचा अभ्यास व परिशीलन त्यांनीं केलें, मध्वाचार्यांचें तत्त्वज्ञान समजावून घेतलें आणि नैष्ठिक ब्रह्मचर्य, सत्प्रवृत्त स्वभाव, मधुर वाणी, हंसतमुख चेहरा, विनयशील वर्तन आणि विद्वत्तेने प्राप्त झालेला अधिकार यांमुळें मठांतील छात्रवर्गात वर्चस्व मिळविलें, पीठाधिष्ठित आचार्यांची त्यांनी कृपा संपादन केली, व मठाच्या वजनदार सल्लागारांवर छाप टाकली.

गुरुपदाच्या जागेवर सर्वानुमतें त्यांची निवड झाली आणि श्रीमद्-इन्दिराकांततीर्थ या नांवानें त्यांना आश्रमधर्माची दीक्षा देण्यांत आली. गुरूंच्या

निर्वाणानंतर पीठाधिकार हातीं आल्यावर श्रीस्वामींनी दिग्विजयार्थ सर्वत्र संचार करून मठानुयायी शिष्यवर्गाला दर्शन दिलें, समाजाची पाहणी करून त्याला नवें वळण घातलें, आचारांतील शिथिलता काढून टाकून कडक बंधनें घातलीं, माध्वमताप्रमाणें व्रतेंवैकल्यें, आचारविचार, इतकेंच नव्हे, तर वेष-मुद्रा-जपजाप्य या बाबतींत स्पष्ट दंडक ठरवून दिले. नव्या जन्मास येणाऱ्या मुलांना विष्णूचीं व मुलींना लक्ष्मीचीं नांवें ठेवण्याचा प्रघात पाडला आणि एकंदर वैष्णव समाजाला एकरूपता व स्वतंत्र सामाजिक दर्जा प्राप्त व्हावा यासाठीं आपल्या संप्रदायाला बळकटी आणली. उपदेश करून, अधिकार चालवून अगर परिस्थितीची जाणीव करून देऊन त्यांनीं सर्वत्र आपल्या मताप्रमाणें समाजाचें स्वरूप बदलण्याचा प्रयत्न केला.

आपल्या व्यक्तिप्रभावाची छाप पाडून श्रीस्वामींनी कित्येक भावना-प्रधान स्मार्त कुटुंबांना मुद्राधारण करून माध्वमताचे अनुयायी बनविले. जीं देवस्थानें आपल्या शिष्यवर्गाच्या ताब्यांत होतीं, त्यांना वैष्णवी दीक्षा दिली व उपास्य, उपासना व उपासक यांचें एकरूप होण्याकरिता रामनाथ, दामोदर, नागेश इत्यादि शंकराच्या मंदिरांतून लक्ष्मीनारायणाची स्थापना केली. या देवस्थानांत वैष्णव पुजारी नेमले, पूजाअर्चा वैष्णव संप्रदाया-प्रमाणें करण्याची प्रथा घातली. वेषभूषेपासून आरति-मंत्रजागरापर्यंत सर्व प्रकार ' विष्णुमय जगत् ' या धोरणाला अनुसरून दृढ केला.

देशांत संचार करतांना त्यांना असें दिसून आलें कीं, द्रविड ब्राह्मण सारस्वत ब्राह्मणांना कित्येक ठिकाणीं गर्भागारांत प्रवेश करूं देत नाहींत; याचा अपमान वाटून त्यांनीं आपल्या सत्तेखालील सर्व देवस्थानांत आपल्या वजनाचा उपयोग करून स्वकीय ब्राह्मणांची नेमणूक करविली. ठिक-ठिकाणीं पुरोहित कर्माकरितां वैष्णव वैदिकांना पाठवून आपल्या शिष्यांची सोय केली. मोफत अन्नवस्त्र देऊन व स्वतः जातीनें पाठ घालून शिक-विण्याचें काम करून शेकडों विद्यार्थी तयार केले. आणि वैष्णव धर्माचा प्रसार व्हावा म्हणून संधी मिळेल तेथें त्यांची रवानगी केली. वैष्णव धर्माचे

पीठाधीश या दृष्टीनें श्रीमदिंदिराकांत तीर्थ यांची ही धडाडी लक्षांत घेण्यासारखी आहे.

वैष्णव समाजाला व्यापक व संघटित स्वरूप यावें म्हणून त्यांनीं शिष्यवर्गापैकीं बारदेशकर पोटभेदाचें सासष्टीकरांशीं ऐक्य करण्याचा प्रयत्न केला. या उभयतांचें सपंक्त भोजनव्यवहार मठांत होत होते तेच बाहेरही रूढ व्हावे, यांत अनमान होऊं नये असा संकल्प त्यांनी जाहीर केला. सासष्टीकर व बारदेशकर यांच्या पुढाऱ्यांकडे विचारविनिमय करून आज्ञारायस दिला कीं, या उभय समाजांत ऐक्य होण्यास हरकत नाहीं; पोटभेदांच्या एकीकरणाच्या दृष्टीनें हें एक पाऊल पुढें घातल्यामुळें स्वामीजींबद्दल नव्या विचारांच्या समाजांत आदर वाढला.

यानंतर स्वामीजींनीं आणखी एक धडाडी दाखविली. शिर्सी येथील बॅरिस्टर पुंडलिकराव पंडित यांना सर्व तीर्थक्षेत्रांचा प्रवास करून आणल्यावर प्रायश्चित्त दिलें. मुद्राधारण व मठांत इतर शिष्यांसमवेत सपंक्त अन्नव्यवहार करविला व निर्दोषत्वाचा रायस दिला. या गोष्टीमुळें परदेशगमनाबद्दल धर्मगुरूचीं प्रगमनशील मतें प्रगट झालीं.

इतक्यांत श्रीनरहरितीर्थ नामक त्यांचे प्रिय शिष्य वृंदावनस्थ झाल्यामुळें श्रीमदिंदिराकांत तीर्थ यांची मनःस्थिति उदासीन झाली. मठानुयायांच्या विनंतीवरून त्यानंतर त्यांनी नवे शिष्य केले; पण औदासिन्यामुळें त्यांनीं व्यवहाराधिकाराचा त्याग केला. नवे शिष्य श्रीमत्कमलानाथतीर्थ यांजकडे सर्व कारभार सोंपवून दिला व आपला काळ ते पारलौकिक विषयांत व्यतीत करूं लागले. द्वैतमतानुरूप 'गीताभाष्य' हा ग्रंथ त्यांनीं प्रसिद्ध केला.

इतक्यांत सारस्वत ब्राह्मण समाजाला हादरून सोडणारी एक चळवळ सन १९१० साली सुरू झाली. ती एकी बेकी या नांवानें प्रसिद्ध झाली. या चळवळीनें सारस्वत समाजांत एक मोठें कार्य केलें व ग्रामण्याचें कंबरडेंच मोडून टाकलें. समाजकंटकांना वचक बसविला व धर्मगुरूंनाही जगांत काय चाललें आहे याची ओळख पटली. श्रीमदिंदिराकांत तीर्थ स्वामी

यांनीं परिस्थितीचा अनुभव घेतल्यावर आतां संधि करावा या हेतूनें त्यांनीं शिष्यस्वामीसह संचार केला आणि कठीण तेथें बगल देऊन व वळतें तेथें समजूत घालून पुनः समाजांत दिलजमाई उत्पन्न केली. औपचारिक विधीनें तीर्थप्रसाद देऊन मुद्राधारण करविलें व कुशलतेने आपला शक बसविला. हें प्रकरण निकालांत काढून तप्तमुद्रा दिलेले हात थंड होतात न होतात तोंच संस्थानच्या किल्ल्याचा एक बुरूज शहापूर हा कोसळला. मडगांव व शहापूर हे दोन गांव श्रीमंत, व्यापारी, आचारविचारानें माध्वमताला अनुसरून वागणारे होते. वैष्णवधर्माच्या कोटाचे हे दोन बुरूज म्हटल्यास शोभण्यासारखें होईल. या दोनही बुरुजांचे एकीबेकीच्या माऱ्याने बरेच दगड कोसळले होते; पुनः त्याची दुरुस्ती करण्यात आली. पण या वेळीं शहापुरांत जें प्रकरण उपस्थित झालें तें अधिक भयंकर होतें.

बेळगांवच्या मिशन हायस्कूलच्या वार्षिक समारंभांतील चहापार्टीला शहापूरच्या एका प्रसिद्ध समाजसुधारणेच्या अध्वर्यूनें भाग घेतला होता. त्यामुळें शहापुरांत ग्रामण्य माजून तट पडले.

या व इतर अनेक नव्या प्रकरणांमुळें श्रींनी बोध घेतला कीं, वैष्णव समाज आतां पूर्वीचा राहिला नाहीं. सबब वेळींच आपलीं बंधनें ढिलीं केलीं पाहिजेत. परदेशीं जाऊन आले त्यांचा व तद्वत् अन्य विचार, असे नवे प्रश्न उपस्थित झाले, आणि ह्याबद्दल कांहीं तरी योजना करणें धर्मगुरु या नात्यानें भाग आहे असें श्रीमद्दिंदिराकांत तीर्थ स्वामी यांना वाटलें.

सारस्वत समाजांत ५ - ६ धर्मपीठें आहेत, आणि त्यांचें परस्परांशीं ऐक्य नसल्यामुळें सुधारकांना फावलें होतें. अशा स्थितींत या धर्मगुरूंनीं एकत्र येऊन कांहीं प्रश्नांचा आजच्या कालाप्रमाणें विचार करून निर्णय घ्यावा असें श्रींच्या मनानें घेतलें. कर्नाटकांत गेल्या वेळीं काशी मठाचे धर्मगुरु यांची भेट घेऊन त्यांकडे विचारविनिमय केला व त्यांना गोमंतकांत येण्याबद्दल आमंत्रण दिलें. काशीमठाध्यक्ष गोमंतकांत आले, काशी मठ व गोकर्ण पर्तगाळ मठ या पीठाधिपतींचें संमेलन झालें; पण तिसरें महत्त्वाचें

एक जें कैवल्यपीठ या मठाध्यक्षांकडे विचारविनिमय करतां न आल्यामुळें कांहीं बाबी अनिर्णीत राहिल्या; तथापि आचार्यांचा हेतू बदलला नाही. त्यांनीं स्वतः दौरा काढून सर्व ठिकाणच्या शिष्यांना दर्शन दिलें, उपदेश केला, बहिष्काराचें शस्त्र मागें घेतलें, आणि पुनः ऐक्याचा सांधा जोडून दिला.

आपल्या संचारांत स्वामींचीं प्रवचनें होत, त्यांत देशकाल वर्तमान परिस्थिति पालटल्याचा अनुभव त्यांना आला होता हें दिसून आलें. आणखी आयुष्य लाभलें असतें तर त्यांनीं सर्व धर्मगुरूंचें संमेलन भरवून चालू कालाच्या लोकाचाराला साधक असा निर्णय घेतला असता; पण तसें होण्याचा ईश्वरी संकेत नव्हता. गुरुवर्यांच्या निर्याणामुळें एक जाडा विद्वान, सच्छील, निग्रही, आणि मध्वाचार्यांची परंपरा शोभविणारा संन्यासी नाहींसा झाला याविषयीं सर्वांनाच हळहळ वाटते. शेवटीं श्रीमदिंदिराकांततीर्थ यांच्या वृंदावनाला विनयपूर्वक प्रणाम करून व हीं चार वाक्पुष्पें आदराने उधळून मी रजा घेतों.

**—यशवंत सूर्यराव सरदेसाई**

(मुंबई येथील सारस्वत ब्रा. समाजातर्फे झालेल्या भाषणाचा सारांश)

महाराष्ट्र सारस्वत, जुलै १९४२

---

## वाक्सिद्धी

वृंदा. श्रीमदिंदिराकांततीर्थ स्वामीजींच्या महानिर्याणाच्या आधी कांहीं महिने श्रीस्वामीजींचा मुक्काम श्रीनरसिंह देवस्थान, वेलिंग इथं होता. चातुर्मास्य व्रतसमाप्तीनंतर अनुयायांच्या निमंत्रणावरून जवळच्या कांही गांवांत त्यांनी संचार केला. त्यावेळीं ते कुंडईतही आले होते. आणि पूर्वापार चालत आलेल्या प्रथेप्रमाणें आमच्या घरींही त्यांचें आगमन झालें. त्यावेळीं माझे वडील बरेच आजारी होते. मध्यंतरी असा एक क्षण आला होता कीं, त्याची डॉक्टरनींसुद्धां आशा सोडली होती. श्रीस्वामीजी आमच्याकडे आले

त्यावेळीही ते थोडे आजारीच होते. पादपूजादि समारंभानंतर श्रीस्वामीजी खाजगी बैठकींत आले. त्यावेळी माझ्या मातोश्रीने त्यांच्यापुढें श्रीफळ ठेवून साश्रु नयनांनी त्याना नमस्कार केला आणि मागणी केली की, सौभाग्याने आपल्याला इहलोक सोडतां यावा, असा श्रीनी मला आशीर्वाद द्यावा. स्वामीजीही हें ऐकून गहिंवरले आणि तो नारळ तिच्या ओटींत घालून ते म्हणाले की, "कांही काळजी करूं नकोस. सत्यसंकल्पाचा दाता भगवान तुझा संकल्प सिद्धीस नेईल." आणि आश्चर्याची गोष्ट ही की, त्यानंतर थोड्याच महिन्यांत निरोगी व धडधाकट असता माझ्या आईला तिच्या आंतरिक इच्छेप्रमाणे सौभाग्याने आकस्मिक मरण आले. (वडील त्यानंतर तीन वर्षांनीं वारले.) ज्याना ही गोष्ट माहीत होती ते म्हणाले की, स्वामीजींच्या आशीर्वादाचेंच हें फळ होय. योगाभ्यासाने आणि तपोबलाने साधकाला वाक्सिद्धी प्राप्त होते असें योगशास्त्र सांगतें. त्याचाच हा प्रभाव असावा असें म्हणण्यास हरकत नाही.

– वामन शिवराम कुंडईकर

---

## निग्रही आचार

श्रीगोकर्ण-पर्तगाळी मठाधीश श्रीमद् इंदिराकान्ततीर्थ स्वामी महाराज एकदा आजारी असताना माझे वडील वै. श्रीनिवास शेणवी धेंपे तथा बाबा धेंपे मुद्दाम पर्तगाळी मठांत गेले होते. अल्पवयी असलो तरी सोबतीला मीही होतो. प्रसिद्ध वैद्यांचे औषधोपचार सुरू होते; पण स्वामीजींच्या प्रकृतीस आराम नव्हता. शय्येवरून उठतां बसतानाही त्याना त्रास होई. अशा स्थितींतही स्नान बंद करण्याची सूचना त्यानी मानली नाही.

मठानुयायांच्या विनंतीला दाद न देता स्वामीजींचा दिनक्रम सारखा चालूच असे. ते आपल्या नेमनिष्ठेंत व आचारविचारात अत्यंत निग्रही

असल्याने आचाराला बाधक होणारी कोणतीही गोष्ट ऐकून घेण्याची त्यांची तयारी नसे. शेवटी वैद्यांचा सल्ला व मठानुयायांची विनंती नि कळवळा पाहून स्वामीजी शांतपणे म्हणाले –

"हें पहा, तुम्ही गृहस्थाश्रमी लोक. तुम्हाला एखाद्या न्यायालयाचे निमंत्रण आलें तर कारणपरत्वे निरुपायाच्या वेळी एखादे निमित्त पुढे करून तुम्ही तें नाकारू शकता. पण आम्ही संन्याशी. आमच्या वृत्तीला तें मुळीच योग्य नाही. आमच्या संन्यासधर्माप्रमाणे आम्हाला पृथ्वीवरीलच नव्हे, तर स्वर्गातीलही जरी आमंत्रण आलें तरी त्याला आम्ही सज्ज राहिलेच पाहिजे. आम्हाला आसक्ती कसलीच नाही आणि म्हणून नित्यनियमांत व जपतपांत आम्ही कधीच बाध आणू शकत नाही. आपण कोणीही त्याबद्दल मनात खंत धरू नये."

असे सांगून स्वामीजीनी औषध घेण्याचे तर बंद केलेच; पण स्नान, जप, देवपूजादि कृत्येंही चालू ठेवलीं. असा स्वामीजींचा आचार निग्रही होता.

असा हा श्रीगोकर्ण-पर्तगाळी पीठाचा दैदीप्यमान तारा जसा चकाकत उदयाला आला तसाच स्वयंतेजाने दीर्घकाल प्रकाशून चकाकतच अदृश्य झाला. आणि आपली विलोभनीय प्रभा मठानुयायांसाठीच नव्हे तर अखिल जनतेच्या कल्याणासाठी मागें कायम ठेवली.

श्रीस्वामीमहाराजांच्या पुण्यस्मृतीस सादर प्रणाम.

– वसन्त श्रीनिवास धेंपे

---

## कौतुकास्पद समेट

श्रीमद् इंदिराकान्ततीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजींनी आपल्या अखेरच्या संचारांत अनुयायी शिष्यवर्गातील दुफळी नष्ट करून समेट घडवून आणण्याचा जो यशस्वी प्रयत्न केला तो निःसंशय कौतुकास्पद आहे.

सन १९१० - ११ पासून एकीबेकी प्रकरणासंबंधीची जी चळवळ चालली तिच्यामुळे आपल्या समाजात वैचारिक गट पडून कणखर तट पडले. पुढे त्याचा परिणाम समाजाच्या नित्यनैमित्तिक व्यवहारावर घडून फार नाजूक परिस्थिती निर्माण झाली. आपला शहापूर भागही या चळवळीत मागे नव्हता; उलट आघाडीवरच होता. त्यांत बेळगांवच्या मिशन हायस्कूलच्या स्नेहसंमेलनात सह चहापार्टीला उपस्थित राहिल्याने शहापूरच्या कांही सुधारक प्रतिष्ठितांवर इतरांनी बहिष्कार पुकारला होता. हे सुधारक व एकीपक्षीय यांच्याकडील धार्मिक व्यवहाराचे संबंध बेकीपक्षीयांनी तोडले होते आणि त्यांच्याकडे हव्यकव्यासाठी जाणे पुरोहितांनी स्थगित केले होतें. असे हे प्रकरण बरींच वर्षें चालले व पुढे जरा मंदावले; पण दुहीच्या बीजाचा गाभा गेला नव्हता.

आपल्या अखेरच्या संचारांत सन १९४२ साली श्रीमद् इंदिराकान्ततीर्थ स्वामी मठानुयायांच्या समेटाच्या विशिष्ट हेतूने वेलींगहून परभारे शहापूरला आले होते. शहापूरच्या श्रीमारुतीमंदिराच्या अग्रशाळेंत त्यांचा निवास होता. संध्याकाळ होती आणि स्वामीजींची प्रवचनें सुरू होण्याचा समय असल्याने मंडळीही बरीच जमली होती. इतक्यांत एकीबेकी प्रकरणामुळे दुखावले गेलेले एक प्रतिष्ठित गृहस्थ तेथे उपस्थित झाले. या सुधारक सद्गृहस्थांना पाहून मंडळीला कुतूहल वाटले व आनंदही झाला. तथापि त्यांनी आरंभीच प्रश्न मांडला कीं, "बदलत चाललेल्या कालानुरूप आमच्या समाजांतही मूळच्या मतांत बदल होणें आता अपरिहार्य आहे!"

त्यांच्या बोलण्यांत निःस्पृहताच अधिक होती त्यामुळे जमावाला तें आवडले नाही. तथापी स्वामीजींच्या शांत वृत्तींत मुळींच फरक पडला नाही. त्यांनी त्यावेळी त्या व्यक्तीला सद्यःस्थितीस अनुसरूनच सुविचाराचे जे चार शब्द सांगितले त्या अमोलिक शब्दांनी ती व्यक्ती व जमाव शांत झाला. स्वामीजींचे ते शब्द फार मौलिक होते.

यानंतर उभय बाजूंच्या लोकांचा स्वामीजींसमक्ष विचारविनिमय

होऊन समेट झाला. अशा रीतीने शहापूरच्या एकीबेकी प्रकरणाचा शेवट होऊन मठानुयायांत पूर्ववत् ऐक्य प्रस्थापित झालें. एकीमुळे अलग राहिलेल्या व्यक्तींनीही स्वामीजींना आग्रहाच्या निमंत्रणाने आपल्या निवासस्थानी नेऊन त्यांची पाद्यपूजा वगैरे भावनेने केली.

याच वेळी स्वामीजींनी पांचशे रुपयांची रक्कम मारुतीमंदिराच्या ट्रस्टीच्या हवाली करून त्याच्या व्याजांतून दरसाल एकदा संतर्पण व्हावे अशी इच्छा प्रगट केली.

हीच स्वामीजींची शहापूरची अखेरची भेट.

—नारायणराव जोशी

---

## महान् विभूती

गोमंतकांत जन्म होणे, श्रीगोकर्ण-पर्तगाळी पीठाचा अनुयायी असणे आणि त्या पीठाचे सद्गुरु श्रीमद् इंदिराकान्ततीर्थ श्रीपाद स्वामी महाराज यांचें दीर्घकाळ दर्शनसुख लाभणे हें पूर्वपुण्याईवांचून शक्य नाही. श्रीकृपेनें या सुखत्रयीचा लाभ मला झाला हें मी माझें महद्भाग्य समजतों. अनेकदां श्रींचे दर्शनसुख मला लाभलें, आणि प्रत्येक वेळीं जगच्चालक परमेश्वराचेंच दर्शन मला त्यांच्यांतून घडत आहे असाच साक्षात्कार झाला. त्यांचें प्रभावी व्यक्तिमत्त्व व प्रसन्न चेहरा पाहिला म्हणजे एखाद्या अनोळख्यालाही आदर वाटल्यास नवल नव्हे.

स. १९३९ मध्यें श्रीगुरुमहाराज व काशीमठाधीश श्रीमत् सुकृतेंद्र तीर्थ स्वामीजी यांचा संचार सुरू असताना मडगांवला त्यांचे येणें झालें. त्यावेळीं श्रीमद् इंदिराकांततीर्थ स्वामी यांचा निवास श्रीदामोदर विद्याभुवनांत आणि श्रीकाशीमठाधीशांचें वास्तव्य आमच्या घरांत होतें. या उभय पीठाधीशांच्या सान्निध्यांत गेलेले ते गोड दिवस मला अजूनही आठवतात.

गुरुवर्य श्रीइन्दिराकान्ततीर्थ स्वामीमहाराजांच्या पुराणप्रवचनाच्या श्रवणाचाहि लाभ मला त्यावेळी झाला. एके दिवशी प्रवचनांत त्यांनीं ' प्रपंचांतून परमार्थ ' हा विषय घेतला होता.

आरंभी त्यांनी ब्रम्हचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम अशा चारही आश्रमांची यथार्थ माहिती दिली आणि नंतर गृहस्थाश्रमाकडे पुन्हा वळून ,ते म्हणाले, " प्रापंचिकांना गृहस्थाश्रम हा श्रेष्ठ आश्रम असून या आश्रमांचाच अन्य आश्रमीयांना ठीक आधार लाभत असतो. शिवाय प्रपंच अतएव प्रपंचातील विविध व्यवहार करतानाही परमार्थाकडे सहज दृष्टी वळवितां येते आणि तो सुलभपणे साधतां येतो. " या विषयाबद्दल त्यांनी अनेक वेधक उदाहरणे दिल्याने विषय फारच रंगला होता.

योगिक सामर्थ्याने श्रीस्वामींचा आशीर्वादही सत्य होत असे याचा प्रत्यक्ष अनुभव मला मिळालेला आहे. अशा या अनेक कारणांवरून श्रीमद् इन्दिराकान्ततीर्थ स्वामीजी म्हणजे एक महान् विभूती असा मला साक्षात्कार झालेला आहे. त्यांच्या पुण्यस्मृतीस माझे अनंत प्रणाम.

– दत्ता गोविंद पै रायतुरकर

---

# श्रीसंस्थानीं गव्हर्नरची भेट

पोर्तुगीज अमदानींत रिपब्लिकन राजवटीचे गोव्याचे पहिले गव्हर्नर ना. कौसैरु द कॉस्त यांनी श्रीमद् इंदिराकान्ततीर्थ स्वामीजींची बरीच कीर्ती ऐकली व त्यामुळे स्वामीजींच्या मुलाखतीची त्याना फार उत्सुकता उत्पन्न झाली.

आपणास स्वामीजींकडून निमंत्रण यावे आणि नंतर मुलाखतीस जावे असा त्यांचा इरादा असल्याने प्रतिष्ठित मठानुयायांकडून तसा त्यांनी

प्रयत्नही केला. तथापी राजप्रतिनिधी पाहुण्याचे स्वागत करतांना शिष्टाचाराप्रमाणे उभे राहाणे आश्रमधर्माच्या तंत्रांत बसत नसल्याने स्वामीजींनी निमंत्रणाकडे दुर्लक्षच केले.

विशेष उत्कंठेमुळें अखेर गव्हर्नरनी स्वतः आपण होऊनच स्वामीजींच्या दर्शनासाठी पर्तगाळ मठांत जाण्याचे ठरविले व स्वामीजींच्या अनुमतीने दिवसही मुक्रर केला.

भेटीची वेळ सकाळी अकराची निश्चित झाली. गव्हर्नरच्या स्वागताची सर्व तयारी झाली. श्रीरामदेव मूर्ती विविध संपूर्ण अलंकारांनी व भारी वस्त्रांनी सुशोभित करण्यात आली. ठळक मठानुयायी व इतर लोक स्वागतासाठी श्रीमुख्यप्राण मंदिराजवळ सज्ज झाले. गव्हर्नरांचे आगमन झाले. त्यांच्या सन्मानार्थ व मठांत इशारा मिळण्यास पूर्वसूचनेप्रमाणे २१ गरनाळांची सलामी झाली.

मंदिराच्या आवारांत गव्हर्नरचा प्रवेश होत असतांनाच श्रीरामदेवाच्या आरती सुरू झाल्या होत्या. श्रीस्वामीजी अर्थात् मंदिरांत होते. सर्व मंदिर प्रकाशमय झालें होते. वाद्य सुरू होतें. घंटा निनादूं लागल्या. भक्तजनांचा जयजयकार सुरू झाला. गव्हर्नरने तें वेधक दृश्य एकाग्रतेने पाहिले. तो तन्मय झाला. यानंतर श्रीस्वामीजी मंदिरांतून चौकावर येऊं लागले. त्यांची ती तेजःपुंज मूर्ती पाहून गव्हर्नर चकित झाला आणि श्रीपादांसमोर गुडघे टेकून हाताचे चुंबन घेण्याच्या तयारीनें पुढें सरसावला. तथापी मठसंप्रदायाप्रमाणे तसे करता येत नसल्याचे प्रतिष्ठित अनुयायांकडून कळून आल्याने निरुपाय होऊन तो मग इतरांप्रमाणे हात जोडून उभा राहिला.

श्रीपादांनी त्यांना आसनस्थ होण्याचे सुचवून स्वतःही ते मग आसनावर बसले; आणि दुभाषामार्फत बोलणी सुरू झाली.

गव्हर्नर म्हणाला, “ स्वामीजी, या अलंकारसंपन्न देवतांसह आपण या अरण्यांत वास्तव्य करीत आहांत. मठाच्या व आपल्या संरक्षणासाठी आपली अनुमती असल्यास मठाच्या कक्षेंत एक पोलीस चौकी ठेवूं इच्छीत आहें. ”

" हें सारें ऐश्वर्य आमचे स्वतःचें नसून मंदिरांत विराजमान झालेल्या रामदेवाचें आहे. त्याला तें नको असेल त्यावेळी पोलीसच काय, सर्व दलें एकत्र आलीं तरी त्याचे रक्षण करणे कठीण. आणि त्याला तें हवें तोंपर्यंत जगांतील असामान्य शक्तिमानालाही तें नेणे अशक्य आहे !"

पुन्हा ते म्हणाले, " व्यक्तिशः आमच्यापुरतेच बोलायचे झाल्यास चोरांना आमच्या देहाशिवाय दुसरे काय मिळणे आहे ? देहाची तर आम्हाला मायाच नाही. शिवाय ज्या देवावर अखिल जगताचें रक्षण करण्याची जबाबदारी आहे, त्या जगत्चालकाचें पोलिसांमार्फत रक्षण करण्याची योजना हास्यास्पद नाही का ठरणार ?"

गव्हर्नर स्तिमित झाला या उत्तराने.

त्यानंतर संस्थानची भेट म्हणून गव्हर्नरला चंदनाची सुंदर पेटी व चांदीची लेखणी बहाल करण्यात आली. गव्हर्नरने ती मोठ्या प्रेमाने साभार स्वीकारली आणि तो स्वामींना म्हणाला – " माझ्याकडून शक्य त्या कामाविषयीं स्वामीजींची अवश्य आज्ञा व्हावी."

" आमची इच्छा एकच. मठसंस्थानतर्फे भेटीदाखल दिलेल्या लेखणीचा सदुपयोग व्हावा." स्वामीजी म्हणाले.

" स्वामीजींच्या आज्ञेप्रमाणेंच वागेन" असें सांगून गव्हर्नरने निरोप घेतला.

**– जीवोत्तम रा. पै खोत**

---

# स्मृतिकोशांतील दोन सुवर्णमुद्रा

स्वामीजींना मी पहिल्याप्रथम पाहिले ते १९२४ साली माझ्या जन्मगावी – माशेल येथें. त्या वर्षी माझी मुंज होती. मोठा मुलगा असल्यामुळे मुंज मोठ्या थाटांत होणार होती. पन्नास वर्षांपूर्वीचा काळ हा स्वास्थ्याचा, स्वस्ताईचा काळ होता. मंगलकार्ये चारचार दिवस चालत.

माझा उपनयनविधिही असा चार दिवस चालला. चौथ्या दिवशी सोडमुंज झाली.

या सुमारास श्रीस्वामीजींचा संचार गोमंतकांत चालू होता. माशेल हे गोकर्ण पर्तगाळ मठानुयायांचे एक केंद्र असल्यामुळे स्वामीजींचे आगमन या गांवी होणार होते. माझ्या वडिलांनी मुद्दाम पर्तगाळीस जाऊन माझ्या मुंजीस गुरुस्वामी श्रीमदिंदिराकांततीर्थ व शिष्यस्वामी श्रीमत्कमलानाथतीर्थ यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून बटूस शुभाशीर्वाद द्यावा अशी विनंती केली, आणि स्वामीजींनी ती मान्यही केली.

एप्रिल महिन्यांत श्रीस्वामीजींचा मुक्काम माशेल येथे झाला. तिथल्या श्रीशांतादुर्गा तळावलीकरीण या देवस्थानांत स्वामीजी परिवारासह उतरले होते.

इथूनच ज्या श्रीमाल्लिनाथ देवस्थानात माझी मुंज होती, तिथे उभय स्वामीजींचे आगमन झाले. मंदिरांतील चौकावर उभयतांसाठी उच्चासने मांडलेली होती. त्यांवर स्वामीजी बसले. देवदर्शन झाल्यावर पाद्यपूजा झाली. मला व माझ्या बंधूला – माझ्याबरोबरच माझ्या लहान भावाचीही मुंज झाली होती – स्वामजींसमोर नेण्यात आले. पादस्पर्शपूर्वक नमस्कार-विधि झाल्यावर उभय स्वामीजींनी आशीर्वाद दिले आणि मग श्रीइंदिराकांत स्वामींनी उपदेशपर भाषण केले. हे भाषण म्हणजे उपनयनाचा अर्थ विशद करून सांगणारे एक उत्कृष्ट प्रवचन होते. बोलत असतांना अनेक संस्कृत वाक्ये त्यांच्या तोंडून बाहेर पडत होती. टांचणी पडली तर तिचा आवाज ऐकूं यावा इतकी स्तब्धता होती. त्या गंभीर वातावरणाने मी तर भारूनच गेलो होतो, पण श्रीस्वामीजींच्या मुखातून स्रवणाऱ्या शब्दांकडेही माझे पूर्ण अवधान होते. विद्यार्जनाचे महत्व स्वामीजी विशद करून सांगत होते. यज्ञोपवीताचा सांकेतिक अर्थ ते स्पष्ट करीत होते. उपनयनविधीचा विद्यार्जनाशी असलेला संबंध काय याची माहिती देत होते.

स्वामीजींनी प्रवचन संपवले आणि पुन्हा एकदा बटूंस आशीर्वाद देऊन ते आसनावरून उठले.

दुसऱ्या दिवशी श्रीशांतादुर्गा देवस्थानांत जाऊन आम्ही स्वामीजींच्या हस्ते तप्तमुद्रा धारण केल्या.

त्यानंतर थोड्याच दिवसांनी म्हापसे येथे किमान एक आठवडा तरी उभय स्वामीजींच्या सान्निध्यात राहायचा योग आला. माध्यमिक शिक्षणासाठी मी त्या वेळी माझ्या काकांकडे रहात होतों. काकांचे बिऱ्हाड त्या वेळचे म्हापशाचे एक प्रसिद्ध गृहस्थ गणसू आजरेकर यांच्या वाड्यांत होते. याच वाड्यांत म्हापशाला संचारासाठी आल्यावर श्रीइंदिराकांत स्वामीजींचा मुक्काम असे.

त्याहि वर्षी स्वामीजींचा मुक्काम आजरेकरांच्या वाड्यांत पडला. सकाळपासून रात्रौपर्यंतचा त्यांचा दिनक्रम मी पाहात होतो. पहाटे स्नानादि आन्हिके, नंतर देवपूजा, शिष्यवर्गासाठी मुद्राधारणविधि, नंतर महानैवेद्य, दुपारी किंचित् विश्रांति आणि संध्याकाळी आल्यागेल्याशी संभाषण. संध्याकाळच्या वेळी बारदेसमधील कित्येक प्रतिष्ठित गृहस्थ स्वामीजींना भेटायला येत. अनेक सार्वजनिक स्वरूपाच्या प्रश्नांवर त्यांच्या चर्चा होत. कांहीं वेळा वादविवादही होत. वातावरण तापतही असे. परंतु अत्यंत प्रसन्न मुद्रेने, शांतपणे, प्रेमळ शब्दांत, पण तेवढ्याच खंबीरपणे श्रीस्वामीजी आपले म्हणणे मांडीत. म्हापसे गांवांतच कांही वर्षांपूर्वी एकी परिषद झाली होती हें लक्षांत घेतले तर या वादविवादांचे विषय वाचकांच्या लक्षांत येतील. अर्थातच एका तपानंतर या वादांतली कटुता नष्ट झाली होती, स्वामीजींनी समाजसुधारणेबाबत अधिक प्रगत असे धोरण आंखले होतें. समाजाला सुधारणेच्या मार्गावर नेण्याचा आपल्या विचारांनुसार प्रयत्न चालविला होता. त्यांचे हे प्रयत्न अपुरे आहेत, हाच त्यावेळी तरुण समाजसुधारकांचा मुख्य आक्षेप होता. पण हा आक्षेप घेणारे कै. भाई देसाईसारखे तरुण स्वामीजींच्या व्यक्तित्वाने भारावून गेले होते. भाई एके

ठिकाणी लिहितात, "आचार्यांचा प्रेमळ स्वभाव, नैष्ठिक आचार, गाढ विद्वत्ता व शंकासमाधान करण्याचे सौजन्य इ. गुणांमुळे माझे मन त्यांजकडे ओढले. ... शब्दांत ओलावा, दृष्टींत कृपा व वागणुकींत गुरूला उचित असा सुहृत्‌भाव यापासून कोणत्याही प्रसंगी त्यांची वृत्ती ढळली नाही." भाईंनी स्वामीजींना उद्देशून लिहिलेला शब्दन् शब्द खरा आहे याबद्दल, त्यांच्या म्हापशाच्या मुक्कामांतील माझ्या अनुभवामुळे, मी ग्वाही देऊं शकेन.

श्रीस्वामीजींविषयींचे हे दोन प्रसंग मी आजतागायत विसरलो नाहीं. माशेलमध्ये गुरूपदेश देणाऱ्या आचार्यांचे दर्शन आणि म्हापशाला समाज-सुधारकांशी वादविवाद व चर्चा करणाऱ्या पीठाधीशांचे दर्शन ! माझ्या स्मृतिकोशांत आचार्यांची ही दोन दर्शने म्हणजे सुवर्णनाणी आहेत !

– बा. द. सातोस्कर

---

## अविस्मरणीय घटना

श्रीगोकर्ण पर्तगाळी मठाचे सुविख्यात विसावे पीठाधीश श्रीमद् इंदिराकांत तीर्थ स्वामीमहाराज ही हल्लींच्या कालातील एक लोकोत्तर विभूति होती; त्यांचा आशीर्वाद तसाच शाप खोटा ठरत नसे; त्यानी विशिष्ट योगसिद्धि प्राप्त करून घेतली होती व त्या सिद्धीच्या जोरावर त्यांनी अनेक महत्कृत्ये केलीं होतीं वगैरे श्रीमद् इंदिराकांत तीर्थ स्वामीजींच्या गुणवर्णनपर अनेक गोष्टी मी श्रद्धाशील वडीलधाऱ्या मंडळीकडून ऐकलेल्या आहेत. तथापि श्रीमद् इंदिराकांत तीर्थ स्वामीजीशी माझा अगदी जवळून विशेष असा संबंध येऊ न शकल्याने मला त्यांच्या अंगच्या अलौकिक गुणांची प्रतीति घेता आली नाही. मात्र एवढे खरे की, तत्कालीन समाजात श्रीमद् इंदिराकांत तीर्थ स्वामीजींबद्दल आदरयुक्त दरारा होता. सर्वत्र त्यांच्याबद्दल पूज्यभाव वसत होता. ते अवतारी पुरुष आहेत अशाच भावनेने समाज

त्यांच्याकडे पहात होता. स्वामीजींनीहि पण आपल्या गुणानी समस्त शिष्य-जनांची हृदये जिंकली होती.

साधारणपणे माझ्या वयाच्या पंधराव्या वर्षी म्हणजे सन १९३८ मध्ये श्रीमद् इंदिराकांत तीर्थ स्वामीजींची स्वारी मडगाव मुक्कामी आली होती. त्यावेळी स्वामीजींची विद्वत्तापूर्ण प्रवचने ऐकण्याचा सुयोग मला प्राप्त झाला. स्वामीजींचे अगदी जवळून दर्शन घेण्याचे भाग्यहि मला लाभले. त्यांचे ते तेजःपुंज व्यक्तिमत्व अजूनहि माझ्या मनःचक्षूसमोर उभे राहते. ते निश्चयी, करारी तितकेच वात्सल्ययुक्त नेत्र; विद्वत्तेची प्रभा फाकलेला तो भव्य भालप्रदेश; ते धीरगंभीर पण प्रफुल्लित मुखकमल; ती मितभाषी, मधुर व अर्थपूर्ण वाणी वगैरे विविध आकर्षक पैलूनी सजलेले त्यांचे ते प्रभावी व्यक्तिमत्व, त्यांच्या जवळ येणाऱ्या माणसाच्या हृदयात त्यांच्याबद्दल पूज्यभाव निर्माण करी.

श्रीमद् इंदिराकांत तीर्थ स्वामीजींचा मुक्काम मडगावी असतानाच, एके दिवशी, आमच्या कारे घराण्याशी निगडित असलेली एक घटना अकल्पितपणे उद्भवली. ती घटना अशी :–

श्रीगोकर्ण पर्तगाळी मठाशी निकट संबंध असलेले एक गृहस्थ आमचे एक निकटवर्ती संबंधी श्री. नरसिंहबाब ( गोविंद रामनाथ कारे ) यांच्याशी बोलण्याच्या ओघात सहज म्हणाले की, मठपरंपरेतील १९ वे पीठाधीश श्रीपद्मनाभ तीर्थ स्वामीजींच्या कारकीर्दीत, आमच्या कारे घराण्याच्या नावे मठाच्या खातेवहीवर थोडी रक्कम बाकी म्हणून थकलेली नुकतीच आपणास आढळून आली. सहज ओघाने सदर गृहस्थाच्या तोंडून बाहेर पडलेली ही सर्वस्वी अज्ञात अशी माहिती ऐकताच श्री. नरसिंहबाब यांच्या मनात आपल्या घराण्याचा अभिमान जागृत झाला. आपल्या घराण्याच्या गतकालातील कोणत्याहि व्यवहारामुळे का असेना, पण मठाच्या खातेवहीवर बाकी थकलेली आपणास आता माहिती होऊनहि आपण त्या बाबतीत स्वस्थ बसणे हे योग्य नव्हे, असे वाटल्यावरून श्री. नरसिंहबाब

यानी लगेच संबंधित प्रकार आमच्या मातोश्रीस कथन केला. तो सारा प्रकार ऐकताच आमच्या मातोश्री आश्चर्यचकित होऊन गेल्या. कारण संबंधित अज्ञात प्रकार घराण्यातील वडीलधाऱ्यांच्या तोंडून त्यानी कधीच ऐकलेला नव्हता. सारांश आम्ही सर्वजण त्या थकबाकीबद्दल पूर्णपणे अनभिज्ञ होतो. तथापि आता ज्या अर्थी संबंधित प्रकार आम्हाला ज्ञात झालेला आहे त्या अर्थी घराण्याच्या अभिमानाने आपण ती बाकी सव्याज फेडली पाहिजे, असा एकमताने निर्णय घेण्यात येऊन आम्ही आपापसात एकंदर रक्कम गोळा केली. तदनंतर एक दिवस मुक्रर करून, श्री. नरसिंहबाब व मी मिळून आम्ही दोघानी घराण्याचे प्रतिनिधि या नात्याने श्रीमद् इंदिराकांत तीर्थ स्वामीजींची भेट घेतली आणि घडलेला सारा प्रकार स्वामीजीना कथन करून अत्यंत आदराने संबंधित रक्कम स्वामीजींच्या चरणाशी ठेवली. हा अपूर्व प्रकार पाहून स्वामीजी प्रसन्न झाले. घराण्याच्या अभिमानाने जें सत्कृत्य आम्ही केले त्याबद्दल हार्दिक आशीर्वाद देऊन स्वामीजींनी असे उद्गार काढले की, प्रत्येकाने स्वतःच्या घराण्याचा असाच अभिमान बाळगला पाहिजे. तरच समाजाच्या नैतिक मूल्यांचे संवर्धन होऊ शकेल. एकाद्या घराण्याच्या संपत्तीचा व सत्कार्याचा वारसा ज्याप्रमाणे त्या घराण्यातील वारस, हक्काने स्वतःला प्राप्त करून घेण्यास पुढे सरसावत असतात, त्याचप्रमाणे त्या घराण्याच्या नैतिक वा भौतिक कर्जाचाही वारसा घेण्यास त्यानी स्वयंस्फूर्तीने सिद्ध झाले पाहिजे. यालाच घराण्याचा सच्चा अभिमान म्हणतात. आपण कारे घराण्याच्या प्रतिनिधींनी एक चांगला आदर्श प्रत्यक्ष आचरणाने कृतीत आणून दाखविलेला आहे. वीरविठ्ठल तुमचे कल्याण करील ! स्वामीजींच्या या आशीर्वादाने आम्ही सद्गदित झालो. एवढे सात्विक समाधान, एवढा परमानंद आम्ही पहिल्यांदाच अनुभवीत होतो.

अखेर स्वामीजीनी व्याजाची रक्कम आम्हाला परत करून फक्त मूळ रक्कमच स्वीकारली आणि आम्हाला मोठ्या प्रेमाने आशीर्वाद दिला.

– वसंत वैकुंठ कारे.

# धर्मगुरूंची जरूरी !

शेवटच्या संचारकार्यांतील एक महत्त्वाचें स्वामीजींचें कार्य म्हणजे गौड सारस्वत सर्व धर्मगुरूंच्या एकोप्यानें परद्वीपगमन केलेल्यांची अत्यल्प संस्कारानें शुद्धी. शिवाय देशकालपरिस्थितीप्रमाणें सामाजिक नियमांतही बदलाची प्रतिक्रिया होऊं द्यावयाची, असाही त्यांचा एक उद्देश होता. त्या उद्देशानुसार प्रथम त्यांनीं श्रीकाशीमठाधीशांची भेट घडवून आणून त्यांच्याशीं विचारविनिमय केलाच होता. त्याचप्रमाणें श्रीकैवल्यपूर मठाधीशांचीही भेट घेऊन चर्चा करावी या बाबतींत त्यांचे प्रयत्न उभय समाजांतील अग्रेसर लोकांच्या वतीनें झाले पण ते निष्फळच ठरले.

निदान समाजांतील उभय धर्मपीठांच्या शिष्यवर्गाच्या एकोप्यानें समाजकार्यें व्हावीं या उद्देशानें त्यांनीं आपल्या वेर्लिंग येथील संचारात श्रीनृसिंह देवस्थानांत एक सभा भरविली, त्यांत कैवल्यपूर पीठाच्या शिष्य-वर्गांतील प्रमुखांचाच भरणा अधिक होता. सभेचे अध्यक्ष डॉ. आ. गो. बोरकर हे होते आणि चिटणीस श्री. शांबाराव सरदेसाई यांच्यासारखे समाज-कार्यकर्ते होते. परद्वीपगमन केलेल्यांना बहुजनसमाजांत जरी खाजगी रीत्या मोकळेपणा होता, तरी पीठाधीशांकडे म्हणा अगर कांहीं सनातन्यापुरतें म्हणा समाजांत परद्वीपगमनदोषाची छाया होतीच. ती छाया दूर करण्या-साठींच समाजमान्य योजनेची स्वामींना आवश्यकता भासत होती. ती योजना त्या सभेंतून योग्य विचारविनियम होऊन मंजूर होतांच सभेतर्फे श्रीस्वामीचरणीं सादर झाली. तशीच विनंति श्रीकैवल्यपूर मठाधीशांकडे करण्यास अध्यक्ष व त्यांचे सहकारी कैवल्यपूर मठाधीशांपाशीं जाऊन पुनः वेर्लिंग संस्थानीं श्रीमदिंदिराकांत स्वामीजीपाशीं आले. त्यावेळीं शांबा-रावजींनीं स्वामिजींना विनंति केली कीं, आज समाज पूर्वीसारखा अजाण नाहीं. समाज सुजाण झाला आहे. त्याला आपलें बरेंवाईट सर्व कळूं लागलें आहे. तो आपलें कल्याण साधून घेण्यास समर्थ आहे. तेव्हा स्वामींनीं यापुढें समाजांतील घडामोडींकडे लक्ष पुरवूं नये. समाज आपलें

पाहून घेईल.” त्या प्रसंगीं बरीच रात्र झाली होती. स्वामींना आपल्या नित्या-न्हिक सायंकर्माची तातड होती. तरी त्यांना या शांबारावजींच्या विनंतीला उत्तर देणें क्रमप्राप्त होतें. स्वामीजी म्हणाले, “ अशी विनंति सर्व शिष्य-वर्गाकडून ज्यावेळीं आपणाकडे येईल त्यावेळीं तिचा विचार करतां येईल. पण हा आपणासारख्यांचा प्रश्न ऐकून मला नवलच वाटलें. अजाण आणि सुजाण हें समजण्याचें साधन काय? मुलगा जन्मतांच त्याचें जिवित्व परावलंबीच असतें. तें बहुत कालपर्यंत तसेंच असतें. कायद्यानें ठरीव वयांतच तर जाणतेपणा सिद्ध केलेला असतो. पण मोठे विद्वान म्हणून गणले गेलेले लोकही शेवटपर्यंत अजाण म्हणून समजून गेले आहेत. समाजांत आज शंभर वर्षें वयाचेही अज्ञानी असून अवघ्याच वयांत ज्ञानसंपन्न झालेलेही दिसत आहेत. त्यावरून सुजाण अजाण समजण्यास किंवा अमुक वय झालें कीं सुजाण झाला असें म्हणण्यास कांहीं आधार आहे काय? बरें तुमच्या म्हणण्याप्रमाणें समाज सुजाण, बरें वाईट समजून उमजून वागणारा, समर्थ आहे असें मानल्यास समाजांत दुःस्थिति व तदनुषंगिक दुःखें कशीं उत्पन्न होतात? या अवस्थेकडे लक्ष दिल्यास कोणी तरी मार्गदर्शक-शास्ता पाहि-जेच असून जगाच्या अंतापर्यंतही तसा शास्ता हवाच असणार असें ओघाने सिद्ध होते. दारूबाजाला आपली दुःस्थिति जाणवते. तो त्यांतून निवृत्त होण्याविषयीं प्रयत्नही करीत असतो; पण त्याला तें साधत नाहीं. तसेंच स्वार्थ हा कोणालाच सुटलेला नाहीं. तशा स्वार्थी वृत्तीमुळें मोठमोठ्या सुजाण गणल्या जाणारांकडून स्वार्थापायीं मोठे अनर्थ घडत असतात. याला आळा पडण्यासाठी शास्ता हवाच असतो. सरकारला आपला सुजाण-पणा व समर्थपणा सांगून तुमची सत्ता आम्हांवर नको आहे म्हटल्यास तें ऐकून घेऊन सरकार सत्ता सोडील काय? आणि सत्ता सोडल्याने प्रजेचे हित तरी होईल काय? कीं उलट अनर्थ माजून नाश होईल?” शांबाराव स्तंभित होऊन म्हणाले, “एक वेळ तसे मानू या, पण मठांनी आमच्यावर सत्ता गाजवावी हा न्याय तरी कुठला? यांना हा हक्क कोणी दिला?” उत्तर आलें — “पूर्वकालीं धर्मकारण आणि राजकारण हीं निराळीं

नव्हतीं, रामायण कालीं विशेष प्रसंगीं दशरथाचा कुलगुरु जो वसिष्ठ ऋषि त्यामार्फतच निर्णय लावून घेत व त्याप्रमाणे वागत. प्रसंग विशेष भानगडीचा वाटल्यास ऋषिमुनींच्या मोठ्या सभा भरून सभेंतून निर्णय घेत. ती प्रथा काळाच्या पोटांत गडप झाली. राजे परधर्मीय बनले, त्यांना हिंदु धर्माचें वावडेंच होतें. ते या धर्माबद्दल कसे सहानुभूती दाखवतील ? त्या कालापासून राजकारण आणि धर्म याची फारकत झाली. आणि त्यावेळीं समाजास धर्मगुरूंची जरूरी भासूं लागली. समाजाने त्या जागीं संन्याशांची योजना केली. आतां हा प्रकार कायदेशीर झाल्यासारखाच आहे. त्याला करार कागदपत्र नको आहेत. पूर्वजांपासून त्यांना आम्ही जर आमचे धार्मिक शास्ते मानीत आलों आहोंत, तर आम्हांस परंपरागत चालत आलेली ती सत्ता नाकारतां कशी येईल ?"

शांबाराव चकित झाले व समाधान पावले.

– मुकुंद म. प्रभु देसाई बोरूसकर.

---

## थोर विभूती

श्रीमदिंदिराकांततीर्थ स्वामी महाराज आधुनिक काळांतील एक थोर विभूती होती असे म्हणण्यास हरकत नाही. त्यांचे आचरण, पावित्र्य, व्यक्तिमत्त्व, तपोबळ इत्यादि गुणांमुळें त्यांच्याकडे सगळ्या वर्गातील लोक आकर्षित होत असत. ते श्रेष्ठ धर्मप्रणेते होते. पण धर्म या शब्दाकडे ते संकोचित दृष्टीने न पहाता व्यापक व उदार बुद्धीने पाहात असत. "यतो अभ्युदयनिःश्रेयसः सिद्धिः स धर्म" म्हणजे ज्याचेपासून ऐहिक व पारमार्थिक उन्नतीचा लाभ होतो, तो खरा धर्म होय, अशी धर्माची व्याख्या शास्त्रकारांनी केलेली आहे. सनातन धर्मातील या अमोल गुणांमुळेंच प्रो. मॅक्समुलर, नित्शे, शोपेनहर यांसारख्या पाश्चात्य पंडितांनीही त्याची महती एकमुखाने गायिली आहे. ख्रिस्ती, मुस्लिम, बौद्ध, जैन या धर्मांप्रमाणे कोणत्याही

एका व्यक्तीची गुलामगिरी आपल्या सनातन हिन्दु धर्माने पत्करलेली नसून तो परिस्थितिसापेक्ष व परिवर्तनीय आहे. "तो शास्त्रशुद्ध व व्यवहार्य धर्म आहे," असे उद्‌गार एका पाश्चात्य पंडिताने काढले आहेत. 'कृण्वंतो विश्वमार्यम्' हें उच्च ध्येय ज्या धर्माने दृष्टीपुढें ठेवले, तो धर्म विश्वधर्म होण्याच्या लायकीचा असून स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ इत्यादींसारख्या श्रेष्ठ विभूतींनी या धर्माचे श्रेष्ठत्व पाश्चात्य देशांतही प्रस्थापित केलें आहे. परंतु परंपरागत रूढीच्या चाकोरीतून पाहण्याच्या अनिष्ट संवयीमुळे धर्माचे विकृत स्वरूपच आज जगापुढे दिसत आहे. पूज्य स्वामीमहाराजांनीं ही सर्व वस्तुस्थिती लक्षांत आणून धर्माचे सोज्वळ स्वरूप अधिक विशद करण्याच्या हेतूने त्यावेळी ज्या चळवळी केल्या व ज्या सवलती समाजास बहाल केल्या त्यावरून पूज्यपाद श्रीस्वामीजींचे उदार धोरण, दूरदृष्टी आणि समाजाविषयींची कळकळ प्रतीत होते. ते द्वैतमतानुयायी असल्यावरून द्वैत सिद्धांताविषयीचे त्यांचे ज्ञान किती सखोल होतें हें "ज्याला द्वैतमताचें खरे रहस्य समजून घ्यावयाचे असेल अशा जिज्ञासूंनीं पर्तगाळ मठांतील वैदिक ऋषितुल्य अशा श्रीइंदिराकांततीर्थ स्वामीमहाराजांचें एकवार तरी जरूर दर्शन घ्यावे, अशी शिफारस आहे." या श्री. जांबोटकरांसारख्या विद्वान लेखकाने आपल्या हिंदुधर्म–विश्वधर्म या पुस्तकात केलेल्या शिफारसीवरूनही सहज कळण्यासारखे आहे. या संदर्भात मला आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणें अपरिहार्य वाटतें. ख्रिस्ती मिशनरी लोकांत आम्हां हिंदूंच्या दृष्टीने कांही दोषही असूं शकतील, परंतु त्यांच्यांतील सांघिक ऐक्य, स्वीकृत कार्याबद्दलची कळकळ इ. सद्‌गुण अवश्यमेव अनुकरणीय आहेत. धर्मप्रसारार्थ त्यांनी केवढे प्रयत्न चालविले आहेत, हे महादेवशास्त्री दिवेकर यांनी 'हिंदु समाज समर्थ कसा होईल?' या पुस्तकात दिलेल्या माहितीवरून कळून येण्यासारखें आहे. ते लिहितात, "सबंध हिंदुस्थानांत जर्मनी, इंग्लंड, अमेरिका, वगैरे राष्ट्रांचीं अनेक मिशने असून ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या सातशें संस्था आहेत. या संस्थांवर दरसाल त्यांचे अंदाजे ५०-६० कोटी रुपये खर्च होतात. उभ्या हिंदुस्थानांत ७०१० नेटीव

ख्रिस्ती लोक काम करतात. १९०० पाद्री, १४८१ विवाहित युरोपियन स्त्रिया,. २४०० कुमारिका व इतर दुसरे लोक धर्मोपदेशक तयार करण्याच्या शाळा ६१ असून १४१ अनाथालये, १७० शिल्पविद्यालये, ६१७ हायस्कुलें, मोठ्या लोकांना शिक्षण देणाऱ्या रविवारच्या शाळा १५८२० व शेतकी शाळा ९८ इ." या त्यांच्या प्रचंड कार्याकडे पाहून एकीकडे मन आश्चर्याने थक्क होत असतां, आमच्या धर्मातील अशा कार्याबद्दलची उदासीनता, अनास्था पाहून मन खेदविषण्ण होते. आशा करूंया कीं, हिंदुधर्मातील सर्व विद्यमान पीठाधीश आपल्या धर्मातही कांही समाजापयोगी कार्ये करण्याच्या दृष्टीने पावले जलद उचलतील.

समाधिस्थ श्रीगोकर्ण पर्तगाळी मठाधीश श्रीइंदिराकांत तीर्थ स्वामीजींबद्दलची माझी एक लहानशी आठवण इथं उद्धृत करतो. नक्की साल आठवत नाही. परंतु त्यावेळी पूज्यपाद श्रीइंदिराकांत तीर्थ व त्यांचे शिष्य श्रीमत्कमलानाथतीर्थ स्वामी यांचा या बाजूला संचार झाला होता. त्यवेळी त्यांचे कुंडईतही आगमन झाले. आमचे घराणें स्मार्त सांप्रदायिक (कवळे मठानुयायी) असलें तरी श्रीगोकर्ण पर्तगाळी पीठाबद्दल आमच्या वाडवडिलांत तसेंच आमच्या कुटुंबीयांतही परमावधीचा आदर आणि प्रेम वसत असल्यामुळे आणि स्वामीजींचीही आमच्या घराण्यावर पूर्ण कृपादृष्टी असल्यावरून ते या बाजूला संचारार्थ आले म्हणजे आमच्या विनंतीनुरूप आमच्या घरींहि त्यांचे शुभागमन होत असे. या परंपरागत रूढीला धरून आमच्या विनंतीप्रमाणे यावेळीही त्यांचे आगमन आमच्या घरी झाले. पादपूजादि धार्मिक विधी झाल्यानंतर उभय स्वामीमहाराज आमच्या विनंतीप्रमाणे जवळच्याच दिवाणखान्यात खासगी बैठकीत आले. तिथं आमच्या कुटुंबीय मंडळीनीं त्यांचे दर्शन घेऊन फलमंत्राक्षता प्रसाद घेतला. माझी आई, वै. रायूबाब धेंपे यांची कन्या असल्यामुळे श्रीस्वामीमहाराजही तिला तिच्या माहेरच्या 'उष्णे' या नांवाने संबोधीत असत. मी त्यावेळी आईच्या जवळच उभा होतो. मी लहानपणापासूनच देवभक्त असून

शाकाहारी व संस्कृत शिकलेला आहे; कैवल्यमठाधीश ब्र. श्रीमत् पूर्णानंद सरस्वती स्वामीमहाराजांनी आपला शिष्य करण्यासाठी माझी मागणी केली आहे वगैरे गोष्टी त्यांच्या कानावर गेल्या होत्या. त्यानी मला जवळ बोलावून माझे कौतुक केले आणि श्रीप्रसादफळ माझ्या हातांत दिले. त्यानंतर थोड्याच दिवसांत ते कालापूर येथे श्रीमंत धेंपे यांच्या घरी गेले असतां, तिथंही मी आईबरोबर गेलो. त्यावेळी श्रीनी अध्यात्मरामायणावर पुराण सांगण्यास मला आज्ञा केली. मी माझ्या अल्पबुद्धीप्रमाणे थोडेसे विवरण केले. माझ्या त्या बोबड्या बोलांचे त्यांनी फार कौतुक केलें आणि लवकरच पर्तगाळीस साजरा होणाऱ्या श्रीरामनवमीच्या उत्सवासाठीं येण्याची मला आज्ञा केली. तथापि प्रकृतीच्या अस्वास्थामुळे मला तो योग लाभला नाही. या उत्सवास माझ्या मातोश्री, वडील, तसेच माझे चुलतमामा वै. विष्णुबाबा धेंपे वगैरे मंडळी गेली होती. मी कां आलो नाही याची श्रीस्वामीजींनी चौकशी केली आणि कारण समजल्यावर मला त्यानी माझ्या आईकडून आशीर्वादपूर्वक श्रीरामपंचायतनाची एक हस्तिदंती छोटी सुंदर मूर्ती पाठवून दिली. ती अजून त्यांची आठवण म्हणून माझ्या संग्रहांत आहे. आणि ती पाहिली की, स्वामीजींची मला नेहमीच आठवण होते. अशा मायाळू, दयाळू व कनवाळू पूज्यपाद श्रीमदिंदिराकांततीर्थ स्वामीजींच्या पुण्यस्मृतीला माझे शतशः प्रणाम असोत.

— वामन शिवराम कुंडईकर.

---

# ॥ श्रीगुरुस्तवनमालिका ॥

श्रीगुरुस्तवनं कार्यं यथामत्यल्पमेवच ॥
हेतुर्मे तस्य सिद्ध्यर्थं वन्देऽहं वीरविठ्ठलम् ॥

वैकुंठपदसंश्लिष्ट वादिसंघपराजित
पूर्णप्रज्ञायुत श्रीमत् **पूर्णप्रज्ञ** नमोस्तु ते ॥ १ ॥

तदंगीकृत तत्पादानुसृतात्म महामते ॥
**श्रीपद्मनाभ**तीर्थाख्य नमस्तुभ्यं नमोनमः ॥ २ ॥

तत्स्थानापन्न भो **श्रीमदिंदिराकांत** सद्यते ॥
गौडसद्वृंदधर्मेश नमस्तुभ्यं नमोनमः ॥ ३ ॥

शिरोवेष्टितकौशेय शंखचक्रादिचिन्हित ॥
तुलसीस्रग्धर स्वामिन् नमस्तुभ्यं नमोनमः ॥ ४ ॥

तिलकैर्द्वादशैः सम्यङ्मण्डितस्वाङ्ग सौख्यद ॥
विस्तीर्णभालचापभ्रूर्नमस्तुभ्यं नमोनमः ॥ ५ ॥

धीमन् विशालवक्षः सल्लसत्पङ्कजलोचन ॥
प्रसन्नास्य दयादृष्टे नमस्तुभ्यं नमोनम ॥ ६ ॥

जितेन्द्रिय सुशान्तात्मन् स्वच्छान्तर विदांवर ॥
दत्तस्वाश्रयसद्विप्र नमस्तुभ्यं नमोनमः ॥ ७ ॥

वाक्पटो वेदशास्त्रज्ञ सत्यप्रिय बहुस्तुत ॥
ज्ञानवैराग्ययोर्मूर्ते नमस्तुभ्यं नमोनम ॥ ८ ॥

पद्नाभपदभृंग सत्कर्मासक्तमानस ॥
शिष्याभीष्टप्रद त्रातर्नमस्तुभ्यं नमोनमः ॥ ९ ॥

अविनीतजनालभ्य विनीतकरुणाकर
सन्देहध्वान्तकृद्भानो नमस्तुभ्यं नमोनमः ॥ १० ॥

छात्राणां च सदाऽस्माकं सदाचारं हि रक्षितुं ॥
दयालो यतसे नित्यं नमस्तुभ्यं नमोनमः ॥ ११ ॥

भवाम्बुधिनिमग्नाय गुरुसेवाचिकीर्षवे ॥
सत्यज्ञानं च मे देयं नमस्तुभ्यं नमोनमः ॥ १२ ॥

---

पद ( अंगदेशनृप मोठा म्हणती० या चालीवर )

ब्रह्मान्त गुरु इष्टदेव हरि साक्षात् आचार्य ।
जन्मोजन्मीं मिळोत मजला श्रीमध्वाचार्य ॥ १ ॥

श्रीनारायणतीर्थ वन्दितों नारायणभक्त ।
वैष्णव सारस्वतगुरु पहिले वडेरपदयुक्त ॥ २ ॥

वासुदेवतीर्थाख्य तयांचे वरकुमार झाले ।
पवित्र यात्रासाधक ज्यांनीं रागदोष त्यजिले ॥ ३ ॥

श्रीजीवोत्तम वादिराजयतिप्रिय जे अवतरले ।
विठ्ठल तीन प्रसन्न विमानी स्वर्गाप्रति गेले ॥ ४ ॥

श्रीपुरुषोत्तमतीर्थ प्रगटुनी धर्मबोध करिती ।
संन्यासपद्धति श्रौतस्मार्त हीं कर्में विस्तरिती ॥ ५ ॥

श्रीअणुँजीवोत्तम यतिनायक इच्छित फलदाते ।
पतितपावन किति वर्णावे शांत दांत गुणि ते ॥ ६ ॥

रामचन्द्रयतिराज प्रगटले दिव्यतेजमूर्ति ।
जयांसि राघव सीता लक्ष्मण आंजनेय मिळती ॥ ७ ॥

दिग्विजयश्रीरामचन्द्रमुनि महातपोयोगी ।
नारायणभूतासि बांधिलें हनुमत्पदभागीं ॥ ८ ॥

रघुचन्द्रगुरु अष्ट मठस्थापनारंभ करिती ।
श्रीहरिआज्ञायोगें मध्यें सोडुनि तो देती ॥ ९ ॥

लक्ष्मीनारायणाख्य मग ते यति भूवरि आले ।
धवलछत्रचामरादि वैभव ज्यांसि प्राप्त झालें ॥१०॥

लक्ष्मीकान्त यतीश्वर सज्जनतारक अवतरले ।
महातपस्वी श्रीपरमात्मज्ञानें जे भरले ॥११॥

रमाकान्त गुरु कृपावंत अति शांत महाज्ञानी ।
ज्यांनीं दीन जनांसि तारिलें दोषमुक्त करुनी ॥ १२ ॥

श्रीगुरु कमलाकान्त कृपाघन महाज्ञानयोगी ।
शमदमनियमनसमर्थ ऐहिकविषयवीतरागी ॥ १३ ॥

श्रीकान्तयती असंगमानस सदा प्रणवध्यानीं ।
श्रीकान्तपदीं चित्त निरंतर ठेवियलें ज्यांनीं ॥ १४ ॥

भूविजय श्रीरामचंद्र योगीन्द्र मोक्षवृत्ति ।
व्यासराजमठपति अति प्रिय ज्यां लक्ष्मीनाथयती ॥ १५ ॥

रमानाथ गुरु त्रिकालज्ञानी उग्रतपोमूर्ति ।
यद्रोषांकुर जाळी दुर्जनहविकसदनपंक्ति ॥ १६ ॥

लक्ष्मीनाथ समर्थ मुनीश्वर श्रीपतिपदभक्त ।
वरप्रसादें करिति बडोदाराज पुत्रवन्त ॥ १७ ॥

स्वामि श्रीमदानन्दतीर्थ गुरु श्रुतपावनकीर्ति ।
दीनसुजनमंदारच केवळ परमशांतमूर्ति ॥ १८ ॥

श्रीमत्पूर्णप्रज्ञतीर्थ मुनि विद्यानिधि पूर्ण ।
पंडितवादीसमूह ज्यांनीं जिंकियले तूर्ण ॥ १९ ॥

पद्मनाभयतिवर्य सदा रत श्रीविठ्ठलचरणीं ।
न्यायतर्कव्याकरणमध्वसिद्धान्ततत्त्वखाणी ॥ २० ॥

**श्रीमदिन्दिराकान्ततीर्थ वेदान्ततपोराशि ।**
**समस्त तीर्थक्षेत्रें फिरती होउनि उपवासी ॥ २१ ॥**

श्रीमत्कमलानाथतीर्थ मामत्यमोह त्यजुनी ।
गुरुसमनुग्रहपूर्णकुशलसच्छास्त्रसुधाज्ञानी ॥ २२ ॥
सद्गुरुवरमणिमाळ दिव्य ही वंदन जप करुनी ।
हृदयसंपुटीं धारण करितो अनन्त दिनरजनी ॥ २३ ॥

---

## गुरुनमन

गुरुराया, गुरुराया, वंदन निशिदिनिं तव पायां ।
अघ साराया दुरित हराया, अहंकार निस्ताराया । गुरुराया०॥ १ ॥
मायामय संसार तराया । मिथ्या बुद्धि वाराया । गुरुराया० ॥ २ ॥
वायां धनसुतजाया, लागति दुर्लभ काया शिणवाया । गुरु० ॥ ३ ॥
काममदादिक दायादच्चि हे । टपति डाव साधाया । गुरु० ॥ ४ ॥
भयाभीत तो अनन्त होई, दया करा या चुकवाया । गुरु० ॥ ५ ॥

### पद ( पंचतुण्ड नर० या चा० )

श्रीमदिन्दिराकान्ततीर्थपदकमलपरागमनोभ्रमरा ।
अनुदिन सेवित गुंगुनि राहीं हाच सुखाचा मार्ग खरा ॥ धृ० ॥
इकडे तिकडे भटकत असशी, कालचक्र देई फेरा ।
यांतुनि सत्वर सुटुनी जाया, असे एक हा मार्ग बरा । श्रीमदिं० ॥१॥
श्रीचरणाचा आश्रय जोडी, तरीच पावसि परपारा ।
इतर कल्पना व्यसनदायिनी आठवूं नको त्यांसि जरा । श्रीमदिं० ॥२॥
अनित्य संग्रह नादीं लावुनि फुकट फिरविसी घरोघरा ।
म्हणुनि गुरुपदीं शरण होउनी अनंत मागतसे थारा । श्रीमदिं० ॥३॥

### पद ( श्रीजगन्नाथा० या चा० )

भो गुरुनाथा । श्रीइन्दिराकान्ता ।
शांता, दांता, भक्तनियन्ता, पूर्णवेदान्ता । भो०॥ १ ॥

मायामोहगता । परमात्मचित्तरता ।
संतमनविश्रान्ता, नतजनहंतभवदुरिता ॥ २ ॥
वैष्णवसुखमदना । स्मितहासकुमुदवदना ।
कुंदरदन मुकुंदपदरत सुंदराङ्गयुता ॥ ३ ॥
वरगुणमणिहारा । शरणागत जन थारा ।
करुणागारा तारक भवसागरभयभीता ॥ ४ ॥
कृतगिरिवनवासा । तीर्थाटन उपवासा ।
ज्ञानविलासा, अनन्तदासा संकटत्राता ॥ ५ ॥

झंपा ( आतां रामपायीं मना लाग० या चा० )

नमो इन्दिराकान्त गुरु शांत मूर्ते ।
शरण सर्वहि आम्ही हो तुम्हांते ॥ धृ० ॥

मूर्ति अति साजिरी, कांति हेमापरी, वस्त्र भरजरि शिरीं वेष्टिलेंसे ।
ऊर्ध्व पुंड्रचि ती, भाळिं शोभा अति, नेत्र जणु वाटती मीनवत् ते ॥
नमो० ॥ १ ॥

शुभ्र आरक्त दाडीमबीजापरी दंतपंक्ती बरी वदनिं तैशी ।
भ्रुकुटि धनुषापरी, नासिका गोजिरी, ओष्ठ बिम्बापरी, शोभती ते ॥
नमो० ॥ २ ॥

वर्तुलाकार तो कंठहि दीसतो, शंख जणु भासतो शुभ्र खासा ।
शालु अंगावरी, माळ रुळते उरीं, अस्खलित वैखरी मधुरहि ते ॥
नमो० ॥ ३ ॥

दीर्घ बाहू पहा, रम्य जंघा अहा, चरण ज्याचे महा, पापहंते ।
गुरुसमागमीं रहा, वदति चारहि सहा, ग्वाहि देती पहा साधुहि ते ॥
नमो० ॥ ४ ॥

प्रेम हरिचें मनीं, वाढुं आमुच्या जनीं, दुष्टमति पापिणी नष्ट होवो ।
नित्य गीतामृतीं, चित्त-आसक्ति ती, जडुं घडो कृष्णसुत वांछि जें तें ॥
नमो० ॥ ५ ॥

पद ( पद्मनाभ गुरुशिष्य इन्दिराकान्त० या चा० )

वैष्णव कुलगुरु स्वामि इंदिराकान्त शिष्ययुत देखिला ॥ धृ० ॥
पौष वद्य प्रतिपदा रविदिनीं महायोग हा लाभला । वै० ॥ १॥
थाटमाट परिवार पाहुनि प्रेम विकसूं लागला । वै० ॥ २ ॥
हास्ययुक्त मुखचन्द्र विलोकुनि प्रेमपूर मनिं दाटला । वै० ॥ ३ ॥
पूर्वपुण्य मम उदय होउनी सुखकर दिन हा वाटला । वै० ॥ ४ ॥
श्रीगुरुपदरजदर्शनमात्रें पुण्य देह हा जाहला । वै० ॥ ५ ॥
कृष्णकृपांकित दीनदास हा श्रीगुरुचरणीं लागला । वै० ॥ ६ ॥

---

# अथ श्रीमदिन्दिराकान्ततीर्थश्रीपादाष्टकम्

श्रयामो वयं श्रीन्दिराकान्ततीर्था–
न्स्मितज्योत्स्नयेन्दूकृतास्याम्बुजातान् ।
यतीन्द्रान्महातीर्थयात्रान्कृतार्था
यदङ्घ्रयब्जसंदर्शनाप्त्या समस्ताः ॥ १ ॥

मंदहासरूपी चांदण्यानें ज्याचें मुखकमळ चंद्राप्रमाणे आल्हादकर असतें, यतिश्रेष्ठ असूनही ज्यानीं महातीर्थयात्रा केल्या आहेत, म्हणूनच ज्यांच्या चरण-कमलांची भेट घेतल्यानें समस्त लोकांना धर्म–अर्थ–काम व मोक्ष असे चारही पुरुषार्थं मिळवितां येतात, त्या श्रीमदिंदिराकांततीर्थ श्रीपादस्वामी ह्यांचा आम्ही आश्रय करितों.

नमामोऽधुना श्रेयसे चित्कबन्धं
मुनीन्द्रेन्दिराकान्ततीर्थाख्यसिन्धुम् ।
सुशान्त्यादिरत्नं ससद्वाक्तरङ्गं
सदोद्यन्मुखेन्दुं सुविद्यापगाङ्गम् ॥ २ ॥

ज्याचें जल ज्ञानरूप असतें, शमदमादिक गुण हींच कांहीं रत्नें ज्याच्यामध्यें असतात, निग्रहानुग्रहाला समर्थ अशा वाचाच ज्यांच्या लाटा असतात, ज्याचा मुखचंद्रमा सर्वदा उदय पावलेलाच असतो आणि वेदांतादिविद्यारूप नद्या ज्याच्या देहामध्यें येऊन मिळाल्या आहेत, त्या मुनिश्रेष्ठ श्रीमदिंदिराकान्ततीर्थ नांवाच्या महासागराला आम्ही आमच्या कल्याणाकरिता आतां नमस्कार करितों.

भजामो भवव्याधिभङ्गाय भानुं
विरक्तेन्दिराकान्ततीर्थाभिधानम् ।
धराचारिणं हृत्तमोनाशशीलं
श्रितस्वान्तनेत्राब्जसंतोषमूलम् ॥ ३ ॥

जो भूमीवर फिरत असतो, ज्याचा स्वभाव हृदयांतील अज्ञानरूपी अंधकाराचा नाश करण्याचा असतो, आणि जो आश्रितलोकांचें मन व नेत्ररूपी कमळ यांच्या आनंदाला कारण झालेला आहे, त्या विरक्तीनें शोभणाऱ्या श्रीमदिंदिराकांततीर्थ नांवाच्या भास्कराला आम्हीं आमच्या जननमरणरूप व्याधीच्या नाशाकरितां पूजीत आहों.

पिबामात्र वाक्कौमुदीं याममन्दां
समेत्येन्दिराकान्ततीर्थाखिलेन्दुम् ।
द्विजन्मान्तराण्याश्रितानन्तमेनं
यया स्यान्मनस्तापहानिः समानम् ॥ ४ ॥

आम्हीं ब्राह्मण विशेष म्हणायाचे चकोरपक्षी श्रीमन्नारायणरूपी गगनाचा आश्रय केलेल्या ह्या श्रीमदिंदिराकान्ततीर्थ नामक पूर्णचंद्राचें दर्शन घेऊन त्याचें प्रसिद्ध वाग्विलासरूपी चांदणें आतां पिऊं या, कीं, ज्याच्यामुळें आमच्या मनाचा व देहाचा ताप सारखाच नष्ट होईल.

शुभायेन्दिराकान्ततीर्थाख्यमेघः
सुशास्त्राम्बुधेर्लब्धसंविज्जलौघः ।
हरिप्रेरितो धीरनादोऽस्तु नोऽद्य
स्मितेरंमदो भक्तकेक्योघहृद्यः ॥ ५ ॥

जो सच्छास्त्ररूपी समुद्रापासून मिळालेल्या ज्ञानजलांनीं भरलेला असतो व श्रीमन्नारायणरूपी वायूने प्रेरित होतो, ज्याचा ध्वनि गंभीर आहे, मंदहासच ज्यांतील विद्युत्प्रकाश आहे, आणि जो भक्तरूपी मयूरांच्या समूहाला आनंद देतो, तो श्रीमदिंदिराकांततीर्थ नांवाचा मेघ हा आज आमच्या कल्याणासाठीं असो.

करोत्विन्दिराकान्ततीर्थाभिधानं
सुरो ज्ञानवार्यश्रमान्नोऽक्षिमीनम् ।

अरागोरुनक्रं महाक्षेत्रयानं
करास्याङ्घ्रिपद्मं द्विजैःसेव्यमानम् ॥ ६ ॥

ज्यांतील पाणी ज्ञानरूप आहे, नयनरूपी सुंदर मासे ज्यांत असतात, विषयासक्तिरूपी मोठा मगर ज्यांत मुळींच नसतो म्हणूनच जें लोकांना भयंकर वाटत नाहीं, जें तीर्थक्षेत्ररूपी शेतांच्यासाठीं खपत असतें, ज्यांत हात पाय व मुख हींच कमळें असतात, आणि जें ब्राह्मणरूपी हंसादिपक्ष्यांनीं सेविलें जातें, तें श्रीमदिंदिराकांततीर्थ नांवाचें सरोवर आमच्या श्रमाचा नाश करो.

अलोलेन्दिराकान्ततीर्थेन्द्रशालः
सुभक्त्यालवालो विरक्त्याद्यमूलः ।
क्षमात्वक् शिवायैष भूयात्प्रशस्यः
प्रमासत्सुमो नोऽमृतोत्कृष्टसस्यः ॥ ७ ॥

श्रीहरिगुरुभक्ति ही ज्याला आळें असून वैराग्य हेंच मुख्य मूळ असतें, क्षमा ज्याची साल असते, ज्ञानरूपी उत्कृष्ट फुलें ज्याला असतात, आणि ज्याचें फळ मोक्ष आहे, तो अढळ असा श्रीमदिंदिराकांततीर्थरूपी कल्पवृक्ष हा आमच्या कल्याणाकरितां असो.

मठेशेन्दिराकान्ततीर्थाः ! परेऽपि
स्थितान्यस्य माठेश्यमद्धावरेऽपि ।
श्रितानि प्रधानानि वाश्चिद्विरक्ती
क्षमा शान्तिदान्ती दयादिष्टभक्ती ॥ ८ ॥

अहो मठाधिपति श्रीमदिंदिराकांततीर्थ श्रीपादस्वामीहो ! आपण दुसऱ्यांवर म्हणजे लहान असणाऱ्या शिष्यस्वामींवर मठाधिकार खरोखर सोंपवून राहिलां तरी, ज्ञान-शांति-इंद्रियनिग्रह-संतोष-वैराग्य-क्षमा-दया व श्रीहरिगुरुभक्ति हे आपले अष्टप्रधान अजूनही आपला आश्रय धरूनच आहेत !

श्रीन्दिराकान्ततीर्थानामिदमष्टकमिष्टदम् ।
तच्छिष्यकुमठानारायणाचार्येण निर्मितम् ॥ ९ ॥

इच्छितफल देणारें श्रीमदिंदिराकांततीर्थ श्रीपादवडेर स्वामी ह्यांचें हें श्लोकाष्टक त्यांचे शिष्य कुमठा नारायणाचार्य ह्यांनीं रचिलें.

## प्रशंसा

श्रीगोकर्णमठाधिनाथकमलानाथेश्वराः श्रीन्दिरा-
कांतश्रीचरणा धृताखिलगुणा वैराग्यसद्भूषणाः ।
नानाशास्त्रविचक्षणाः कृतचतुर्धामादितीर्थाटनाः
सुप्रख्यातसुमङ्गलप्रवचनाः सिद्ध्य सदा सन्तु नः ॥ १ ॥

जे सकल सद्‌गुणांनीं युक्त आहेत, वैराग्यच ज्यांचा महत्वाचा अलंकार आहे, जे नाना तऱ्हेच्या शास्त्रांत पारंगत असतात, ज्यांनी ह्या भारतवर्षांत चारहि दिशांत असणाऱ्या बदरिकाश्रम–जगन्नाथपुरी–रामेश्वर–द्वारका वगैरे तीर्थक्षेत्रस्थानांचे संदर्शन घेतलें आहे, ज्यांचें प्रवचन सर्व ठिकाणीं प्रसिद्ध असून अत्यंत मंगलकारक असतें, आणि जे श्रीगोकर्णमठाधिपति श्रीमत्कमलानाथतीर्थ स्वामी ह्यांचे गुरुजी आहेत, ते श्रीमदिंदिराकांततीर्थ श्रीपादस्वामी हे सर्वकाल आमच्या कल्याणाकरितां असोत.

---

## श्रीमदिन्दिराकांततीर्थ

श्रीमद्वैष्णवगुरुगुरु गुरुहि तसे सर्वसिद्धिसदन मुनीं ।
ध्यातों सादर चित्तें त्यांचे स्वर्वल्लितुल्य पद नमुनी ॥ १ ॥
करितां नम्र पदाब्जीं माथा सांभाळिती अवनतातें ।
विसरुनि अपराधांतें याहुनि करिजेल का अवन तातें ? ॥ २ ॥
अस्मद्‌दुरितें अपुल्या योगबलाग्निंत करावया हूत ।
झटती याहुनि माता बाळांचें करिल काय फार हित ? ॥ ३ ॥
ज्यांनीं असंगशस्त्रें केलें जिंकोनि षडरिंचें दमन ।
वमन तसें धन गणिलें त्यांतें न करील बुध कसें नमन ? ॥ ४ ॥
सुतपस्यासिद्धि तसें योगबलहि बहु असे असामान्य ।
जगतीं न पाहिला कधिं तापसवर कुणि तुम्हां असा मान्य ॥ ५ ॥
अति शांत दांत तुमची मूर्ति सतत जे मनात पूजितील ।
दैन्य न बाधेल तयां कीर्ति, श्री, यश बळेंच वरितील ॥ ६ ॥

नरनारायण तैसे गुरुशिष्य तुम्हीं तपःपर महर्षी ॥
भूषण सत्पुरुषांचें पाहुनि झालों तुम्हां परम हर्षी ॥ ७ ॥
आहे वाटे अमुच्या सुकृताची जोड पदरिं फार बरी ।
म्हणुनि कृपेची तुमच्या  वळलि सदय हो अम्हांवरी लहरी ॥ ८ ॥
किंवा हें भेषजची अति रुग्णा वांचवावया आलें ॥
धालें पाहुनियां मन वाटे प्रेमार्णवांत तें न्हालें ॥ ९ ॥
किंवा आपोआपचि लोटलि ही आळशावरी गंगा ।
जीच्या नामस्मरणें पावति अजि अखिल पातकें भंगा ॥ १० ॥
वाहति तुमच्या हृदयीं दया, क्षमा, शांतिचे सदैव झरे ।
म्हणुनिच संनिध जातां अतितप्ताचाहि सर्व ताप सरे ॥ ११ ॥
वेदार्थतुल्य अपुले शांतीसुखपुण्यकीर्तिजनक वच ।
संरक्षाया क्लेशांपासुनियां होय मूर्त कीं कवच ॥ १२ ॥
त्याचा करी अनादर  जो नर तो मूढ वा असे मंद ।
त्याला सुख, जय कैंचें ? स्वप्निंहि न शिवेल अल्प आनंद ॥ १३ ॥
गुरुवाक्ग्रहणीं ज्यांचे आहे तत्पर सदैव कान, मन ।
ते पावति सौख्य जगीं घाली त्यां माळ कीर्ति, सुयश, धन ॥ १४ ॥
होउनि रत स्वधर्मीं गुरुंची जो मनुज सत्कृपा जोडी ॥
भवशीत निवाराया त्यांतें नलगेचि अन्य पासोडी ॥ १५ ॥
आक्रमिती सुनितीपथ विमल जयां आवडे  सदाचरण ।
भीती अपकीर्तीतें ते गुरुंचे पूजिती सदाचरण ॥ १६ ॥
संसारहृदीं बुडतां गुरुची अति सुदृढ वाक्तरी तारी ।
हारी त्रैतापातें आधिव्याधी समस्तहि वारी ॥ १७ ॥
दुर्मति दुराग्रही बहु जे नर ते मात्र गुरुपदीं चुकती ।
रचिति निजकरें अपुलें अहित स्वसुखासि सर्वथा मुकती ॥ १८ ॥
गुरुंच्या चरणावरुनी ओंवाळिति सर्वदा असु ज्ञाते ।
ते धन्य होत जगतीं अति दुर्लभ भाग्य हें असुज्ञांतें ॥ १९ ॥

गुरुवचनावरि ज्यांचा श्रद्धापूर्वक अखंड विश्वास ।
होती वश न विकारां, तेच मनुज पूज्य होत विश्वास ॥ २० ॥
पांडित्याचा वाहुनि गर्व शिरीं जे तुम्हांकडे आले ।
टिकले ते न क्षणहीं होउनिया विमद सर्वही गेले ॥ २१ ॥
परिसुनि तुमचे भव्यद मधुहुनि अति गोड बोल कानांही ।
मूढहि निवे खरोखर तुमच्यासम कुणिहि बोलका नाहीं ॥ २२ ॥
दीन न पावो कधिंही वसतां तुमच्या पदासमीप दरा ।
मागतसें नम्रपणें हेंच पसरुनी पदास मी पदरा ॥ २३ ॥
ठेवा प्रेम निरन्तर ठेवियलें विमल जेवि अजवरती ।
मागावे काय अधिक ? आस वसेना मनांत यापरती ॥ २४ ॥
आदरपूर्वक गुरुंच्या पुनित पदाब्जीं समर्पिल्या आर्या ।
या त्यां रुचो झटति जे संतत वैष्णवसमाजहितकार्या ॥ २५ ॥

काळापूर, फाल्गुन कृष्ण ८ मी शके १८४५.


श्रींचा शिष्यानुशिष्य,

**सगुण आत्माराम प्रभू मोये.**

---

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| (५) | २ | अवएव | अतएव |
| (११) | १ | रहगणैतत्तपसा | रहूगणैतत्तपसा |
| १ | १३ | विद्याभूषण | विद्याभूषण बलदेव |
| २ | १० | मर्जीतील | मर्जीतील |
| २ | १३-१४ | शके १३९८ (सन १४७६) | शके १३९७ (सन १४७५) |
| २ | १९ | यांवी | यांची |
| ३ | १८ | शके १५७८ | **शके १५७८** |
| ३ | १९ | सन १६५६ | **सन १६५६** |
| ४ | ४ | रामचंद्रतीथ | रामचंद्रतीर्थ |
| ४ | १७ | श्रीमत्कांततीर्थ | श्रीमत् श्रीकांततीर्थ |
| ५ | २२ | अक्षयतृतीयेदिनी | अक्षयतृतीयादिनी |
| ११ | १२ | विद्वान | विद्वान् |
| १२ | ३ | ४८-५२ | ५८-५२ |
| १२ | ६ | २६-५२ | ५६-५२ |
| १२ | १० | घटी ३७-३५ | घटी ५७-३५ |
| २४ | १३ | मध्यान्हपूजा | मध्याह्नपूजा |
| २५ | २ | मध्यान्हकालीन | मध्याह्नकालीन |
| ४१ | २० | मादनकेरी | गोकर्ण येथे श्रीमठीं |
| ५५ | ६ | पाद्यपूजा | पादपूजा |
| ७० | १२ | भाव-शकरा | भाव-शर्करा |
| ७५ | ९ | निष्ठा | निष्ठा। |
| ८४ | ४ | पाद्यपूजा | पादपूजा |
| ८८ | १४ | ,, | ,, |
| ८८ | १५ | मुं | मुंज |
| ८८ | २३ | महत्व | महत्त्व |
| ९३ | १९ | विचारविनियम | विचारविनिमय |




श्रीमदिन्दिराकान्ततीर्थ श्रीपाद वडेर
स्वामी महाराजांचें वृन्दावंन

Cover and the inside Art Plates processed and printed by Madhavrao A. Pai at Shree Kundodari Mudranalaya, Dadar, Bombay 28 in devotional tribute to the memory of H. H. Shreemat Indirakant Teerth Shreepad Wader Swami.